बिजोड दंपती

…खलु समारब्धाः फलं बध्नंति नी…

‘ सरस्वतीमंदिर ग्रंथमाला ’ ग्रंथ…

विजोड दंपती

अथवा

शारदापूर्ति.

(अंक १ ते ५)

लेखक—रामदास.

प्रकाशक

नारायण रामचंद्र आठवले,

व्यवस्थापक सरस्वतीमंदिर, मि…

श्री सरस्वतीमंदिर ग्रंथमाला.



अनुष्टुप्

शारदा शारदांभोजवदना वदनांबुजे ॥
सर्वदा सर्वदास्माकं संनिधिं संनिधिं क्रियात् ॥

मल्लीनाथ.

रजिस्टर नं. २० ब
१०।३।१४.

विजोड दंपती

अथवा

शारदापूर्ति.

लेखकः

" रामदास. "

प्रकाशकः

नारायण रामचंद्र आठवले,

व्यवस्थापक सरस्वतीमंदिर, मिरज.

आवृत्ति १ ली

सन १९१३.

किंमत आठ आणे.

कोल्हापूर येथें " श्रीसिद्धेश्वर छापखान्यांत "

श्री. वासुदेव नारायण ठकार यांनीं छापिलें.

परिचय.

अपरिचितांचा परिचय, परिचितांनीं करून द्यावयाचा असतो. मीं, महाराष्ट्रसारस्वतांस मुळींच परिचित नसूनहि, प्रस्तुत लेखक **श्री० रामदास** यांचा परिचय करून देण्याचें धाडसाचें काम, त्यांच्या आग्रहामुळें हातीं धरिलें आहे.

श्री० रामदासांची व माझी दाट ओळख होऊन अवघीं चारच वर्षं झालीं. तेवढ्या अवधींत, त्यांचें लेखन–कौशल्य, कवित्व व प्रेमळ [illegible]न यांनीं माझें मन अत्यंत आकर्षिलें. यांच्या मोकळ्या वागणु[illegible], हे जातील तेथें, यांच्या सभोंवार तरुण व उत्साही मंडळींचें मंडळ तेव्हांच जमतें. लेखनाची जबर इच्छा उत्पन्न करणें, हा एक गुण यांच्या अंगीं स्वाभाविक आहे. त्यामुळें त्यांच्या सहवासांतील बहुतेक तरुण लेखनप्रयत्न करूं लागतात. त्यांत येणाऱ्या अडचणी दूर करून, चुका समजावून देण्यास **श्री० रामदासां**इतके तत्पर असणारे लेखक क्वचित् आढळतील. **श्री० रामदास** ज्या गांवीं एक वर्ष तरी राहिले, तेथें निदान दोन तीन लेखक तयार झाले नाहींत असें कधींच झालें नाहीं.

अलीकडे त्यांचें हें लेखकमंडळ बरेंच वाढलें. तेव्हां सर्वांत सहानुभूति राहून, सर्वांना एकदिलानें वाङ्मय–सेवनाचें काम करितां यावें म्हणून त्यांनीं **शके १८३१ च्या विजयादशमीस सरस्वती-मंदिर** या संस्थेची स्थापना केली. त्यांचें धोरण, नवीन लेखक तयार करून त्यांना पुढें आणणें, व समाजास नीतीचा उपदेश होईल अशीं पुस्तकें तयार करणें, हें आहे. लेखनाचे बाबतींतले त्यांचे

विचार फार सुंदर आहेत. ते, कोणाही तरुणास सांगण्यास ते तयार असतात. पत्रव्यवहारानेंही दुसऱ्याचे लेखनास यांनीं मदत केल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. मंदिरांतून फक्त उत्तमच पुस्तकें बाहेर पडावीं असा त्यांचा कटाक्ष आहे.

प्रस्तुत नाटक, हें, त्यांच्या बऱ्याच दिवसांच्या अभ्यासाचें फल आहे. तें कितपत सरस आहे, हें ठरविणें मीं रसिक वाचकांकडे सोंपवितों. त्यासंबंधीं येथें फक्त इतकेंच सांगून जातों कीं, या नाटकाची लेखी प्रत निदान पांचशें जाणत्या लोकांच्या दृष्टीखालीं घालून, त्यांनीं प्रोत्साहन दिलें ह्मणूनच, श्री० रामदासांनीं, हें छापविण्याचें धाडस केलें. नाहींतर, त्यांच्या संशयी स्वभावामुळें आजपर्यंत लिहून, घरीं धूळ खात पडून राहिलेल्या बऱ्याच पुस्तकांत याचीही भर पडती.

मनुष्याची कृति निर्दोष असणें अशक्य आहे. ह्मणून यांतही असलेल्या दोषांकडे रसिक वाचक दयार्द्र दृष्टीनें पहातील पण ते सुधारावे ह्मणून लेखकास कळवून उपकार करितील, अशी आशा धरून, व सर्व–शक्ति परमेश्वराजवळ मंदिराचा उत्कर्ष होण्याची भिक्षा मागून हा परिचय पूर्ण करितों.

निपाणी,
ता. २०।७।१३

सदाशिव विठ्ठल सौंदलगेकर
सरस्वतीमंदिरवासी.

प्रकाशकाचे दोन शब्द.

धनाचे अभावीं आमच्या महाराष्ट्र-वाङ्मयाची केवढी हानि होत आहे, याचा विचार मनांत आला ह्मणजे, मन उद्विग्न होऊन जातें! सरस्वतीमंदिर स्थापन झाल्यापासून निरनिराळया लेखकांचे बरेच ग्रंथ तयार होऊन राहिले आहेत. पण ते प्रसिद्ध होण्यास लागणारें द्रव्य कोठून यावें? या अडचणीमुळें बरेच दिवस अप्रसिद्ध रहावें लागणार, हें न आवडून **सरस्वतीमंदिरवासिनी सौ० अनसूयेनें** मंदिराचें सौभाग्य 'वसईचा वेढा' या कादंबरीचे रूपानें जनांपुढें मांडिलें. 'पण पुढें काय? त्यानें **मंदिराची** सांपत्तिक स्थिति मुळींच सुधारली नाहीं, मग पुढच्या पुस्तकाच्या प्रसिद्धीचा विचार काय करावा?' या चिंतेंत आह्मी मंदिरवासी होतों, तोंच **निपाणीच्या** एका शेटजींचे मनांत प्रेरणा करून **ईश्वरानें** तो योग जमवून आणला. पण सत्कृत्यांत संकटाला काय उणीव? **मि० रेवचंद शेटजींना** कांहीं खासगी आपत्तीनें तो विचार बाजूला ठेवावा लागला. (यापुढें कांहीं ग्रंथ त्याचे मदतीनें प्रकाशित होणार आहेत.) तेव्हां आतां कांहींही करून, एकदां **मंदिराच्या** दैवाची परीक्षा पहावयाचीच अशा निश्चयानें हा ग्रंथ प्रकाशित करण्याचें धाडस मीं केलें.

संविधानकासंबंधीं विचार श्री० **रामदासांनीं** आपल्या **अंतरंगांत** केलाच आहे ह्मणून येथें मी त्याबद्दल कांहीं लिहित नाहीं. महाराष्ट्रांतील वाङ्मयाचे भक्त या आमच्या कृत्यास मदत करून, आमच्याकडून वाङ्मयसेवा घडवतील अशी आह्मास फार फार आशा आहे. **वसईचा वेढा** व **विजोड दंपती** या दोन पुस्तकांवरून आमच्या प्रयत्नाची दिशा वाचक आळखतीलच. सर्व गरीब गुरीबांना सुद्धां घेतां यावें ह्मणून या पुस्तकाची किंमत फारच माफक ह्मणजे अवघी ०८ ठेविली आहे. शेवटीं **सत्कृत्याचा प्रवर्तक** व **दयेचा सागर** प्रभु **रामचंद्र** मंदिराची उत्तरोत्तर भरभराट करीलच अशी भावना धरून हे शब्द आंखडते घेतों.

मिरज,
ता० २५।७।१३

नारायण रामचंद्र आठवले,
सरस्वतीमंदिरवासी.

श्रीरामप्रसन्न.

अंतरंग.

'येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्' या न्यायानें पहाणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें, मीं हें महत्कृत्य केलें खरें! पण गुणदोषांच्या खऱ्या परीक्षकांपुढें, कोणत्या तयारीनें यायला पाहिजे, हें पहिला प्रसंग असल्यामुळें, मला पूर्णपणें ठाऊक नाहीं. पुढें आलेल्या लोकांच्या दृष्ट व श्रुत अनुभवांवरून कांहीं कल्पना बांधून, मी या—माझ्या मतानें—सुंदर पोषाखांत त्यांच्यापुढें राहिलों आहें. 'आपल्या प्रिय वस्तूचें व्यंग आपल्यास दिसत नाहीं, किंबहुना तेंही आपल्याला प्रिय होऊन राहतें,' म्हणून तें दृष्टोत्पत्तीस येऊन, त्याची सुधारणा होण्यास, ती वस्तु परीक्षक जनांच्या दृष्टीखालूनच गेली पाहिजे. सराफास सोनें कसोटीला लावण्याची इच्छा होणें, हें सुद्धां त्या सोन्याच्या ठिकाणच्या चांगल्या गुणाचें दर्शकच होय! नाट्यकलाभिज्ञांना माझ्या या कृतीवर टीका करण्याची इच्छा झाल्यास, मी आपल्यास धन्य समजेन! पैलू पाडलेल्या गारगोटीला, हा हिरा आहे असा भास झाल्याखेरीज, ऐरणीवर ठेवून घण मारण्यास कोणता रत्नपारखी तयार होईल? तेजापांतून काढलेल्या सोन्याप्रमाणें, टीका वन्हींतून दोष जाळून, तावून सुलाखून निघालेलें हें नाटक, सहजच निर्दोष व तेजस्वी होईल! असो.

संविधानकासंबंधीं कांहीं विचार करून, माझ्या या कृतीचें अंतरंगही मला सुजाण वाचकांपुढें मांडिलें पाहिजे. श्री० देवल यांनीं आपल्या सुंदर व मोहक शारदेंत, जरठकुमारीविवाहाचे भयंकर व हृदयद्रावक परिणाम न दाखवितां, 'बघुनि त्या भयंकर' जो भेद विधीनें,' 'नका करूं अविचार,' वगैरे पद्यांत व 'फटक्यांत' असे विवाह कां घडूं नयेत याचीं कारणें थोडक्यात पण खुबीनें गोंविलीं आहेत. परंतु आपल्या समाजाच्या, रूढींच्या रोगणानें,

सत्यकल्पनावरोधी झालेल्या मेंदूंत तीं उतरावीं तरी कशीं? अशा कुमारींच्या दुर्दशा–दर्शनरूपी असह्य उष्णतेनें तें रोगण पाघळल्यावांचून, त्यांच्या मेंदूंत प्रकाश पडणार नाहीं ह्मणून व प्रत्यक्ष घडलेल्या जरठकुमारीविवाहाच्या हृदयविदारी परिणामानें उत्तेजित होऊन, मीं हें पुस्तक यथामतीनें लिहिलें आहे.

बहुतेक पात्रें श्री. देवलांच्या शारदेंतीलच घेतलीं आहेत. त्यामुळें त्यांचा परिचय करून देण्यांत कांहीं प्रवेश खर्चावे लागले नाहींत हा माझा फायदा झाला. पात्रांचे स्वभाव श्री. देवलांनीं आंखलेले तेंच पुढें कायम ठेविले आहेत. इंदिरा मात्र थोडी अधिक भोळी मानिली आहे. शारदेच्या मैत्रिणींपैकीं वल्लरी सोडून बाकीच्या यांत घेतल्या नाहींत.

आतां अधिक घेतलेल्या पात्रांविषयीं सांगावयाचें ह्मणजे, श्री. देवलांनीं गुप्त ठेवलेलें एक जरटकुमारीचें जोडपें मी पुढें आणिलें आहे. तें सुदाम सावकार व दामिनी हें होय. मध्यस्थीच्याही पुढें मजल जाऊन, गुप्तकृत्यांचें उघड दुकान घालणारे लोक तयार झालेले पाहून, त्यांतला एक नमुना वंचुकराव नांवानें टेवून दिला आहे. संविधानकाच्या पूर्ततेकरितां वल्लरीचा पति पशुपति हा एक अधिक घातला आहे. आणखी कांहीं किरकोळ पात्रें भरतीस घातलीं आहेत.

जरठाची तरुण पत्नी, जर पतिव्रता-धर्मानें राहिली तर, तिला कसे कष्ट सोसावे लागतात, हें शारदेच्या चरित्रांत, आणि व्यभिचारिणी निपजल्यास तिची किती दुर्दशा होते, हें दामिनीच्या चरित्रांत रेखटण्याचा प्रयत्न केला आहे. अशा व्यभिचारिणी झालेल्या स्त्रीशीं स्नेह संपादून, आपल्या संसाराचीं धूळधाण करणाऱ्या व्यक्तीचा पशुपति हा एक नमुना आहे.

आबालवृद्धांना समजून सर्वांच्या मनावर परिणाम व्हावा म्हणून, अगदीं साधी म्हणजे व्यवहारांतलीच भाषा पुस्तकांत वापरली आहे. पुस्तक, बीभत्स होऊन, स्त्रियांना व तरुणांना वाचण्यास नालायख न व्हावें म्हणून विशेष खबरदारी घेतली आहे.

' पुरुषांचा धर्मभ्रम ' म्हणून आणि माझा पहिला प्रयत्न या कारणानें, यांत दोषांचीं पुष्कळ ठिकाणें राहिलीं असतील, तीं मला कळावीं व सुदैवानें दुसरी आवृत्ति काढणेचा प्रसंग आल्यास, सुधारणा करितां यावी, निदान दुसऱ्या पुस्तकाचे वेळीं तरी त्यांचा विचार करितां यावा म्हणून, या पुस्तकाच्या शेवटीं एक पान मतांकरितां कोरें ठेविलें आहे. त्यावर आपलें मत व सूचना लिहून, तें पान वाचक मेहेरबानीनें मजकडे पाठवितील तर मी त्यांचा अत्यंत आभारी होईन.

मलपृष्ठाच्या (टायटलच्या) २ व ३ पानांवर (आंतल्या) लिहिलेलें मंदिराचें वृत्त सर्वत्रांनीं वाचावें; व मंदिराच्या ग्रंथमालांविषयीं सहानुभूति दाखवावी अशी माझी त्यांना सविनय प्रार्थना आहे.

शेवटीं सध्यासारख्या कठिण काळांत द्रव्यसाह्यानें पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल मि. आठवले यांचे, माझ्या विनंतीस मान देऊन **परिचय** लिहिल्याबद्दल **मि. सौंदलगेकर** यांचे, मुदतींत व सुबक छापून दिल्याबद्दल श्रीसिद्धेश्वर छापखान्याचे मालक मि. **वासुदेव नारायण ठकार** यांचे, व या सर्वांच्या मनांत प्रेरणा करणाऱ्या व मलाही ग्रंथरचनेस बुद्धि देणाऱ्या **प्रभु रामचंद्राचे** आभार मानून, व हें उघडें **अंतरंग** शुद्धीकरितां ज्ञानी वाचकांपुढें ठेवून, मी आतां विश्रांत घेतों.

तारीख, १।८।१३
मिरज,
सरस्वती-मंदिर.

सर्वांचा नम्र,

रामदास.

केवळ लोकाग्रहाकरितांच प्रसिद्ध करीत आहों.

गुण न आल्यास पैसे परत.

थोड्या किंमतींत कायमचा फायदा करून घ्या.

हजारों लोकांनीं अनुभव घेतलेला.

अद्‌भुत ताईत.

एका महान् ऋषीकडून आह्मीं अत्यंत परिश्रमानें हा साध्य करून घेतला आहे. हा जवळ ठेविल्यानें असाध्य रोग, पिशाच्चबाधा, बालग्रह, स्वप्नावस्था, संतति न होणें वगैरे हरएक प्रकारचे दुष्ट रोग त्वरित बरे होतात व पुन: होणेची भीति रहात नाहीं. शिवाय हरएक प्रकारचे उद्योधंद्यांत यश येईल. तर सर्व लोकांस याचा लाभ मिळावा या हेतूनें याची किंमत अगदींच कमी ठेविली आहे. कुटुंबवत्सलांनीं अवश्य ठेवावा. विद्यार्थी व्यापारी, धंदेवाले वगैरे सर्व लोकांना पुष्कळ फायदा होईल. तर अशी अमूल्य संधि कोणीही दवडूं नये अशी विनंति आहे. किंमत फक्त १। रुपया, चांदीचा ताईत १॥ रुपया, सोन्याचा ताईत किंमत ५ रुपये. एकदम ४ घेणारांस एक फुकट. पोष्टखर्च वेगळा. अनुपान सोबत. पत्ता सुवाच्य बालबोध अक्षरांत लिहावा. ज्या पत्रावरून मागणी केली त्या पत्राचें नांव कळवावें. उत्तरास तिकिट पाठवावें. एजंट पाहिजेत.

ताजाकलम:—ज्यांना तात्काळ गुण येण्याची जरूरी असेल त्यांना किंमत १० दहा रुपये पडेल. पंधरा दिवसांपर्यंत गुणाची जरूरी असल्यास किंमत ५ रुपये पडतील. इतरांना पंधरा दिवसांनंतर गुण येऊं लागतो. जशी आवश्यकता असेल त्याप्रमाणें कळवावें.

सूचना:—हल्लीं वर्तमानपत्रांतील जाहिराती पाहून बहुत लोकांच्या मनाचा परिणाम असा झाला आहे कीं, भपकेदार जाहिराती असतात. ही त्यांची समजूत चुकीची नव्हे परंतु खरा धंदा नाहीं असें मात्र

नाहीं. आमची प्रशंसा आह्मी करीत नाहीं. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. आमचा धंदा लबाडीचा नसून केवळ गरीब लोकांना खरा उपाय कोणी कळवीत नाहीं, त्यामुळें गरीब लोकांची नुकसानी होते; ह्मणून थोड्या किंमतीत गरिबांचा फायदा व्हावा ह्मणून आह्मी प्रसिद्ध करीत आहों. खरेपणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटा मिळाल्या आहेत. परंतु स्थलसंकोचामुळें येथें देता येत नाहींत. समक्ष पाहाणारांस दाखवूं.

पत्ताः—मॅनेजर शंकर दीक्षित अथणीकर.

हेड ऑफिसः-पो. मिरज, जि. बेळगांव.

तार पाठविणेचा पत्ताः—शंकर दीक्षित, मिरज.

॥ श्रीमार्तंड प्रसन्न ॥

प्रसिद्ध सखारामपंती जर्द्याचा कारखाना निपाणी.

आमचे कारखान्यांत अकोळी तंबाकूपासून तयार केलेला जर्दा विकला जातो. लोकांच्या आवडीप्रमाणें माल मिळत नाहीं ह्मणून कस्तुरी, केतकी, सुवासिक जर्दा व केशर कस्तुरीमिश्रित अर्कगोळ्या तयार करितो. कस्तुरी पाव र. ०८ आ. केतकी पाव र. ०६ आणे सुवासिक पाव र. ०४ आणे. अर्कगोळ्या तोळयास ०४ आ. व्यापाऱ्यांस शेंकडा २५ टक्के कमिशन देऊं. स्वदेशी जीननात विक्रीस तयार आहे. दर एक आ. निळीकाळी शाई पुड्या-शेंकडा ०६ आणे येणेंप्रमाणें माल मिळेल.

पत्ताः-जी. एस. मुजुमदार कापड दु० निपाणी,-बेळगांव.

अर्पण !

मातृदेवो भव । पितृदेवो भव ।

शार्दूलविक्रीडित.

जन्मानें वपु नेटकें मज दिलें,
कीं ज्ञान सच्छिक्षणें ॥
ज्यांहीं संगतिनें निजा, जडविलीं,
चित्तास सल्लक्षणें ॥
काया, वाणि, विचार, चित्तहि असें,
त्यांचेंच हा पावला ॥
प्रेमें त्या पितरांचिया, स्वकृति ही,
अर्पीतसे, पावलां ॥ १ ॥

नम्र तनय
रामदास.

पात्रांची यादी.

श्रीमंत (भुजंगनाथ)	विवाहित वृद्ध. (नायिकेचा पति)
सुदाम (सावकार)	विवाहित वद्ध.
कोदंड	शंकराचार्यांचा शिष्य.
हिरण्यगर्भ	,,
पशुपति (सावकार)	वल्लरीचा पति.
भद्रेश्वर (दीक्षित)	मध्यस्थ
वंचुकराव	अभिसार मंदिराचा संस्थापक
भैरवनाथ	श्रीमंतांचा पुतण्या.
हिरालाल	कोदंडाचा अनुयायी.
कांचनभट	शारदेचा बाप.
शृगालराव	एक तरुण श्रीमंत.
महीपति	पशुपतीचा चाकर.
बाग्या	,,
शारदा	नायिका.
इंदिरा	नायिकेची आई.
दामिनी	सुदामपत्नी.
पार्वती (वल्लरी)	पशुपतिपत्नी.

दासी, चाकर, नाईक, शिपाई दरोडेखोर वगैरे.

विजोड दंपती

अथवा

शारदापूर्ति.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थळः— भुजंगनाथ (श्रीमंत) यांचा दिवाणखाना.

[श्रीमंत एकटेच बसले आहेत.]

श्रीमंतः— (स्वगत) अगदीं मनाजोगी गोष्ट झाली! यःकश्चित् लग्न तें काय; पण त्यांत विघ्नें कोण? तो कोदंड आला, भैरवनाथ आला, हे काय करितील? लग्न शेंवटाला कसें जाईल ह्मणून जिवाला एकसारखी धुगधुग होती. पण पूर्वपुण्याईनें तें तर तडीस गेलें! आतां भैरवनाथाला ह्मणावें बैस हांका मारीत! बेट्यांना माझी इस्टेट पाहिजे होती नाहीं कां? एक कपर्दिका–फुटकी कपर्दिका सुद्धां हातीं लागूं देणार नाहीं; ह्मणावें हा नांवचा भुजंग आहे. त्या कांचनभटाला तर कन्याधनाबद्दल तुरी दिल्याच हातावर. आतां दीक्षित येईल बक्षीस मागायला. त्याचीही कांहीं युक्तीनें अशीच वाट लावली पाहिजे. आपलें काम ह्मणून हात थोडा सैल सोडला तों या दीक्षितानें आपला ताळिराम गार केला असावा. त्याला ठकवायचें ह्मणजे फारच सावधगिरी ठेविली पाहिजे. त्याच्या डोक्यांत जसा कांहीं कोल्ह्याचा मगज भरला आहे. अशी कांहीं अचानक युक्ति काढील कीं आमचींच बोटें

आमच्याच डोळ्यांत जातील आणि त्याची तुंबडी भरून राहील! स्पष्ट देत नाहीं ह्मणण्यांत कांहीं हांशील नाहीं. याला आपलीं सर्व गुह्यें माहीत, हा आपला डांगोरा पिटून आमचीं बिंगें चवाठ्यावर आणायचा! तेव्हां असें करून कांहीं उपयोगी नाहीं, होय नाहीं करित करित आतां बराच खर्च झाला, आतां आणखी कोठून पैसा आणावा असें नम्र बोलून पाय धुऊनच सांखळ्या काढून घेतल्या पाहिजेत. अशालाहि तो दाद थोडीच देणार ह्मणा! पण आपला प्रयत्न करून निदान थोडक्यांत तरी भागवावें झालें! भद्रेश्वरासारखा नीच, कपटी, खुनशी भद्रेश्वरच–

(पडद्यांत कायहो, श्रीमंत आहेत काय घरीं?)

हा घोगरा आवाज त्याचाच. बापड्याला आयुष्य तरी किती आहे कोण जाणे. यानें माझे शब्द तर ऐकले नसतील ना? त्याचा शब्द ऐकल्याबरोबर माझ्या हृदयाचा कसा थरकांप झाला.

भद्रेश्वर:–(प्रवेशून) नमस्कार श्रीमंत नमस्कार; काय चाललें आहे?

श्रीमंत:–नमस्कार नमस्कार. दीक्षित यावें बसा असे. कांहीं नाहीं स्वस्थ बसलों होतों झालें, कांहीं विचार करीत.

भद्रे०:–आतां काय बोआ तुह्मांला चिंता असणार? तुह्मी तर आतां केवळ राजे बनलां राजे. तुमच्या सुखाची तोड राजालासुद्धां मिळणार नाहीं. आतां विचार कसचा करतां? घ्या मजा मारून (स्वगत) चार दिवस.

श्रीमंत:–दीक्षित, तुह्मी असें कसें ह्मणतां बरें आतां तर विचार करण्याचे दिवस आले. इतके दिवस मी एकटा होतों. आतांची गोष्ट वेगळी आहे ह्मटलें.

भद्रे०:--(हंसून) आतां काय प्रपंच लागला होय पाठीशीं? केवढा जबरदस्त प्रपंच! राणी सरकार, आपलें कुटुंब, तुह्मी आणि श्रीमंत, वर आणखी चार गडीमाणसें आणि स्वतःची स्वारी झालीं आठ दहा माणसें. तेव्हां यांच्या पोषणाची काळजी घेतलीच पाहिजे तुह्मांला; खरें बोआ.

श्रीमंतः-तुह्मी तर माझी थट्टाच करूं लागला.

भद्रे०:-तर अगदीं एखाद्या निष्कांचन भिकारड्यासारखें बोलूं लागला तर मी खरें ह्मणेन काय! अहो तुह्मांला झालें काय चिंता वाटायला! येऊन जाऊन तुह्मी दोन माणसें. बसून खाल तर तीन पिढ्या पुरेल इतकें द्रव्य तुमच्या सांठ्याला आणि ह्मणे आतांची गोष्ट वेगळी आहे. काय बोलतां श्रीमंत.

श्रीमंत:-दीक्षित लग्नाच्या त्या अवाढव्य खर्चामुळें आतां तेवढा राम उरला नाहीं माझ्यांत.

भद्रे०:-खरेंच ह्मणतील कोण तरी. श्रीमंत करा आपली सर्व इस्टेट माझ्या स्वाधीन आणि मग पहा लग्नांत चाललेल्या खर्चासारखा खर्च चालून तुह्मांला जन्मभर कमी पडूं देत नाहीं. आहे कबूल

श्रीमंतः-तसें कुठून व्हायला. कांहीं तरी बोलतां झालें. अहो तो केवळ भ्रम आहे. बरं तें असो. आज बऱ्याच दिवसांनीं स्वारी इकडे कोणीकडे फिरली?

भद्रे०:-(स्वगत) पहा कसे परतले. (उघड) इकडेच आलों होतों ह्मटलें पाहूं श्रीमंतांना कांहीं आमची आठवण होते का?

श्रीमंत:-आठवण न व्हायला काय झालें.

भद्रे०:-आतां कुठली व्हायला आठवण. आतां राणीसाहेब आणि आपण नेहमीं आनंदांत दंग असणार. मग आमची गरीबाची काय

दाद ! पण श्रीमंत एवढें सुख प्राप्त होण्यास या गरीबाचेच श्रम उपयोगी पडले हें ध्यानांत असंद्या.

श्रीमंतः-छेः छेः तें मी कधीं विसरणार नाहीं बरें.

भद्रे०:—मुलगी पर मुलगी शोधून काढली. पाहिल्याबरोबर सर्व लोकांनीं तोंडांत बोटेंच घातलीं. तो सुदाम सावकार तर मान वर सुद्धां करीना.

श्रीमंतः-तुमची निवड अगदीं सर्वोत्कृष्ट ठरली खरी.

भद्रे०:-पुढें त्या कोदंडाला सांभाळतां बेजार होऊन गेलों. त्यानें केवढीं कुलंगडीं उपस्थित केलीं. कोतवालापर्यंत मजल पोंचवली.

श्रीमंतः-पण त्याला सुद्धां तुह्मी चकविलें. दीक्षित खरोखर तुमच्या मदतीनें ह्मणूनच हें काम शेंवटास गेलें.

भद्रे०:-अहो सबंध लग्नांत मला निश्चितपणें जेवायला सुद्धां मिळालें नाहीं. आणखी काय सांगा.

श्रीमंतः-मग काय ! आतां एकदां निश्चितपणें जेवायला बोलावूं मग तर झालेंना ! (स्वगत) ही पीडा लवकर जाईल तर बरें.

भद्रे०:-(हंसून) जेवायचें काय घेऊन बसला श्रीमंत ! आतां आपलेंच घर झालें मग जेवायला काय वाटेल तेव्हां येईनच. तुह्मी नको ह्मणतां थोडेंच.

श्रीमंतः-छेः छेः तसें कसें ह्मणावें बरें. आपले उपकार विसरून जाऊं काय आह्मी ! खुशाल वाटेल तेव्हां या.

भद्रे०-(स्वगत) फक्त जेवणावरच भागवायचें दिसतें चिन्ह. (उघड) इतके श्रम केल्यासारखें एकदां फळ आलें ह्मणून मला मोठा आनंद झाला. श्रीमंत, मी तरी इतका उगीच नाहीं झटलों. आपल्यासारख्या सज्जनांची सेवा व्यर्थ केव्हांच जाणार नाहीं हें जाणूनच एवढा खटाटोप केला.

श्री०:-(स्वगत) माझें हृदय कसें धडधडूं लागलें. हा आतां काय मागणार ?

भद्रे०:-कां श्रीमंत स्तब्धसे ?

श्री०:-नाहीं थोडें डोकें चढलें आहे हो !

भद्रे०:-(स्वगत) चढायचेंच. कांचनभट नव्हे बरें मी. (उघड) उत्तरेल आतां त्रास झाला असेल. ही श्रीमंती प्रकृति ! दोन माणसें नाहींत, घरांत यथास्थित पैसा आहे तर असें. मग दहाबारा मुलें, बायको, घरांत अठरा विश्वे दारिद्र्य, अशा स्थितींत आह्मीं काय करावें ? बाकी आतां मला दारिद्र्याची भीति बाळगायलाच नको. आपण आतां माझी ददात कायमची मिटवून टाकणार यांत शंका नाहीं.

श्री०:-(स्वगत) अबब फार मोठी उडी दिसते.

भद्रे०--फार दुखतें काय डोकें, श्रीमंत ?

श्री०:-होय हो आतां जरा मला पडूंदे. आणखी केव्हां तरी या. मी तुह्मांला वेळीं प्रसंगीं विसरणार नाहीं बरें. (निजेचें मिष करतो).

भद्रे०:-बरें येतों तर. आपण निजा कसे. [जातो]

श्री०:-(स्वगत) गेली ब्याद एकदाशी. ह्मणे माझी जन्माची ददात मिटवाल ! आतां काय बरें करावें याला टाळायला. [विचार करून] हां असेंच, हा आला कीं याला मी घरीं नाहीं ह्मणून परतवावें ह्मणजे झालें. चला आतांच्या आतां ही व्यवस्था केली पाहिजे. आणखी वेळ फार झाला. एकदां मुखचंद्र पाहिलाच पाहिजे. [जातो.]

प्रवेश २ रा.

स्थळ-रस्ता.

भद्रे० :-[स्वगत] कसा आहे कांगावखोर कृपण. डोकें उठलें काय ! अझून कुठें उठलें आहे ! जागा सोडून जाईल ह्मणावें अरे

तुच्चा भुजंगनाथा, या दीक्षिताला तूं अझून पुरता ओळखला नाहींस. तुमच्यासारख्या थेरड्यांचीं तरुण पोरींशीं लग्नें ह्मणजे आमच्यासारख्या धूर्त मध्यस्थांच्या तुंबड्या भरण्याचे योग. मी ह्मणजे तुझ्या बक्षिसाच्या आशेवर थोडाच बसलों आहे. या दीक्षिताला तुझ्या विवाहमंगलांत आठवा मंगळ होता. मला आतां जन्मभर चंगळ करितां येईल. पण तुला तेवढें बक्षीस तरी कां सोडा! रे थेरड्या–लग्नाच्या आधीं किती काकळूतीला आलास, रडलास, पाया पडलास, द्रव्यहि देतों लागे तितुकें ह्मणालास–आणि आतां आपलें काम झाल्यावर असा परतूं पहातोस? ठीकच आहे. कामापुरता मामा आणि ताकापुरतें रामायण. बरें आहे घेतों पाहून. आतां ही शारदा कुठें तुझ्यावर तृप्त रहाणार आहे? तें एक मला द्रव्यसंधान आहेच आहे. तुह्मी वृद्ध ह्मणजे पत्नीला 'जणु मांजर ताटाखालचें' तिच्याच ताब्यांत सर्व कारभार. तेव्हां तिची तबियत एकदां खुष केली कीं, आल्याच खजीन्याच्या चाव्या या दीक्षिताच्या हातांत. शिवाय ज्या श्रीमंताच्या अजागळ पोराला हाताशीं घेऊं त्याच्याकडील लग्गा तो निराळाच. अरे आह्मांला काय दुहेरी लाट. थोडी बोटें चाळवलीं कीं झालें. दुहेरी लाट–दुहेरी लाट. (पडद्याकडे जातां जातां दबकून) अरे बाप! हा तर कोदंड. (थोड्या वेळानें) मी कांहीं भ्यालों नाहीं. मी कसचा याला भितों. हें परवाचें पोर. अझून ओंठ पिळला तर दूध निघेल. दहा तीस पावसाळे अधिक काढून कसलेलीं खोडें आह्मीं. आह्मीं याला भिणार! पायांत पायांत येऊन कांहीं तरी कुलंगडीं उत्पन्न करायचा झालें. जाऊं दे. आपण आपलें इकडून जाऊं याला चुकवून. (तिकडे जाऊन दचकून) हा कोण! हा शामसुंदर हा तर अगदीं जवळच आला. आतां आपण झरास्यानें निघून जावें. (जाऊं लागतो.)

हिरण्यगर्भ :-(प्रवेशून) दीक्षित अहो दीक्षित थांबा अशी गडबड कां ! या महिन्यांत कांहीं लग्नाचे मुहूर्त नाहींत ह्मटलें. कां उसन्या गोत्रासारखा मुहूर्तही उसना घेणार ! (त्यांना आडवितो.)

भद्रे० :-[हांसून] कोण, शामसुंदर, वाः तूं कां ! इकडे केव्हां आलास ?

हिर० :-अ पण दुहेरी लाटाच्या आनंदांत निघाला जायाला; पण दुहेरी पेंचांत आडकला तेव्हांच मी आलों.

भद्रे० :-[मोठ्यानें हांसून] कां पोरा फारशी वटवट चालविली आहेस ? (स्वगत) यानें माझें सर्व बोलणें ऐकलें असावें. आतां काय करावें ?

हिर० :-उगाच कांहीं तरी बोललों झालें. बरं स्वारी इतक्या गडबडीनें निघाली होती कुठें ?

भद्रे० :—तुलारे काय करायाची ही पंचाईत ? माझ्यासारख्या हजार कामाच्या मनुष्याला रस्त्यावर अडवून धरणें हें काम कांहीं बरें नाहीं.

कोदं० :—(प्रवेशून स्वगत) तुझ्या हजार कामांत हजार अडथळे येऊन त्यांपैकीं एकाचा तरी पूर्ण विध्वंस झाला ह्मणजे मला संतोष होईल. (उघड) नमस्कार दीक्षित.

भद्रे :—[स्वगत] ही एक ब्याद आली. (उघड) नमस्कार.

कोदं० :—शेवटीं आमचें लग्न तसेंच राहिलें.

भद्रे० :—आपलें नुकसान आपणच केलें, त्यांत आमचें काय गेलें. त्यावेळीं तुझें डोकें कसें अगदीं फिरून गेलें होतें. आतां बैस हाका मारीत ! बस्स करा तुमची बडबड. माझा वेळ व्यर्थ घेऊं नका.

कोदंड :—सोन्यारुप्याच्या दर्शनानें पवित्र होणारा तुमचा प्रत्येक क्षण अमोलिक आहे. हिरण्यगर्भा, जाऊं दे त्यांना.

हिर०—दीक्षित, हिरण्यगर्भ ह्मणतांना असे चपापला कां?

कोदं० :—सोन्याचें नांव ऐकून चपापले असतील.

हिर० :—कोदंडा, मग हें तूं वाईट केलेंस. आतां हा लोभी गृहस्थ माझ्या गर्भांत हिरण्य आहे असें समजून वेळ साधून माझें पोट फाडायचा?

भद्रे० :—कायरे वाचाळ पोरांनो, काय चार्वाकपणा चालविला आहे? या दीक्षिताशीं गांठ आहे याचा विचार करून बोला. चला व्हा दूर, मला अडवाल तर याद धरून रहा. मला तुह्मी पुरते ओळखलें नाहींत. (डोळे टवकारीत हळू हळू जातो.)

कोदं० :—(आवेशानें) ओळखलें ओळखलें. पूर्ण ओळखलें. नीतीच्या चिंधड्या करणारा, धर्माला पायांखालीं तुडवणारा, हजारों बालिकांच्या सुखाला खाक करणारा, आणि ब्राह्मण्याला काळिमा आणणारा तूं एक अमंगलाचा अवतार आहेस. अथवा मी याला कां दूषण द्यावें? ईश्वरा तुझ्या घरचाच न्याय असा उलट कां? दुष्टाला यश देऊन पुनः नीच कार्यास प्रवृत्त करावें आणि असल्या तामसी वृत्तींना आळा घालूं पहाणाऱ्या कोंवळ्या अंतःकरणाच्या माणसास अपयशाच्या अंधाऱ्या खड्ड्यांत फेंकून देऊन त्याचा धीर खचवावा. यांत तुला काय बरें सुख होतें. (श्वास सोडून) तुझी इच्छा!

हिर० :—मित्रा, असा सचिंत कां होतोस? धीर धर. एका कामांत अपयश आलें ह्मणून अगदीं निराश व्हावयाचें कांहीं कारण नाहीं. चेंडूला जितक्या जोरानें जमिनीवर आपटावें तितकी अधिक उंच उडी तो घेतो तसेंच आपण अधिक जोरानें प्रयत्न करूं.

कोदं० :—पहिल्याच प्रयत्नाची ही स्थिति मग पुढें तरी काय होणार?

हिर० :—इच्छा चांगली असल्यावर तिला अपशकून ह्मणून

नाहींच ! पहिला प्रयत्न फसला ह्मणून हातपाय गाळून स्वस्थ कां बसायचें ? यःकश्चित् नारळ; त्याची कवची फोडायला सुद्धां एकाहून अधिक टोले मारावे लागतात. मग हे तर आज कित्येक वर्षांपासून लोकांच्या मनावर बसलेलें रूढीचें जाड कवच. याचा एक एक पदर सोलून जेव्हां समूळ नाहींसें होईल तेव्हांच आपला प्रयत्न सफल होणार.

कोदं० :—आपल्या हातून तें कवच सोललें जाईल ह्मणतोस ?

हिर० :—यांत काय संशय ? त्या परमेश्वराची इच्छा अशी नसेल कशावरून ? गाई, वृक्ष, त्याप्रमाणेंच सत्कृति या कालें करून फलणाऱ्या आहेत. धीर धरून अव्याहत प्रयत्न मात्र चालू ठेवले पाहिजेत..

कोदं० :—हा देह तर आतां जनकार्याला वाहिलेलाच आहे. शारीरिक विषयसौख्यावर लाथ मारून, त्रिकरणांना फक्त जनहित हें एकच ध्येय राखिलें. आतां मला या विचाराशिवाय दुसरा उद्योग काय राहिला ?

हिर० :—प्रत्यक्ष अनुभवानें जें काम एका क्षणांत होईल तेंच शाब्दिक उपदेशानें करूं ह्मटल्यास त्याला कित्येक वर्षेंही पुरणार नाहींत.

कोदं० :-अनुभव, अनुभव. [विचार करून] आहे खरी ही एक अजब शक्ति (थांबून आनंदानें) हिरण्यगर्भा, अथवा त्या जगन्नियंत्याचा असा विचार कां नसावा ? कीं, वृद्धकुमारी विवाहापासून काय तोटे होतात ते प्रत्यक्ष लोकांच्या नजरेस येऊन त्यांनीं त्यापासून परावृत्त व्हावें.

हिर० :-यदृच्छा ही केव्हांही अकळ आहे.

कोदं० :–आणि असेंच जर असेल तर झाली ही गोष्ट फारच उत्तम झाली. हे जरठकुमारीविवाह आतां आपले भयंकर परिणाम लोकांपुढें मांडतील.

हि० :–मग त्याचा भयंकरपणा शब्दांनीं अधिक विशद करून दाखविण्याचें काम आपलें.

को० :–अहाहा! त्या सर्वसाक्षी परमात्म्याचें हें एक आह्मांला साहाय्यच ह्मणावयाचें. देवा, तुझ्या न्यायाबद्दल आह्मां अदूरदृष्टि मानवांची अज्ञानानें भलतीच कल्पना होते. पण तूं खरा न्यायी व सत्कृतिपरांचा पाठीराखा आहेस. निराशेच्या भरांत मी तुला दूषणें दिलीं याबद्दल मला क्षमा कर. बरें, हिरण्यगर्भा, आतां आपल्या प्रयत्नांची दिशा कशी ठेवावयाची?

हि० :–जरठकुमारी विवाहाचे वाईट परिणाम लोकांना दिसले पाहिजेत ह्मणून आज आपण स्वस्थ बसावें असें नाहीं मला वाटत. आज भद्रेश्वराचे कांहीं आत्मगत विचार माझ्या कानावर आले. त्यावरून तो आणखी एका दुष्ट कृत्याच्या विचारांत असावा अशी माझी समजूत आहे.

को० :–काय–काय ह्मणतोस?

हि० :– त्याला पैशाखेरीज जगांत कांहीं सुद्धां दिसत नाहीं. वृद्धांशीं विवाहबंधनानें जखडलेल्या बालिकांना आतां सच्छीलापासून भ्रष्टविण्याचा त्याचा विचार आहे.

को० :–हरहर! काय हें विडंबन! धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांचें मूळ जें विवाहमंगल त्याची काय ही दुर्दशा! अरे नीचा भद्रेश्वरा, तूं जन्माला तरी कोणत्या मुहूर्तावर आलास? तिथि, वार, नक्षत्र, करण आणि योग या पांचही अंगांनीं आपापला अत्यंत अभद्रपणा तुझ्या जन्माचे क्षणीं धारण केला होता काय? किंवा–

रावण, कंस, शिशुपालादिक असुरांनीं आपापले अंश देऊन तुझा हा पुतळा बनविला आहे? तुझ्याकरितां त्या यमाला नवीन नरकच निर्माण केला पाहिजे.

हि० :–जाऊंदे त्याला आपल्या पातकाचे घडे भरूं दे. आपण आपल्याकडून या बालिका शीलच्युत होणार नाहींत, आपल्या कुळाला काळोखी लावणार नाहींत असा प्रयत्न केला पाहिजे.

को० :–हिरण्यगर्भा, खरोखर तुझ्यासारखा विचारवान व सत्पथ-दर्शी स्नेही मला मिळाला ह्मणून मी आनंद मानावा तेवढा थोडाच आहे.

हि० :–असो. आपण प्रयत्नाला लागूं. आणि एवढें कार्य झाल्यावर तूं गृहस्थाश्रम स्वीकारावास.

को० :–काय? गृहस्थाश्रम! आतां तें नांव विसर. गेल्या कार्यांत यश आलें नाहीं तर आजन्म ब्रह्मचर्य पाळीन अशी गुरुपदाची शपथ वाहिलेली तूं विसरलास काय? अरे हे विवाहसंस्काराचे चाल-लेले धिंडवडे बंद केले तर त्यांत मी स्वतःचा विवाह करून सद्धर्मानें वागून जें पुण्य प्राप्त होईल त्याहून अधिक पुण्य आहे.

हि० :–बरें त्याचा विचार पुढें पाहतां येईल. तूर्त आपण संग-मनाथाच्या ओरींत जाऊन एकांतांत शांतपणें पुढील प्रयत्नाबद्दल विचार करूं.

को० :–पुढें तरी लग्नाबद्दल कसला विचार करणार! माझी प्रतिज्ञा पुनः ऐक. ब्रह्मचर्यानें राहून सर्व इंद्रियांचें दमन करीन. ऐहिक सुखाकडे लक्ष न देतां, जगाची आध्मात्मिक उन्नति होऊन, त्यांनीं नीतिबंधनें शिथिल करून अनाचाराध्यें स्वैर वावरू नये इत-क्याकरितांच या देहाची योजना आहे; असें समजून, तो फक्त अशाच कार्यांत खपविणार! याला साक्षी सद्गुरुचरण.

हि०:-(हंसून) ठीक. ठीक. [जातात.

प्रवेश ३ रा.

कांचनभट :—मला त्या थेरड्या भुजंगनाथानें फसवलेंच शेवटीं अं! कन्याधन निम्में देऊन निम्याला दिला चट्टा. मींही विचार केला. आतां व्यर्थ अधिक जिकीर करण्यांत अर्थ नाहीं. हा झाला पिकलें पान. पुट्कन नाहींसा होईल मग मालकी माझ्या शारदेचीच. अंह! मी तिचा बाप म्हणून माझी. मग एवढ्याशा कन्याधनाबद्दल जिकीर करून त्याचें मन बिघडवून एवढी मोठी लक्ष्मी चालून आलेली तिला लाथ मारूं काय? मी कन्याधनाचें पुनः नांव म्हणून काढलें नाहीं तें मला पथ्यावरच पडलें. आमच्या जामातांना आतां केव्हां बोलावणें येईल याचा नाहीं नियम! शारदा बिचारी भोळी पोर! तिला कांहीं समजणार नाहीं. आणि इस्टेट सगळी चोरापोरींच नाहींशी होऊन जाईल. म्हणून म्हटलें आपण जवळ असावें. शारदेशिवाय आम्हाला करमत नाहीं अशी दिली थाप झोंकून जामाताजवळ आणि चार दिवस रहायला इकडे येतों म्हणून दिलें येथेंच बिऱ्हाड ठोकून. ते आपल्या वाड्यांत राहण्याबद्दल आग्रह करीतच होते, पण म्हटलें दूरवर विचार केला पाहिजे. लोक म्हणणार सासरा बुडवायला राहिला. म्हणून केलें निराळें बिऱ्हाड. हेंही घर त्यांचेंच! आपल्याला काय अधिक खर्च न होतां रहायला सापडून आपलें काम साधण्यास कारण. जावईबुवांचें घर म्हणजे सध्यां आम्हांला एक कामधेनूच सांपडली आहे. आज अमुक जिन्नस नाहीं आणा तिकडून. अमुक संपलें करा जांवईबुवांच्या घराची प्रार्थना. मिळून काय, वाण म्हणून कशाची नाहीं. मी तरी आतां वृद्धच. माझ्या आधीं एकदां इथला कारभार आटोपला

ह्मणजे सर्व व्यवस्था करून ठेवतां येईल. आधींच जर माझें कांहीं कमी जास्ती झालें, तर हा सगळा पोरांडा घेऊन ही आमची खुळी करणार काय? पण त्याच्यापुढें काय इलाज? तूर्त दिवस मोजीत राहिलें पाहिजे. असो, अलीकडे ही सदोदित उदासच असते, पहिल्यासारखी बोलत नाहीं चालत नाहीं. सर्व व्यवहार मुक्याने. माझ्यासारखी दूरदृष्टि जर तिला असती तर तिची अशी स्थिति केव्हां ही झाली नसती. जाऊं द्या बायकांची बुद्धिच तेवढी! जयंत्या! अरे जया!

जयंत–(आंतून) ओ, ओ, ओ, बाबा.

कांच०:–अरे ओतोस काय? इकडे ये असा.

ज०:–(येऊन) काय?

कां०:–का कपाळाला आंठ्या कां अशा? आणि हा अंगांतला सदरा इतका घाण कां झाला.

ज०:–अक्काच्यांतल्या परटाकडे धुवायला टाकला तो अजून आला नाहीं.

कां०:–(स्वगत) शाबास, पोरगें मात्र कांहीं माझ्या वळणावर जाणार. (उघड) कायरे अक्काच्या घराकडे गेला होतास कां आज?

ज०:—गेलों होतों.

कां०:—मग आज अक्कानें काय दिलें खायाला!

ज०:—तिच्याजवळ मी मागतच नाहीं. आईनें मला मागूं नको ह्मणून सांगितलें. ती मला ह्मणाली मी तुला इथंच देईन खायाला बाबा अक्काजवळ कां मागायचें नाहीं हो!

कां०:—कोण ह्मणतें नाहीं ह्मणून! खुशाल मागावें. ती वेडी आहे तिला काय कळतें? काय करती रे ही आंत?

ज०:—कोण आई? ती बसलीय माजघरांत तांदुळ नीट करा-

यला घेऊन. आणि बाबा सांगू का ? ती रडती हो. बाबा तिला रडायला काय झालें. तुम्ही मारलें होय ?

कां०:—जा कार्यां विचार जा तूंच. [जयंत जातो] काय करावें इची ही सदा रडारडी चाललीच आहे. किती सांगितल. झाल्या गोष्टीला इलाज नाहीं म्हटलें. मी सुद्धां रडलों पण आपलें तिचें तें खरें. ठीक आतां एकदां शेवटचा उपाय करून पाहूं. [पाय आपटीत जातो.]

[दुसरा पडदा उघडून आंत इंदिरा तांदळाचें सूप पुढें असून कपाळावर हात ठेवून बसली आहे.]

इं०:—आईबाप म्हणजे मुलाचें प्रेमस्थान, हितकर्तें, आपल्या अनुभवाचा फायदा देऊन मुलांना जगांत सुखानें कालक्रमणा करित येईल असें शिक्षण देण्याची दक्षता ठेवणारें, आणि सदैव त्यांच्या कल्याणाचेंच चिंतन करणारें दैवत. मग आम्ही शारदेचे आईबापच काय ? कोण म्हणेल ? आम्हीं तिचें काय हित केलें ? ज्याच्या गोंवऱ्या मसणांत गेल्या अशा—नको नको ग बाई ती आठवण. देवा, माझे डोळे एकदां लौकर मीट. पोरगी कशी दिवसेंदिवस खंगत चालली. नुकतीच उमलायला लागलेली जाईची कळी, जर विस्तवाजवळ ठेवली तर तिला करपून जायाला काय वेळ लागणार? माझ्या शारदेचे ते टपोरे डोळे, बोटबोटभर खोल गेले ! ती गालावरची लाली सुकून गेली. ओठ कोरडे पडत चालले. चार दागिने आंगावर घालून उंची साड्या नेसून वावरायचे हे माझ्या पोरीचे दिवस. पण तिला दागिन्यांची की कशाची इच्छा म्हणून राहिली नाहीं. ती घरांतून बाहेर तर पडतच नाहीं. संसार करून सर्व गोष्टींचा अनुभव घेतलेल्या पोक्त आजीबाईसारखी ती दिवसेंदिवस निराशच

होत चालली आहे. तिचें बरोबरच आहे. तिला आशा करायला आम्ही जागा कुठें ठेविली? ' ज्याच्यावर चढून त्याच्या आधारानें हिनें यौवनभरानें विकसून जावें तो हा वृक्षच जर ठिकठिकाणीं मोडून पडूं लागला तर त्या वेलीची तरी वाढ कोठून व्हावी? ज्याची प्राणज्योत तेल नाहीं म्हणून मंदमंद ज्वळत आहे व क्षणोक्षणीं मालवण्याची भीति आहे असा दिवा हातीं देऊन आम्ही तिला अंधाऱ्या रात्रीं घोर अरण्यांत एकटीलाच सोडून दिली–देवा! हा आमचा अपराध तुला सहन कसा होईल! पोरीनें जरी प्रत्यक्ष बोलून नाहीं दाखविलें तरी तिचा तळतळाट आम्हाला लागणार! [डोळ्यांस पदर लावून रडत रहाते].

कां० :—[प्रवेशून] हेंच कां तांदूळ नीट करणें चाललें आहे! तुझ्या डोळ्यांतलें हें कढत पाणी त्या तांदळांत पडून त्याचा सुपांतच भात होऊन जाईल. मग माझ्यासारख्या कडक सोंवळ्याच्या ब्राम्हणाला तो येईल कां खातां? कां बोलत कां नाहींस? वेळ नाहीं अवेळ नाहीं तुझें आपलें सदोदित रडें? हें आहे तरी काय प्रकरण?

इं०:—काय असायचें? (डोळे पुसते).

कां० :–म्हणजे आम्हीं यांत काय ओळखावें?

इं०:–ज्यानें केलें त्याचें त्यालाच न ओळखायला काय झालें?

कां०:–म्हणजे! आम्हींच तुला रडायला लाविली म्हणेनास?

इं०:–मी नको म्हणत असतांना इथें रहायाला यायचें. मेलें डोळ्याआड मसणपाड म्हणून कशी तरी मूग गिळून स्वस्थ बसलें असतें. पण इथें दररोज पहावें लागणार, ऐकावें लागणार, नी लोकांचीं बोलणीं सोसावीं लागणार तीं निराळींच.

कां०:–लोकांचे काय खाल्लेत आम्हीं चार चव्वल, बोलणीं सोसायला?

इं०:–पण जनाच्या तोंडाला कोणी हात लावायचा आहे.

कां०:–चरें बरं! मोठी आली वेदांत सांगयला. तुला नाहीं मागचा पुढचा पोच.

इं०:—मी काय केलें?

कां०:–सदा सर्वकाळ रडत बसतेस; त्या जावयाला कळलें तर त्याला काय वाटेल बरें! आपण त्याच्या घरांत राहिलों आहोंत. आपल्याला त्याच्याकडून कांहींना कांहीं उपयोग होतो आहे. असा श्रीमंताचा आश्रय शोधायला गेलों तर मिळायचा नाहीं; इकडे दृष्टि देऊन समाधान मानून घ्यायला नको काय?

इं०:—कशाचें समाधान मानूं? कळून सवरून मुद्दाम पोरीला पेटलेल्या खाईत ढकलून दिली म्हणून—

कां०:—[रागानें] हां चूप! दिवसेंदिवस जास्तीच शेफारत चाललीस! पोरीला खायींत ढकलली म्हणायला लाज नाहीं वाटत? तिला काय कमी आहे?

इं०:—पुष्कळ आहे. धन आहे, धान्य आहे, घर आहे, दार आहे. पण स्त्रियांला मुख्य जें सुख तें आहे कां! मग हें इतर घेऊन करायचें तरी काय!

कां०:—मी म्हणतों शारदेसारखी भाग्यवान् मुलगी नाहीं मिळावयाची. आज जर तिनें मनांत आणिलें तर आपले आईबाप, भावंडें जन्मभर पोसण्याचें तिला सामर्थ्य आहे. कां खरें कीं नाहीं?

इं० :—खरें! खरें! अगदीं खरें बरें! जो तो आपल्याच भातावर वरण ओढणार! देवा! या पोरीला कशाला रे या घरांत जन्म दिलास! एखाद्या भिकाऱ्याला, बैराग्यालासुद्धां आपल्या पोराची याहून काळजी अधिक असते.

कां०:-होय, होय, मला काळजी नाहीं. मी निर्दय आहें. माझें काळीज दगडाचें आहे मग काय म्हणतेस?

इं०:—कांहीं नाहीं म्हणत. आपण आपल्या गांवीं जाऊं रहायला.

कां०:-तुला जायचें असेल तर खुशाल जा. मी कांहीं येणार नाहीं.

इं०:-इथेंच रहावें आपण! मग लोक आपल्याकडे बोटें करून हंसतील तें सोसावें. मला तर इथें बाहेर तोंड काढण्याची लाज वाटूं लागली.

कां०:—कां लाज कशाची?

इं०:—हीच ती पोरविकी म्हणून लोक थुंकतात ना तोंडावर!

कां०:- बस्स बस्स! तें कांहीं नाहीं! बाहेरचीं बोलणीं तुला किती त्रासाचीं लागतात कोण जाणे! पण सध्यां तुझ्या बोलण्यानें मी मात्र अर्धमेला होत चाललों. रोज रोज असलीं कठोर भाषणें ऐकून घेऊन कोणीं रहावें? मी आपला चालता होतों काशी प्रयागाला. आणि घेतों संन्यास.

इं०:-असें मागून पस्तावण्यापेक्षां आधींच विचार केला असतां तर!

कां०:— आम्ही मूर्ख, अविचारी! तूं आतां आम्हांला बोलायचें कारण नाहीं. तुझा आमच्यावरचा हक्क उडाला.

इं०:— म्हणजे हें काय बोलणें?

कां०:— तर काय? संन्यासी झाल्यावर गृहस्थाश्रमींच्या माणसांचा संबंध कुठें राहिला?

इं०:— भलतें सलतें काय बोलावें?

कां०:— यांत भलतें सलतें तें काय? तुला हें खोटेंच वाटत असेल! पण आतां मला विसर; मी खरोखरच संन्यास घेणार. जयं-

ताला सांभाळ आणि खुशाल रहा. हा पहा मी निघालों (कपडे काढून) हीं कापडें तरी मला आतां काय करावयाचीं ?

इं०:— असें काय करायचें वेड्यासारखें ?

कां०:— वेडच लागल्यावर शहाण्यासारखें वागायाला कोठून येणार ? मग वेडाच तो.

इं०:— तर मग खरेंच कीं काय आपण संन्यास घेणार ?

कां०:- अझून तुला भ्रांतिच आहे ? हा पहा निघालों तडख काशीला.

इं०:- [उठून त्याचे समोर उभी राहून] मी बरी जाऊं देईन ? बायकोच्या परवानगीशिवाय कसा संन्यास घेतां पांहूदे मला !

कां०:—चल हो दूर ! मला आडवूं नको. माझा तुझा संबंध काय ?

इं०:- (दुःखानें) ह्मणजे ? आपण माझ्याशीं लग्न नाहीं कां केलें ? मी आपली बायको नव्हे कां ?

कां०:- नव्हेस नव्हेस, तूं माझी कोणीच नव्हेस.

इं०:- (मट्कन् बसून) फुटलें कपाळ ! पोरीचें तसें नी यांचें हें असें ! देवा धांव. नका बरें असें मला गांजू !

कां०:- मी तुला गांजतो ना ? मग मला कां आडवतेस ? आयतीच ब्याद जाते ह्मणून स्वस्थ रहा.

इं०:- पायां पडतें. असें नका निष्ठुर होऊं !

कां०:- तर काय इथें राहूं ? कांहीं नको ? तूं, पोरीचें नुकसान केलें, तिच्या जन्माचें मातेरें केलें, यँव झालें त्यँव झालें, ह्मणून बोलून बोलून रोज मला भाजून काढशील त्यापेक्षां एकांतांत जाऊन खुशाल हरि हरि ह्मणत उपाशी राहिलेलें बरें !

इं०:- चुकलें ! आजपासून त्याबद्दल ब्र सुद्धां काढणार नाहीं. पदर पसरतें.

कां०:– जित्याची खोड मेल्याशिवाय नाहीं जायाची. तें तुझें पदर पसरणेंही नको आणि पुनः इथें जोडे खात राहणेंही नको. [वर पाहून] देवा, सोडव या मायापाशांतून!

इं०:–(पाय धरून) जायचेंच तर मला आधीं मारा; मग चला.

कां०:– तुझा कां माझ्यावर जुलूम!

इं०:– महाराज, नाथ, स्त्रियांना पतीशिवाय दैवत नाहीं.

कां०:– ह्मणूनच, त्याला एकसारखें बोचून खाणें ही त्याची पूजा असेल, नाहीं बरें? सोड सोड पाय! जाऊं दे मला.

इं०:– माझी मान धडापासून सोडवून जायचें!

कां०:– स्त्रीहत्येचें पातक कोण घेणार?

इं०:– तर मग मीच डोकें फोडून घेऊन पायांशीं प्राण देतें.

कां०:– तुला प्राण द्यायला काय झालें! माझ्याकरितां प्राण देऊन माझ्यावरच पुनः स्त्रीहत्त्या घालणार तूं!

इं०:– त्या जयाकडे बघून तरी रहा. आपण गेलांत कीं मी क्षणभरही जीव ठेवणार नाहीं. मग जया होईल पोरका!

कां०:– त्याला आहे त्याची अक्का!

इं०:– पण इतकें विरक्त व्हायला काय झालें. मी आपली आजपासून आज्ञेंत वागेन एक अक्षरही विरुद्ध बोलणार नाहीं, या पायाचीच शपथ.

कां०:— माझी तुला कितपत काळजी आहे दिसतेंच. मग माझ्या पायावर हवाला द्यायला तूं कां भिणार? गेले तर माझे पाय, जाईनात.

इं०:—चार दिवस पहा मग वाटेल तें करा.

कां०:– [गंभीरपणानें] पहा विचार कर पुनः जर जास्ती कामी झालें तर मी ऐकणार नाहीं.

इं०:– जास्ती कमी नाहीं होऊं देत. पण फसवून नाहीं ना जाणार ?

कां०:– [द्रवल्यासारखें] काय करावें ! मायापाश मोठा बिकट खरा. ही असें बोलूं लागल्याबरोबर मन विरघळूं लागलें. वेडी खरो-खरच भाबडी वेडी. नाहीं बरें फसविणार. पण आपलें वचन मात्र पाळ. जा मला ती कळशी आणून दे. मी येतों स्नान करून कृष्णा-बाईवरून. [इंदिरा जाते.] मात्रा बरोबर लागूं पडली. आतां जरा कुरकुर केली कीं करा संन्यासाची तयारी. कीं आलीच पुनः ताळ्या-वर. ही एक जादूची कांडीच आली हातांत ह्मणावयाची. भोळी बिचारी तिला आमचा हा कावा काय ठाऊक ? (पाय वाजतात.) असो. ती आलीच. देवानेंच खैर केली ह्मणून लौकरच ताळ्या-वर आली. (जांभई देत कानास हात लावून) शिवाय गुरवे नमः शिवाय गुरवे नमः थंडीच्या दिवसांत आळसच जात नाहीं लौकर आंगांतला.

इं० :—(घागर ठेवून) तिकडच्या तिकडे नाहींना जाणें होणार.

कां० :—वेडी कुठची. अग एकदां बोलल्यावर ? [स्वगत] द्रव्य आणि लाग सोडून [उघड] असें कुठें झालें काय ? इतक्यांत येतों बघ. [हंसत हंसत जातो.]

इं :—(तो गेलेला पाहून सुस्कारा टाकून स्वगत) बाप भीक मागूं देईना नी आई पोटाला घालीना. तश्शी अगदीं तश्शी माझी स्थिति झाली. पोरीची ती दशा पाहून पोटांतून अगदीं कालवून येतें. ह्मणून कुठें ओकायची पंचाईत. बाहेर तर पडायचेंच नाहीं. घरांत आपल्या आपल्यांत रडत बसावें तर इकडचा धाक. तोंड बांधून बुक्यांचा मार. देवा ! माझें मन दगडासारखें घट्ट कर. आणि डोळ्याला हे प्रकार दिसूं नयेत असें आंधळेपण दे. [हात जोडून वर पहात अश्रू गाळते.]

शारदा :—(प्रवेशून मार्गे उभी राहून स्वगत) काय ही आई-ची दुर्दशा. हिच्या डोळ्याचें पाणी एक पळभरसुद्धां खळत नाहीं. आतां माझी स्थिति असें रडून कां सुधारणार आहे? पण आईचें आंतडें, त्याला राहवत नाहीं. मी मात्र दुर्भागी. माझ्यापासून आईला असा त्रास होतो. आपणच आतां आनंद उसना आणून इची समजूत घालावी. [डोळे झांकून दचकल्यासा० क०] आई—

इं० :—[दचकून डोळे पुसून] कोण शारदे, केव्हांशीं आलीस?

शा० :—आलें आतांच. [बसून] पण आई ... [संशयानें थांबते].

इं० :—कां! आई ह्मणून थांबलीसशी.

शा० :—नाहीं. ह्मटलें विचारावें कीं नको.

इं० :—काय काय तें? खुशाल विचार.

शा० :—दुसरें काय विचारणार. आज असा चेहरा पडलेला कां.

इं० :– (श्वास सोडून स्तब्ध राहते.)

शा० :– ह्मटलें ह्मणजे आतां तूं चांगलें आनंदांत असावें. येऊन जाऊन काय ती माझ्या लग्नाचीच काळजी तुह्मांला होती. आतां मला चांगल्या ठिकाणीं सुखांत पडलेली पाहून—

इं० :–(तिचें बोलणें मध्येंच थांबवून, तिच्या तोंडाकडे भेदक-दृष्टि लावून) शारदे—

शा० :–(चेहऱ्यांत पडलेला बदल न दिसावा ह्मणून खालीं मान घालून गद्गद स्वरानें) काय.

इं० :–(तिचे दोन्ही हात धरून) वर पहा मजकडे. तूं हें माझ्या समाधानाकरितांच ना बोललीस? (ती वर पाहून पुन्हां खालीं पाहते) होय असेंच (हात सोडून) बघ तूं तोंड पुनः खालीं घातलेस! शारदे, नको बरें अशी बोलूं!

शा०:- (स्वगत) मी करायला गेलें एक आणि झालें भलतेंच. (उघड) मी नाहींग तुला त्रास व्हावा ह्मणून बोललें. आतां झाली गोष्ट शोक करून परतणार आहे कां ? माझ्या नशिबानें मी ज्यांच्या पदरीं पडलें तेच मला आतां देव. असल्या स्थितींत संतोष मानून मी आपलें आयुष्य सुखांत कंठीन. तुह्मी आतां कां दुःखीकष्टी होतां ?

इं०:- (जोरानें श्वास सोडून) आतां तूं तेवढी उपदेश करायची होतीस ! बरें बाई ! तुझें मन खरें पवित्र ! तूं आह्मांला दोष देत नाहींस ?

शा०:- यांत तुमचा तरी काय दोष ?

इं०:- शारदे ! पोरी तुला आह्मी आईबाप शोभत सुद्धां नाहीं ? परमेश्वरा- (रडूं लागते.)

शा०:- हेंग काय आई ? असें करशील तर मी उद्यांपासून यायची सुद्धां नाहीं इकडे.

इं०:- (डोळे पुसून) बरें ! तुझेंच ऐकतें. डोळे कोरडे ठणठणीत करून ठेवतें. इतक्यांत येणें होईल. आल्याबरोबर अशी मला रडतांना पाहिली तर होईल पुनः संन्याशाची तयारी.

शा०:- ह्मणजे ? एकदां झाली होती काय ?

इं०:- तें काय सांगूं-मला आतां तुझ्याबद्दल एक अक्षरसुद्धां बोलतां कामा नये.

शा०:- (स्वगत) पहा बापडीला कसा जाच होतो. (उघड) राहुंदेतच त्या गोष्टी तर मग ! (हंसतमुख) वेणी घालतेसना माझी ? तुझ्या हातची वेणी फार पसंत पडते बरें !

इं०:- कुणाला ? श्रीमंतांना कां ? बरें तर ! (आंत फणी करंडा वगैरे सामान आणण्यास जाते.)

शा०:- (स्वगत) आतां असेच कांहीं विषय काढून इचें मन रिझविलें पाहिजे. सदां तोच तोच विषय मनांत घोळूं लागला तर बापडीला वेड सुद्धां लागेल.

इं०:- (येऊन) पण आज मूद गजरा बिजरा, फुलें कांहीं आणलेस कां ?

शा०:- आज काय सण कां आहे ?

इं०:- पण रोज घालू नयेत कीं काय ? असल्यावर घालावयाला काय हरकत ? आणि तूं—(थांबते.)

शा० :-आणि मी काय ?

इं० :-कांहीं नाहीं. उगीच—[सुस्कारा].

शा० :--उद्यां संक्रांत आलीच आहे. तेव्हां घालीन म्हणे सर्व दागिने. पण वेळ किती झाला पाहिलेंस कां? बाकी मला तरी आतां घरीं जाऊन काय काम करायचें आहे म्हणा. पण जवळ असलेलें बरें!

इं० :-इतकें अगदीं चालतें काय? [शारदा मुरका मारते] दुसरे तिसरेपणावरची इतकी लाडकी असायचीच. पण तुझ्यावर त्यांची खरीखुरी प्रीति आहे कां ग?

शा० :-[लाजून पण हांसत] हें ग काय विचारतेस? मला नाहीं ठाऊक!

इं० :-ठाऊक नसायला काय झालें?

शा० :-आटप बाई लवकर!

इं० :-(खुलून) कां थोडा वेळ लागला तर रागावणें होईल काय? [शारदा लाजते]

पडद्यांत—[कांकडत] शिवाय गुरवे नमः शिवाय गुरवे नमः ! अं हः हः हः ! काय ही थंडी. (शारदा व इंदिरा जाऊं लागतात.)

कांचन० :–(प्रवेशून) कोण शारदा काय? बरें फावलें ग तुला? [घागर पिळे ठेवतो]

शा० :–न फावायाला काय झालें?

कां० :–तसें नव्हे. घटकोघटकीं जवळ पाहिजेस ह्मणून विचारलें! लाजायला नको कांहीं इथें. (हंसून) पोरी तूं मोठी भाग्याची बघ! (ती आंत जाते) पोरगी पण पोरगी. कशी आनंदांत असते. नाहीं तर ही. बरें! आतां पूजा वगैरे आटोपून बसावें. [गडबडीनें आंत जातो.]

प्रवेश ४ था.

स्थळ :–सुदाम सावकाराचा वाडा. पात्रें सुदाम व दामिनी.

(दामिनी शृंगार करीत बसली आहे. सुदाम तिजकडे पहात पलंगावर पडला आहे. असा पडदा उघतो.)

दामिनी :–इश्श! हें काय? आणायचा गडे तेवढा आरसा इकडे!

सुदाम :–मी निजलेला, मी उठून आरसा आणल्यापेक्षां, तूं बसलेली आहेस, तूंच आणलास तर?

दामि० :–अहाहा! काय बोलणें तरी! जशी कांहीं रिकामीच बसलें! आतां कुठें या टिका, ठुशा हा चंद्रहार घातला; अजून किती तरी दागिने घालायचे आहेत. मी ते घालायला लागतें, तंवर आपण काय करणार पडून?

सुदाम :-तुमचें कौशल्य पहाणार!

दामिनी :–तर मग तें आरशाशिवाय कसें दिसणार?

सुदाम :–आरशानें दिसणार तुह्मांला, आह्मांला दिसतें असेंच!

दामिनी :-तर मग आह्मी आमचे दागिने घालणेंच थांबवतों.

सुदाम :-छेः छेः ! तसें नका करूं.

दामिनी :-आमचें काम नाहीं करायचें मग आह्मीं तेवढें कां ऐकावें?

सुदाम :-भारी बुवा हट्ट !

दामि० :-यांत कसला हट्ट ? असें मीं सांगितलें तरी काय करायला ?

सुदाम :-बरें ! आरसा न आणतां आह्मींच आमच्या देवीला अलंकार केले तर (?) नाहीं कां चालणार ?

दामिनी :-कांहीं नको करायला. आरसा आणायला सांगितला कुठें तो त्याला लाविली एवढी लांबड !

सुदाम :-नाहीं. हें काम आह्मीं आमच्या हौसेकरितां करणार. [उठूं लागतो].

दामिनी :-मी नाहीं करूं देणार ? हा काय जुलूम ?

सुदाम :-जुलूम कसला ही तर पतिपत्नींची विलासी हौस !

दामिनी :-इश्श. काय पण हौस ? ह्मणे आपल्या हातांनीं दागिने घालणार ! कांहीं नको ! ते हात माझ्या दागिन्यांची कळा खातील.

सुदाम :-(किंचित् रोष) काय—

दामिनी :-तेच तेच ! हे सुरकुत्या पडून, वाळष्या काटकीसारखे झालेले हात, या दागिन्यांची कळा खातील. [हांसते]

सुदाम :-(बळेंच हांसून) पण...पण...याच हातांनीं (हात तिच्याकडे करितो ते कांपतात) मिळवलेले हे दागिने आज तूं आंगावर घालतेस ! हें पक्कें समज.

दामिनी :-समजलें ! समजलें ! पक्कें समजलें ! काय झालें मिळवले ह्मणून ? त्यांना शोभा यायला पण, ते या अंगावरच पडले पाहिजेत ! (हांसते.)

सुदाम :–आणि या हातांनीं—होय ना ?

दामिनी :–ते हात घालावेत नेऊन + + + ! घटकोघटकीं हे हात! हे हात! घ्या घ्या ते हात मागें! पहा लागले कसे थरथर कांपायला.

सुदाम :–(विरमून किंचित् रागानें) तूं हें तुझ्या लग्नाच्या नवऱ्याला बोलतेस ?

दामिनी :–होय होय! तो झाला ह्मणून काय? कांहींच विचार नको कां करायला? या माझ्या स्वरूपाला हें आपलें कितीसें शोभणार याचा पुरता विचार करून बोलावें.

सुदाम :–[पश्चात्तापानें] चुकलों. चुकलों खराच. हें अलंकार तरी कोणाकरितां करणार आपण ?

दामिनी :–अलंकारांकरितां आणि माझ्याकरितां. समजलां. आमची हौस आतां आह्मीं आणखी कशानें पुरवायची ? आमचें लग्न लागलें, त्याबरोबरच आह्मी क्रीडा करून जन्म कंठणार.

सुदाम :–[हर्षानें] तर मग इतका वेळ सगळा विनोद व—

दामि :–पहा, हुरळले कसे! विनोद नव्हे बरें तो. आमचें लग्न कांहीं आपल्याशीं नाहीं लागलें. आपल्या पैशाशीं, या–याच दागिन्यांशीं लागलें बरें कां. आतां स्वस्थ पडावें न बोलतां. माझें डोकें नका उठवूं उगीच. (पलंगावर धाड्कन पडतो) अस्सें. (उठून आरसा घेऊन दागिने घालीत आपल्याशीं गुणगुणते.)

सुदाम :–(सुस्कारा टाकून) मी कुठें आहें ? माझ्या घरांतच काय ? कोणाचें घर ? हाय. मीं माझ्या हातानें माझी मान कापली. माझें द्रव्य, माझें घरदार, माझें सर्वस्व, मीं आपण होऊन दुसऱ्याच्या हवालीं केलें. आतां तें दुसऱ्याचें झालें. आणि मी...मी...मी पूर्वींसारखाच एकटा अगदीं एकटा राहिलों. इचें लग्न पैशाशीं

लागलें आणि मी पुण्याहवाचनाला बसलों होतों. सुदाम! फसलास रे फसलास. ठार बुडालास. जन्मभर कष्ट करून, रक्ताचें पाणी करून लोकांचे शाप घेऊन द्रव्य मिळवलेंस, पण शेवटीं स्वतःच दरिद्री होऊन बसलास. तुझ्या पैशाकरितां एकाद्या वेश्येनें तुझ्यावर खोटी पण तुला आवडण्यासारखी ममता केली असती! तुझा पैसा संपेपर्यंत इंद्रभुवनांतलें सुख दाखविलें असतें! पण तूं तें सुख कायमचें करायला पाहिलेंस! आपल्याला सर्व प्रकारांत वांटेकरीण पाहिजे ह्मणालास, पण आतां—आतां—सर्वस्वी नागवून कफल्लक होऊन बसलास, आतां ही तुझी मालकीण, ही तुला गोंजारील तेव्हां तूं तिच्यापुढें शेंपूट हलवावीस! लाथाडील तेव्हां दूर जाऊन दीनवाणें तोंड करून पडावेंस! तिच्या लहरीवर तुझें सुखदुःख! हाय! हाय! [बावरून] हें कोण माझ्या कानांत ओरडतें! अरे बाप! केवढा हा आवाज! ' सुख पाहतां जवापाडें। दुःख पर्वताएवढें ॥ खरें आहे! मी मी जातोंच आतां. हिंडतों थोडा बागेंत. [पळत जातो.

दामिनी :–[हांसून] ठीक झालें. गेली ब्याद एकदाशी. काय पण बडबड चालविली होती. आतां वेड लागणार स्वारीला खास! (पाहून) हात्तेच्या हें काय झालें या ठुशा पुनः गेल्या आपल्या गळ्याला टांगायला. बिरडेंच सैल केलें पाहिजे. हां आतां ठीक जुळलें. आतां ती कादंबरी थोडीशी वाचून करमणूक करावी. (पुस्तक काढून) कुठपर्यंत बरें झालें आहे. हां. सांपडली ही खूण. (ऐटीनें खुर्चीवर बसून वाचूं लागते.)

†' कमल, कमल, मी तुझ्यावर अनुरक्त आहे ' तो तोंडांतल्या तोंडांत पुटपुटला.

---

† हा उतारा सदर लेखकाच्या एका अप्रसिद्ध कादंबरींतील आहे.

त्याला शब्दांनीं उत्तर मिळालें नाहीं. आतां सारंगीवर समयाला योग्य अशीं प्रीतिगीतेंच छेडलीं जात होतीं. चंद्रिकाही गालांतल्या गालांत हांसत होती ! पण कमल मात्र स्तब्ध होती. तिला बोलण्याची गरजच नव्हती. तिच्या डोळ्यांतच पुरेसें प्रणयतेज चमकत होतें. आपण मोठ्या जोरानें आपल्या प्रियकराच्या बळकट बाहुपाशांत ओढल्या जात आहों. (पुस्तक आपटून सुस्कारा टाकून). जळ्ळं तें पुस्तक. वाचतांना पोटांत कसं कालवून येतें. [थांबून] पण पाहूं या पुढें काय होतें तें ! (पुस्तक पुनः उघडून) ' आपल्या रुंद छातीशीं तो आपल्याला आंवळून धरित आहे असें तिला वाटूं लागलें. एकाद्या हंसीला जगभर वणावणा भटकून शेवटीं आपलें घरटें सांपडलें असतां, समाधान व्हावें, तसें तिला झालें. तिनें आपले तेजोमय पंख आवरून घेऊन आंतल्या आंत वस्ती केली. ती आत्मसंतुष्ट झाली.' [पुस्तक टाकून देते व उठून हिंडूं लागते.] कमल, तूं जर माझ्या समोर अशा स्थितींत दिसतीस, तर मीं तुझ्यावर जोरानें झडप घातली असती, आणि तुझ्या तोंडांतला घांस हिरावून घेतला असता. ओरखडून, चावून तुझीं आंतडीं आंतडीं तोडलीं असतीं. [सुस्कारा टाकते] पण–हें एवढें कां. त्या बिचारीवर कां माझा एवढा राग. तिच्या सुदैवानें तिला तें सुख लाभलें. आपल्या दुर्दैवाबद्दल तिचा कां मत्सर करावा ? देवा, मीं असा कायरे अन्याय केला होता ? कमलसारखें सुख भोगण्यास मला अयोग्य कां बरें ठरवलीस. मलाही तिच्यासारखेंच स्वरूप दिलेंस. तिच्यासारखेंच तारुण्य दिलेंस. मग तिच्यासारखें सुख कां नाहीं दिलेंस ? मी तिच्यासारखीं बुकें लिहित नाहीं म्हणून होय. (चडफडत) नको नको. तें बुकाचें नांवच नको. जगांतलीं सारीं सारीं बुकें घेऊन जाळून टाकावीं. [दांत, ओंठ चावीत जोरानें फिरते] कोण बाई

हा ताप. माझें अंग कसें उकलून यायला लागलें. (पंखा घेते व वारा घेऊं लागते.) छेः छेः! जास्ती जास्तीच पण कमी नाहीं. आंतच पेटल्यावर वरच्या वाऱ्यानें काय होणार? देवा, आतां कसोर माझा जन्म जाणार? यापेक्षां मेलेलें काय वाईट. मार, मार, मला एकदां ठार मार. [मूर्छित पडते. पडदा पडतो.]

अंक पहिला समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—अभिसारमंदिर. वंचुक व पशुपति.

वंचुकः—[एकटाच प्रवेश करून] या अभिसारमंदिराच्या स्थापनेपासून सोन्याचें दर्शन नाहीं असा दिवसच गेला नाहीं. अस्मादिकांच्या या विशाल डोक्यांत, ही कल्पना जेव्हां प्रथम आली तेव्हांच आमच्यासारख्या चतुर लोकांना मंदिराचे सभासद होऊं द्यावयाचें नाहीं, हा पहिला नियम आह्मीं बनवला. सर्व सोन्यानें आमचाच आश्रय केला तर चतुराला तें कसें खपणार? ह्मणून चार मदड ओझ्याचीं गाढवेंच घेतलीं हाताखालीं. सांगितलेलें काम करतात आणि दिलेले दाम घेतात. आजपर्यंत कित्येक लक्ष्मीपुत्रांना हाताशीं घेऊन धुळीला मिळवून टाकलें. ब्रह्मदेवाच्या अधिकाराच्याही वरचें काम केल्यावर लक्ष्मीपुत्राच्या सर्व संपत्तीवर आमचा हक्क कां नाहीं पोंचणार? ब्रह्मदेवाच्या सूत्रानें विवाहबंधनानें भलत्याशींच जखडलेल्या पोरीशीं यांची गांठ घालावयाची हें काय लहान सहान काम? त्याला मजुरी तितकी मिळालीच पाहिजे! व आज-

पर्यंत मिळतही पण आली. मंदिराची उत्तरोत्तर भरभराट होत आहे. आज कित्येक असंतुष्ट स्त्रिया अभिसारमंदिरावर देवालयाप्रमाणें प्रेम करितात, रोज एकवेळ तरी आपल्या इष्टाचें दर्शन घेण्यास येथें येतात, आणि उत्पादकांवर अमूल्य देणग्यांचा वर्षाव करितात. त्यांच्यावर आषक होऊन वेडे झालेले लक्ष्मीपुत्र ह्मणजे आमची कळ-सूत्री बाहुलीं. कां आहे कीं नाहीं क्लृप्ति! [हांसत व मिशावर पिळ देत इकडे तिकडे फिरतो.] सध्यांची एकच शिकार लाभली तर मग आपण कांहीं पुनः या धंद्यांत पडणार नाहीं. अहो जन्माची तरतूद झाल्यावर विनाकारण घासत कां रहावें? पशुपति शुद्ध पशुपतीच आहे. पण बेटा कृपणांचा राजा! त्याला वाटतें कीं अभिसारमंदिरांत येऊन चैन तर भोगावी पण गांठ तर सुटूं नये! संपत्ति पहावी तों लाखो गणति. (थांबून) छबुल्या, पांखरा, तूं आतां या वंचुकरावाच्या पिंजऱ्यांत सांपडलास, आतां तुझा चिकटपणा कोठवर टिकणार? एक सोडून एकादश, रुद्र गांठींत जरी तुझें जिवापलीकडे जपलेलें भांडवल असलें तरी तें या वंचुकरावाच्या गौडबंगाल जादूनें तेवढ्या गांठींनाही झुकांडी देऊन विनदाव्याच्या गुराप्रमाणें बिनधडक येऊन मंदिराच्या खजिन्यांत पडेल समजलास! (ऐटींत फिरतो) ही पहा आली आमची पारध! देख्य चा पोषाख पाहिला तर कोण ह्मणेल हा लक्षाधीश आहे ह्मणून? (किंचित पुढें होऊन) यावें सरदारसाहेब.

पशुपति :—(प्रवेशून) पण कायरे वंचुकराव तिकडची कांहीं बातमी?

वंचुक :—हंः ! असें कुठें दोन चार दिवसांत कां होणार हें काम? (विषय बदलून) पण तें असो. आपण या पोषाखाला रजा कधीं देणार?

पशुपति :—पोषाखानें रे तुझें काय केलें?

वंचुक :—हेंच तें. मी ह्मणतों तें हेंच. अहो, कोणीही हातचें सोडून पळत्याचे पाठी कां लागणार? पळत्याजवळ कांहीं अधिक असेल ह्मणून ना?

पशुपति :—मग? मी काय त्यांच्यापेक्षां संपत्तीनें अधिक नाहीं.

वंचुक :—त्यांना तेवढी संपत्ति पुरे आहे. संपत्तीचा अधिकपणा पाहून त्यांना पाझर नाहीं फुटणार. सध्यां जें कांहीं त्यांना पाहिजे, तें विलासीपणा. दुसरें कांहीं नाहीं. पहा बोवा. तुह्माला जर ही शिकार साधायची असेल तर विलासी बनलें पाहिजे. देवानें तुह्माला स्वरूप आणि विनोदी स्वभाव हीं तर दिलींच आहेत. त्यांत सध्यां तुह्मी तारुण्याच्या अगदीं भरांत आहां. (स्वगत) स्वारी किंचित् खुलूं लागली. (उघड) याला थोडा उमद्या पोषाखाचा जोड दिला कीं काम फत्ते झालेंच ह्मणून समजा.

पशुपति :—(किंचित् बेफिकीरपणें) कायरे. तूं ह्मणतोस तसा विलासी पोषाख करायला खर्च तरी कितपत येईल ?

वंचुक :—अहो, महत्वाचें काम साधायचें, तिकडे लक्ष्य द्यायचें कां आधीं खर्चाचाच विचार करायचा? खर्च काय. लागतील हजार पांचशें.

पशुपति :—(दचकून) हजार पांचशें? ते रे कशाला ? असा पोषाख तरी काय करणार तूं?

वंचुक:—हें पहा सरदार. मी कांहीं हिशेबाखेरीज बोलत नाहीं. अशा कामीं पैशाची टंचाई केली कीं काम बिनसलेंच. फार काय सांगूं. हळकुंडाकरितां लग्न मोडावयाची पाळी येते एकेक प्रसंगीं. अहो विड्याला पक्कें पान नसलें तर त्यांची तबियत नाखुष होते.

पशुपति:—(थोडें हांसून) तूं या बाबतींतला मोठा दर्दीच बनलास बोवा! बरें पोषाख ह्मणजे काय काय करायचा तें तर सांगशील

वंचुक :—हो हो! अलबत. (स्वगत) आतां स्त्रारीला चढवतों खूर. (उघड) सरदारसाहेब तुमच्या या वाटोळ्या चेहऱ्यास पुणेरी पगडीच छान शोभेल, पगडी घ्यायची ह्मणजे रेशमी पहिल्या प्रतीची घेतली पाहिजे. तिला निदान पचवीस रुपये तरी पडतील. रोज एक पगडी घालणें हें कांहीं विलासीपणाचें काम नव्हे. निदान निरनिराळ्या रंगाच्या पगड्या चार तरी पाहिजेत. हो विलासी दिसायाचें तर असेंच केलें पाहिजे. त्या पगडीस शोभेसे सर्जचे ऐटबाज कोटजाकिटांचे सूट, हातांत एक पोची आणि निदान चार सलकडीं; बोटांत चारपांच निरनिराळ्या प्रकारच्या आंगठ्या. नेसायला रेशिमकांठीं धोतरें : पायांत लाल चटफट करणारा जरीच्या कामाचा जोडा; हातांत धरायला चांदीच्या मुठीची कांठी ; आणि गळ्यांत एक ठळकशी कंठी. इतके जिन्नस तरी अवश्य पाहिजेत.

पशुपति :—(विकल्पित वृत्तीनें) काय ह्मणतोस?

वंचुक :—काय ह्मणायचें! जर तिचा अभिलाष धरायचा तर हें इतकें पाहिजेच पाहिजे. (आठवण केल्याप्रमाणें) हो, आणखी विसरलोंच. विड्याचें केशर, कस्तुरीसहित अगदीं सर्व सामान रुप्याच्या डब्यांतून जय्यत पाहिजे. अंगावर नेहमीं अत्तराचा भपका राहिला पाहिजे. इतकें केल्यावर कुठें तिचें लक्ष गेलें तर जायचें.

पशुपति :—ह्मणजे इतकें करूनही ती वश नाहींच होणार?

वंचुक :—तें आपलें माझें सामान्य बोलणें. तुमच्याविषयीं नको तसा संशय धरायला. अहो इतकी तयारी झाल्यावर—या काळ्या भोर डोळ्यांच्या प्रणयी तेजापुढें तिचा कसचा टिकाव लागणार? एकदां कां तुमचे हे अधर सुगंधी विड्याच्या चर्वणानें लालबुंद बनले कीं तिचे तें अधर मत्सरानें कापूं लागतील आणि ही आपल्या

अधरांची स्वादिष्ट लाली काढून घ्यावी ह्मणून यांचेवर चढाई करतील. काय समजलांत? गळ्यांत जी कंठी तुह्मी घालाल ती बहुमोल रत्नांची पाहिजे बरें, कारण स्त्रियांना मत्सर फार! तिला तुमची कंठी अप्रतिम वाटली तरी आपल्या हाराशीं तिची तुलना करावी ह्मणून ती दोघांचा संयोग करील.

पशुपति :–(आनंदानें) असें होईल ह्मणतोस.

वंचुक :—होय होय. अस्सें होईल. काय सांगू सरदारसाहेब. सर्व स्त्रिया तर विलासी असतातच पण त्यांचा विलासीपणा इच्या पासंगासमुद्धां पुरणार नाहीं. अहो, तिचे दिवसांतून सतरा पेहेराव होतात. तिला दागिने घालणें काढणें निरनिराळे शालू नेसणें आणि काढून ठेवणें या विलासी व्यवस्थेखेरीज दुसरें कांहीं सुचत नाहीं. एकेक पेहेराव करावा आणि नटत मुरडत गच्चीवर फिरावें आणि पुन: जाऊन तो काढून दुसरा करावा असें एकसारखें झोंप येईपर्यंत चालू असतें.

पशुपति :—(मोहून) आणखी–

वंचुक:—(स्वगत) कसा आहे प्रणयाचा सपाटा (उघड) आणखी–मी हो कांय तिचें वर्णन करणार? तिचें दुर्दैव ह्मणूनच ती या थेरड्याच्या गळ्यांत पडली. तिला जर तिच्याच तोलाचा विलासी तरुण पति मिळतां तर तिनें त्याला नंदनवनांतला इंद्रच बनवला असता! खरें कीं नाहीं सरदार! मी ह्मणतों हें?

पशुपति :–अगदीं खरें!

वंचुक :–आणि मला तर अगदीं खास वाटतें! हें रत्न देवानें आपल्याकरितांच उत्पन्न केलें असावें. तिच्या स्वरूपाला साजेसें स्वरूप मी आजपर्यंत आपलेंच एक पाहिलें! सरदार, थोडे विळासी व्हा मग पहा! तुमचें मोहक स्वरूप आणि माझी अचाट

बुद्धि यांचा आपण उपयोग करूं तर थोड्याच दिवसांत, ती तुमचें अर्धांग हस्तगत करील. तेव्हां मात्र तुम्ही मला विसरून जाल.

पशु०:-(वंचुक बोलत असतांना उभा राहिलेला त्याला मिठी मारून आनंदानें) नाहीं बरें तुला विसरणार.

वंचुक :-हें काय हें काय सरदार (हंसून) अहो, स्वप्नांत नाहींना? मी वंचुकराव!

पशु० :-होय तूं माझा जिवलग मित्र वंचुकराव! (मिठी सोडून घाईनें) पण मिला आतां इतकी तयारी कधीं करायची?

वंचुक :-तें काम माझें. तुम्हीं पैसे काढा कीं आजच्या आज तयारी! त्याला काय वेळ! येऊन जाऊन काय ती खरेदी कापडांची. सोन्यामोत्यांचे जिन्नस तुमचे घरीं आहेतच.

पशु०:-हो तेच काढायचे ना. मग झालें तर. पण हें पहा, ते कोणकोणते जिन्नस पाहिजेत हें मला नाहीं समजायचें. तर तूंच एकदां ये वाड्याकडे मग आपण सर्व ठरवूं. मग मी तुला कापडांना रुपयेही देईन. कां असेंच कीं नाहीं? (वंचुकराव होकारार्थी मान हालवितो) मग केव्हांसा येशील?

वंचुक :—माझें हो काय? मी आपला हुकुमाचा बंदा! सांगाल तेव्हां तयार. पाहिजे तर आज रात्रींच येतों.

पशुपति :—ये ये! असा आठ वाजून गेल्यावर ये. येशील ना? जाऊं तर मी?

वंचुक :—या या! मी खास येतों त्यावेळीं. [पशुपति जातो.] आपलें दैव तर आज खूप जोरावर आहे! या पशुपतीनें मान डोलवलीच! आतां राहतां राहिली एक बाजू! (विचारांत) तिकडे आपला शिरकाव होण्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं. तो थेरडा तिची पाठ सोडून एक क्षणभर सुद्धां दूर होत नाहीं. याला काय

बरें करावें ? [विचार करून] हां! ठीक युक्ति सुचली. हें काम त्याच्याकडूनच केलें पाहिजे. लग्नांतही तोच मध्यस्थ होता तेव्हां त्याचा अगदीं आंत प्रवेश होण्यास अडचण पडणार नाहीं. मग ठरलें तर! पण हा मोठा डोक्याचा मनुष्य आहे तेव्हां त्याला बाकीचा थांग लागूं देतां कामा नये. आधीं आमच्या गाढवांना याबद्दल बजावून ठेवावें मग त्याची गांठ घ्यायची ती मोठ्या सावधगिरीनें घेऊन, त्याला या अभिसारमंदिराची गुणगुणही कळूं देऊं नये. अस्सेंच! भद्रेश्वरावांचून हें काम नाहींच व्हायचें. तर आतां त्याच उद्योगाला लागावें! (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ :–संगमनाथाचे देवालयांतील ओटी.

कोदंड :—धर्मसूर्याला खग्रास ग्रहण लागलें! अनीतीच्या दाट काळोखानें दशदिशा व्यापून टाकल्या! दुराचार दिवाभीतांनीं आपल्या भीषणरवांनीं सज्जनांच्या कानठळ्या बसवून सोडल्या! सत्याचे खून पडूं लागले! व्यभिचार चोरांनीं पातिव्रत्यभांडार दरोडा घालून लुटलें! आणि एक वेळ परम पवित्र मानल्या जाणाऱ्या या आर्यभूमीवर मूर्तिमंत कली यथेच्छ तांडव करूं लागले! देवा, आतां तरी इकडे आपलें लक्ष्य जाईल काय? सभ्यपणाच्या नांवाखालीं चाललेल्या अनन्वित अमंगलकृत्यांचीं मूळें जळून खाक होतील काय? गाईचें कातडें पांघरून जनांत यथेच्छ वावरणाऱ्या या लांडग्यांचीं काळीं भोर आंतडीं चवाठ्यावर ओढलीं जातील काय? आणि सज्जनांची खालीं झालेली मान वर होण्याचा काल कधीं तरी येईल काय? देवा, पार्थाला दिलेलें वचन आपण विसरलां असाल तर मात्र

आमची घडगत नाहीं! धर्मग्लानि ती आणखी कसली? तो क्षीर-सागर सोडून आपल्या कृपादृष्टीनें या आपल्या प्रिय भारताला पावन करा! कुलीन अबलांचे करुणरव दीनदयाळाच्या हृदयाला पाझर फोडणार नाहींत काय? [हात जोडून सद्गदित होतो.]

हिरण्य० :—(प्रवेशून) एकेक पहावें तों अधिकच, वर्णसंकराचीं मूळें आतां इतकीं खोल जात चाललीं कीं, वेळींच त्यांना आग लावली नाहीं, तर तीं आचंद्रार्क कायम होऊन रहातील!

कोदंड :—(दुःखित) खरें बोललास! हिरण्यगर्भा पण असा आणखी कोणता प्रकार पाहिलास?

हिरण्य० :—[त्वेषानें] काय सांगूं मित्रा कोदंडा! भर बाजारांत व्यभिचारकर्माचे गुत्ते सुद्धां स्थापन होऊं लागले! असंतुष्ट स्त्रीपुरुषांनीं अशा गुत्त्यांत येऊन वाटेल त्या व्यक्तीशीं मनसोक्त क्रीडा करावी आणि तिला पाठबळ केवळ धनाकरितां असला नीच धंदा करणाऱ्या त्या सभ्य ह्मणून मिरवणाऱ्या उत्पादकांचें!

कोदंड :—हाय! सध्यां आपल्यावर ईश्वरी क्षोभच झाला आहे यांत शंका नाहीं!

हिरण्य० :—वंचुकराव ह्मणून एक भद्रेश्वराचे पितामह उत्पन्न झाले आहेत! त्यांनीं अभिसारमंदिर ह्मणून एक गुप्त संस्था काढली आहे! मित्रा, त्या ठिकाणीं हीं अमंगल कर्में दिवसाढवळ्या चालतात! आज भद्रेश्वरांची आणि या वंचुकरावांची गुप्त भेट झाली; तींत त्या सुदाम्याच्या नवोढा दामिनीला भ्रष्ट करण्याचें ठरलें! मंगळवारांतला लक्षाधीश सावकार पशुपति त्याचा दामिनीशीं संग घडवणार! पशुपति नुसता उल्लू बनून गेला आहे! काल रात्रीं वंचुकराव त्याचे घरीं गेला होता. त्यानें त्याचे घरांतले कांहीं सोन्यामोत्यांचे दागिने आणि हजार रुपये आपल्या बरोबर मंदिराकडे आणल्याचें ऐकलें.

कोदंड :—[निराशेनें] हिरण्यगर्भा, आतां आपले उपाय सर्वस्वी थकतील होय ना?

हिरण्य० :–[स्वगत] अरेरे! मी आवेशाचे भरांत फारच बहकलों! आतां कोदंडाला पुनः ताळ्यावर आणलें पाहिजे! (उघड) छेः छेः! तसें समजण्याचें कांहींच कारण नाहीं. जरी खग्रास ग्रहण लागलें तरी त्याला मोक्ष ह्मणून आहेच! हा काल काय असाच राहील? सूर्यावर आलेले मेघ कांहीं कालानें आपोआप दूर होतात आणि त्यांचा प्रकाश दुप्पट उज्ज्वल होऊन त्रैलोक्याला आनंद देऊं लागतो.

कोदंड :–[निराशायुक्त] हें ग्रहण निदान माझ्या हयातींत तरी सुटेल असें मला नाहीं वाटत.

हिरण्य :-भलतीच समजूत! अरे, मी तर समजतों याची मोक्षवेळा आतां अगदीं जवळ येऊन ठेपली आहे. त्या नीच भद्रेश्वरावर आणि वंचुकरावावर एकेक अपराधाचे भरपूर पुरावे गोळा होण्याचें चिन्ह दिसूं लागलें आहे!

कोदंड :–काय ह्मणतोस?

हिरण्य० :-मी स्वतः आतांच पशुपतीचे वाड्यांतून आलों. चाललेल्या प्रकाराची कच्ची हकीकत, पशुपतीचे बायकोचे कानीं घातली. ती बापडी फारच सद्‌गुणी बायको आहे. तिनें पशुपतीची कानउघाडणी आजच करण्याचें माझ्याजवळ कबूल केलें. पुढें काय होतें तें आपल्याला उद्यां सकाळीं कळेल। मी आपल्या हिरालालला अभिसारमंदिरांत प्रवेश करून घेण्यास पाठविला. तो सहजच तेथें घुसला, त्याचेकडून मला दररोज तिथल्या बातम्या कळतात. हिरा थोडक्याच दिवसांत वंचुकरावाचा विश्वास संपादील मग आपल्याला वाटेल ते उपाय योजतां येतील.

कोदंड:-बरें! त्या दामिनीबद्दल आतां आपण काय करावें बरें!

हिरण्य०:-तें काम मी आपल्यावर घेतों. तूं शारदेला भ्रष्ट न होऊं देण्याचा विचार कर.

कोदंड:-ठीक आहे!

हिरण्य०:-भद्रेश्वराचा डाव एक वेळ जरी साधला तरी आतां त्याचे दुष्कृत्यांचा बहुतेक डंका वाजल्यासारखाच झाला आहे. या वेळीं आपल्याला त्याचे विरुद्ध पाहिजे ती मदत मिळेल आणि त्यानें रचलेल्या व्यूहांत तोच बळी पडेल.

कोदंड:—असें होईल तर सोन्याहून पिवळें! एक भद्रेश्वरचसा काय पण जितक्या व्यक्ती नीतीचीं जगद्धितकारक बंधनें झुगारून देऊन यथेष्ट वागतात तितक्या सर्वांचे बळी पडले पाहिजेत!

हिरण्य०—जगांतल्या सर्वच असल्या व्यक्ति एकदम नाहींशा होतील ही गोष्ट असंभवनीय आहे. पण या दोन व्यक्तींचें उदाहरण पाहून त्यांना दहशत बसेल हा काय थोडा फायदा होईल?

कोदंड:—तूं ह्मणतोस तें खरें! पण या उदाहरणापासून फायदा घेण्याइतकी त्यांची बुद्धि उज्ज्वल असते असें मला नाहीं वाटत. अरे, या दुष्ट लोकांना, असलीं अनीतीचीं निंद्य कृत्यें करण्याची इतकी दृढ संवय जडलेली असते कीं, तें त्यांचें एक व्यसनच होऊन बसतें. प्रथम सदसद्विवेक बुद्धि त्यांना टोंचते पण तिला न जुमानून हे आपला क्रम सुरूच ठेवतात ह्मणून तिचा प्रवाह परततो.

हिरण्य०:-ते जरी आपल्या दुष्कृत्यांपासून परतले नाहींत, तरी लोकांना त्यांच्या कारस्थानांच्या दिशा कळून रहातील मग कोणीही त्यांच्यावर सहज विश्वास टाकणार नाहीं.

कोदंड:-त्यांच्या कारस्थानांच्या दिशा एकच प्रकारच्या कोठून असणार? प्रत्येकाची क्लृप्ति वेगळीच. आणि ती इतकी बेमालूम कीं प्रत्येक ज्ञानी ह्मणवणारा देखील चकून तिच्यावर विश्वास ठेवील.

हिरण्य० :—पण प्रत्येक वेळेला त्यांचें कारस्थान उघडकीस आणणारे पुरुषही जगांत असतातच. परमेश्वरी योजनाच अशी आहे कीं, असत्याचा प्रथम कांहीं काळ जरी जयजयकार झालासा वाटला तरी अखेर ' खोट्याचे कपाळीं गोटाच.'

हिरालाल :—(प्रवेशून घाईनें) तात्या, खरोखर आपल्याला सोळा आणे यश येणार !

कोदंड :—वाहवा ! तुझ्या तोंडांत साखर पडो !

हिरण्य० :—काय गोड बातमी आणलीस बुवा !

हिरा० :—या वंचुकरावाचें एकेक कृत्य पाहिलें ह्मणजे छाती दडपून जाते. काय सांगू दादा, त्यानें जे काल पशुपतीकडून दागिने आणले, तसलेच दुसरे खोटे तयार करविले आहेत. कापड माल तर सर्व भाटकीच घेतला आहे. खरे दागिने ठेवून घेऊन ही राजश्री ते खोटे पशुपतीला घालायला देणार !

कोदंड :—दागिने निदान किती किंमतीचे होतील?

हिरा० :—कांहीं नाहीं तरी पांच हजारांचे होतील.

हिरण्य० :—या वेळीं तुला कसें इकडे यायला मिळालें?

हिरा० :—मी हल्लीं दागिन्याचाच कामावर, त्या हेमकर्म सोनाराकडे निघालों आहें. त्याला खरे दागिने नमुन्याला देऊन, एका रात्रींत खोटें करायला बजावलें होतें. ते आतां तयार असतील तेव्हां ते दोन्ही घेऊन यायला मला धाडलें आहे.

हिरण्य० :—तर मग तूं त्याचा बराच विश्वास संपादन केलास ह्मणायचा!

हिरा० :—त्याच्या कारस्थानांत त्यानें न बोलतां योग्य साह्य करणारा मीच एक त्याला दिसलों ह्मणून त्याचा विश्वास बसला दुसरें काय?

कोदंड:-या वेळीं तूं आह्मांला ही बातमी दिलीस हें फार उत्तम केलेंस. हिरण्यगर्भा, सोनार कोणत्याही कामांत कसब केल्यावांचून रहात नाहींत. मग हा सोनार या कामांत आपला चांगलाच फायदा करून घेईल नाहीं बरें.

हिरा० :-ते दोघे अगदीं जिवलग स्नेही आहेत. त्याच्या कामांत तरी हा कांहीं कसब करणार नाहीं.

हिरण्य० :-ही तुझी समजूत लहानसान कामांत खरी ठरेल, पण या वेळीं कोदंड ह्मणतो तसेंच होण्याचा अधिक संभव आहे.

कोदंड:—ईश्वरकृपेनें त्या सोनाराचें कसब जर हिरानें पाहिलें तर फारच मौज होईल. या दोघांत बिघाड आणतां आला पाहिजे ह्मणजे आपल्याला एक मोठाच साहाय्यकारी मिळेल. हिरा, तूं तेथें गेल्यावर गचाळपणानें बसून रहा आणि तुला विशेष आढळेल तें आह्मांला जातां जातां कळव. मग पाहूं पुढें काय करायचें तें!

हिरण्य:-जा जा तूं हिरा! आपल्या कामावर जलद हजर रहा! ह्मणजे विश्वास कायम राहील! (हिरा रामराम करून जातो) कोदंडा, यांत सांपडला तर हा एकटाच वंचुकराव सांपडेल. आपल्याला तर भद्रेश्वराला सोडतां कामा नये. ह्मणून भद्रेश्वर आटोक्यांत येईतोपर्यंत, आपण हा विषयही गुप्त राखूं.

कोदंड:-आपल्याला भद्रेश्वराला सुद्धां यांत गोंवतां येईल. आपल्या हिराकडून पशुपतीच्या दागिन्यांची हकीकत त्याचे कानीं घालावी ह्मणजे तो त्यांतला वांटा मागेल मग त्याजकडे यांतील दागिने सांपडले तर तो आलाच गोत्यांत.

हिरण्य:- त्याला, जरी दागिने सांपडले तरी मी वंचुकाकडून विकत घेतले ते कसले आहेत मला माहीत नव्हते असा मुद्दा उडवितां येईल. आपण आणखी थोडा काळ स्वस्थ राहिलों तर त्याचें कार-

स्थान आपसुखेंच बाहेर येऊन त्यांत सगळे सांपडतात.

कोदंड :- तूं ह्मणतोस तसेंच करावें.

हिरण्य :- चल आपल्या माध्यान्ह स्नानाची वेळ झाली. सर्व आन्हिक आटोपून पोटाच्या उद्योगाला लागलें पाहिजे. (जातात.)

प्रवेश ३ रा.

(दामिनी विणकाम करीत बसली आहे.)

भद्रेश्वर :-(प्रवेशकरून) काय दामिनी वहिनी, काय चाललेंय?

दा० :-काय चालायचें ? (पाहून) तुमच्याच नांवानें बसलें खडे फोडीत !

भद्रेश्वर :- (स्वगत) शकुन तर सोळा आणे झाला ! [उघड] आह्मीं काय बोआ असें आपलें घोडें मारलें ! मी इतका वेळ विचार केला, मला तर कांहीं आठवेना !

दा० :- घोडें मारलें असतें तरी बरेंच ह्मटलें असतें.

भद्रेश्वर :—तर मग आह्मा यापेक्षांही मोठा अपराध केला ह्मणाना?

दा० :- यांत काय संशय ?

भद्रेश्वर :- अब्ब ! आतां आह्मांला शिक्षाही जबरदस्त होईल नाहीं बरें ?

दा० :- मनुष्याच्या दरबारांत नाहीं होणार कदाचित् पण देवाचे दरबारांत तरी होणारच होणार ! तुह्मी नांवानें कां होईना दीक्षित आहां ! तुह्मांला एकाद्या मनुष्याला प्राण नकोसा होईल अशा दुःखांत टाकणें, या अपराधाला काय दंड आहे हें असेलच ठाऊक ?

भद्रेश्वर :- (मान हालवून) आहे.

दा० :- तर मग यमलोकीं आपल्याला तोच दंड होणार बरें !

भद्रेश्वरः–(व्यग्र मुद्रेनें) या भद्रेश्वराचे हातून आजपर्यंत–या जन्मांत तरी–एकाही प्राण्याला दुःख असें पोहोंचलें नाहीं. वहिनी, उलट जन्मांतून अगदीं उठलेल्या लोकांना पुनः संसारांत घालण्यासाठींच हा देह झिजवला कींहो!

दा० :– आहे ठाऊक! असें कुणाकुणाला बरें घातलेत संसारांत?

भद्रेश्वर :– एक कां दोन, किती ह्मणून सांगूं? तुह्मांला ठाऊक असलेल्या दोनीचीच गोष्ट पहाना! आपल्या इकडे, सुदामदेव हें लग्न झालें नसतें तर खरोखर बैरागीच झाले असते! बिचारा भुजंगनाथ तर आत्महत्या करायालाच उठला होता!

दा० :– [मान मुरडून] अहाहा! खरें ह्मणतील कोणी तरी! इकडची आणि त्या थेरड्या श्रीमंताची दया येऊनच आपण ही सारी, माझ्या नी त्या बिचाऱ्या शारदेच्या जन्माचें मातेरें करायाची खटपट केली नाहीं बरें! केवढे पण दयाशील? पण काय हो दीक्षित! मी तुह्मांला विचारतें–या दोन घोड थेरड्यांचा जीव तुह्मीं उपकारबुद्धीनें वांचवलात, आतां ते आणखी किती शंभर वरसें जगतील बरें?

भद्रेश्वर :–[स्वगत] चढूंद्या. आणखी थोडी कमान चढल्यावर एकदम अचुक शरसंधान करण्यास सांपडेल. [खालीं पहात राहतो].

दा० :–कां बोलाना आतां? काय चारदोन वर्षें जगतील तेवढ्यांत त्यांनीं दिलेल्या दुव्यानें तुमचें कल्याण होतें कां साऱ्या जन्मभर केलेल्या आमच्या तळतळाटानें तुमचें तळपट होतें तें आतां दिसेलच. (थांबून) अहो, दयेचे समुद्र, जेव्हां तुह्मांला त्या थेरड्यांची दया आली नी तुह्मी आपली पिशवी भरून आमची मान कापली, तेव्हां आमाच्या तारुण्याचा, स्वरूपाचा आयुष्याचा नी सुखदुःखाचा काय

विचार केला होता ? बोला, बोला कीं, द्या जबाब ! तुह्मी त्या कोत-तवालाला सुद्धां भ्याला नाहीं. मग यःकश्चित् बायकोला कां भितां ? केला होता कां विचार ? सांगा कीं ?

भद्रेश्वर :– काय सांगूं ?

दा० :– काय सांगूं ह्मणजे ? मी आतां काय विचारलें नाहीं कां ऐकूं आलें ?

भद्रेश्वर :– ऐकूं आलें तर काय ? पण तुमच्या या तोफखान्याचे धडाक्यापुढें आह्मांला बोलायाला अवसर मिळेल तेव्हां ना उत्तर द्यायचें ?

दा० :– सगळ्या जगाच्या तोंडाला थांबविणारे दीक्षित आज माझ्या तोफखान्यापुढें हात टेंकतातना ? बरें तसेंच कां होईना. ही मी थांबलें बोलायची. आतां द्या उत्तर काय तें ?

भद्रेश्वर :--वहिनी ! आह्मीं विचार केल्याशिवाय कां या गोष्टी केल्या ?

दा० :–कशाचा केलांत विचार ? बरोबरच्या पोरींच्या सुखाकडे पाहून आह्मी झुरून झुरून मरावें एवढाच कां नाहीं ?

भद्रेश्वर :–छेः छेः ! असा गैरसमज नका करून घेऊं ! वहिनी संसारांत सुखें दोन ! एक संपत्तीकडून नी दुसरें पतीकडून ! या दोन्हीचे जगांत छत्तीसाच्या आंकड्या इतकें सरळ ! एक आहे तिथें दुसरें नसायचेंच !

दा० :–पुरे, पुरे ! काय पण बोलणें ? हाच कां केलात विचार ?

भद्रेश्वर :–पण ऐकून तर घ्याल.

दा० :–काय ऐकायचें ? दैवावर हवाला ठेवून असेंच खडे फो-डीत रहावें ! हेंच सांगणार तुह्मी.

भद्रेश्वर:-असें नव्हतें माझें बोलणें! वहिनी, मी ह्मणतों पहिल्याच्या जोरावर तुह्माला दुसरें सुख सहज मिळवतां येईल.

दा०:-(दचकून) काय ह्मटलें दीक्षित? मला तुमच्या ह्मणण्याचा अर्थ बरोबर कळला नाहीं.

भद्रेश्वर:-त्यांत काय न कळायला? पैशानें न मिळणारें सुख या जगांत कोणतें आहे? असें मी बोललों.

दा०:-मग पतिसुख कां बाजारांत विकत मिळतें?

भद्रेश्वर:-वहिनी हळू बोला. रावसाहेबांनीं ऐकलें तर काय ह्मणतील?

दा०:-त्यांनीं काय ह्मणायचें? जें आपल्या जवळ नाहीं तें विकत घ्यायला, कोणाची हरकत मी नाहीं जुमानायची.

भद्रेश्वर:-पण ही गोष्ट त्यांना न समजतांच झाली पाहिजे. त्यांना समजलें तर विकत घेतलेल्या सुखांत सुद्धां बिबा पडलाच समजा.

दा०:-पण तें विकत मिळतें तरी कुठें! किंमत काय पडते? हें नको कां मला समजायला?

भद्रेश्वर:-त्याची नको आपल्याला काळजी, ती व्यवस्था मीच करीन! आपल्या इथें अगदीं घरबसल्या आपल्याला तें मिळेल.

दा०:-काय ह्मणतां? मला माझ्या घरांत तुह्मी पतिसुख प्राप्त करून द्याल?

भद्रेश्वर:-हो हो! तुमची मर्जी असेल तर!

दा०:-तें कोणाला आवडणार नाहीं? पण दीक्षित तिकडे न कळतां हें कसें होणार मला कांहींच कळेना.

भद्रेश्वर:-कां बरें! आपण त्यांची सेवा अशी बेमालूम करित रहा कीं त्यांना एक काडीचाही संशय येऊं नये.

दा० :-संशय? तो कशाचा? मग पतिसुख तें कुठलें?

भद्रेश्वर :—अहाहा! एवढें कांहीं शिंगें मोडून वासरांत नको शिरायला.

दा० :—मी कां हें सोंग करितें? दीक्षित खरेंच नाहीं बरें मला कळलें.

भद्रेश्वर :-वहिनी! या तुमच्या मोहक मुखकमलावर अनेक तरुण भ्रमर गुंजारव करित रहातील.

दा० —ह्मणजे! मी वांकडें पाऊल टाकावें असें; कां तुमचें ह्मणणें?

भद्रेश्वर :—कोणीं ह्मटलें टाकावें ह्मणून?

दा० :—मग आतां काय सांगितलें तुह्मी?

भद्रे० :-मीं काय सांगितलें? जें आपल्याजवळ नसेल तें विकत घ्यायला तुह्मी कोणाचीही हरकत जुमानणार नाहीं. ह्मणून तुह्मांला तें विकत मिळण्याचें ठिकाण मीं सांगितलें.

दा० : -अस्सें काय?

भद्रे० :-हो! एकाद्या तहानेल्यास पाणी दाखवण्यांत अत्यंत पुण्य आहे असें मीच नाहीं पण सर्व जग समजतें. (बाहेर पाहून) अहाहा! काय पण रूप हें! अहो याच्यावरून शंभर मदनालाहि ओंवाळून टाकावें. पोषाख तरी किती ऐटबाज आणि रंगेल! चालणें कसें गंभीर. परमेश्वरा कायरे हा पुतळा निर्माण केलास? याच्या गोंडस बाहूंच्या पाशांत पडून, पुष्ट छातीवर विश्रांति घ्यायला सांपडेल त्या स्त्रीचें जिणें धन्य खरें.

दा० :-(एकसारखी त्याचेकडे नजर लागून राहिलेली तो गेलावें पाहून सुस्कारा टाकून) दीक्षित हे कोण बरें?

भद्रे० :—छेः छेः! परपुरुषाबद्दल असा पूसतपास करणें हें पापाचें साधन आहे.

दा० :—(स्वगत) अरेरे! यानें मला पकडली बरें शब्दांत. [उघड रागानें] ह्मणजे मीं कांहीं वाईट विचारानें नाहीं विचारलें.

भद्रेश्वर :– तसें नाहीं मी ह्मणत! पण, वहिनी, आपल्याला पति शोभेल असा सुंदर रंगेल आणि तरुण मनुष्य पाहून त्याचा तपास करण्याची इच्छा सहज उत्पन्न होते. त्यांत तुमचा काय दोष? अगदीं भुकेनें व्याकुळ झालेल्याच्या पंच पक्वान्नांचें ताट दृष्टी पडलें तर तोंडाला पाणी कां सुटणार नाहीं?

दा० :– [स्वगत] दीक्षित कांहीं खोटें नाहीं ह्मणाला! [एक दीर्घ निश्वास टाकते]

भद्रेश्वर :– [स्वगत] स्वारी तरी विजयाची झाली. आतां किंचित् ओढताण करून हाच फांसा बळकट बसवला ह्मणजे आटोपला कार्यभाग. [उघड] वहिनी, येतों बरें आतां [जाऊं लागतो]

दा :– [दुःखित.] दीक्षित...

भद्रेश्वर :– (मागें वळून) आं! – [ती कांहींच बोलत नाहींसें पाहून] कां दीक्षित ह्मणून तितक्यावरच थांबला?

दा० :—(व्यग्रतेनें) कांहीं नाहीं. आपली उगीच मारली हांक.

भद्रेश्वर :– (पुनः थोडें पुढें होऊन) वहिनी, माझेजवळ नका लपवालपवी करूं! तरुण पोरींनां वृद्ध पती मिळाले ह्मणजे त्यांची होणारी दुर्दशा मी जाणतों. बोला कायतें, हा दीक्षित या कानाचें त्या कानाला कळूं न देतां तुमचें काम करील.

दा० :—(स्वगत) बोलूं कां? माझें हृदय कां बरें धडधडतें? नकोच!

भद्रेश्वर :- (हांसून) बरें समजलों ! यावेळीं तुमचें मन नाहीं स्थिर ! आतां तुह्मांला विचारून त्रास देऊं नये. वहिनी कांहीं काळजी करूं नका बरें ! मी पुनः लौकरच येऊन त्या पुरुषाची हकीकत कळवीन.

दा० :- (घाईनें भान न राहून) पण मला फार काळ तळमळत नाहींना ठेवणार ? [स्वगत] हें काय मी भलतेंच बोलून गेलें. माझ्या जिभेवर माझी सत्ताच कशी ती राहिली नाहीं.

भद्रेश्वर :- (हांसून) तुमच्यापेक्षां तुमची काळजी मला अधिक आहे बरें. [हांसत जातो.]

दा० :—(स्वगत) गेला एकदांशी ! (थांबून) माझें मन कसें झोंके खाऊं लागलें ! एकदां वाटतें भद्रेश्वराचें ह्मणणें कबूल करावें ! पण—मग लोक मला काय ह्मणतील ? लोकांना काय ? असें ही बोलणार नी तसेंही बोलणारच ! आपलें आपण पाहिलें पाहिजे ! मला सर्व जन्म असा निर्मलतेनें घालवतां येईल काय ? आला, तरी अश्रू गाळीत, दुसऱ्यांचें सौख्य पाहून जळतच ना तो कंठायचा ! मी आतां काय करूं ? दीक्षिताचे पुनः तोंडच पाहूं नको ? मग......अहाहा ! काय तें स्वरूप ! तर दीक्षिताकडून तपास काढून त्या तरुणाचे पाय धरूं? [घाबरून] अग आई ही कल्पना मनांत आल्या बरोबर माझी अशी कां बरें स्थिति झाली ? छाती जोरानें धडधडूं लागली. अंगांत कांपरें शिरलें. डोकें गरगर फिरूं लागलें. डोळ्यापुढें अंधारी आली. नी अंगांला दरदरून घाम सुटला ! मीं आतां करावें तरी काय ? आँ हें काय सगळें घरच फिरूं ला...... (पडते.)

[पडदा पडतो

प्रवेश ४ था.

(शारदा स्वच्छ पांढरें पातळ नेसून पत्र वाचीत बसली आहे.)

शारदा:–

ओव्या.

' सावित्री परम पतिव्रता । पतिप्राण आणिला परता ॥
यम निरुत्तर केला तत्वतां । काय सामर्थ्य हें उणें ॥ १ ॥
द्रौपदीचें थोर पातिव्रत्य । परमेश्वर जोडिला भृत्य ॥
संकट पडतां धांवे सत्य । काय सामर्थ्य हें उणें ॥२॥
पातिव्रत्य मंगलसूत्र । त्यावीण स्त्री अपवित्र ॥
पातिव्रत्य इह परत्र । सुखद स्त्रीसी ॥३॥
पतिव्रता खऱ्या कमलिनी । रहाटती पतिस्थिति अनुसरुनी ॥
उदयीं प्रफुल्ल अस्तीं कोमेजुनी । होती निर्जीव ॥४॥
ऐकूनि पतीचें निधन । तत्काल सोडावा प्राण ॥
रवि अस्ता जाता जाण । किरण जैसें आटती ॥५॥

अहाहा काय हा गोड उपदेश! असा जिचा प्राण जाईल ती धन्य खरी! (श्वास सोडून) पुढें हा गुरुचरित्रांतला उतारा घेतला आहे! ठीक [वाचूं लागते]

ऋषि अत्रीची भार्या । नाम तिचें अनुसूया ॥
पतिव्रता शिरोमणिया । जगदंबा तेचि जाणा ॥ ६ ॥
पतिसेवा करी बहुत । समस्त सुरवर भयभीत ॥
स्वर्गैश्वर्यें घेईल त्वरित । ह्मणोनि चिंतिती मानसीं ॥ ७ ॥
इंद्रादि सुरवर मिळूनी । त्रैमूर्तीपाशीं जावोनी ॥
विनविताती प्रकाशोनी । आचार अत्रिऋषीचा ॥ ८ ॥
इंद्र ह्मणे स्वामिया । पतिव्रता स्त्री अनुसूया ॥
तिचा आचार सांगों काय । तुह्मांप्रति विस्तारोनी ॥ ९ ॥

तिचा आचार देखोनी । सूर्य भीतसे गगनीं ॥
उष्ण तिजला होईल ह्मणुनी । मंदमंद तपतसे ॥ १० ॥
अग्नि झाला भयभीत । शीतल असे वर्तत ॥
वायु होऊनि चकित । मंदमंद वाहे ॥ ११ ॥
भूमी आपण भिऊनि देखा । नम्र जाहली पादुका ॥
शाप देईल ह्मणोनि ऐका । समस्त आह्मी भीतसों ॥ १२ ॥
नेणों घेईल कवणस्थान । कवण्या देवाचें हिरोन ॥
एकाद्यातें वर देतां जाण । तोहि आमुतें मारूं शके ॥ १३ ॥

भगिनी, हें पातिव्रत्याचें माहात्म्य तुझ्या हृत्पटलावर अक्षय्य अक्षरांनीं कोरून ठेव! 'पती वांचून आन । ते बापबंधूसमान ॥' हें वाक्य विसरूं नकोस! तूं सुज्ञ आहेस. तुला अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. वरील उताऱ्यांत सर्व कांहीं आहे. सत्कार्यांत अडथळे फार! पण ते निश्चयाचे जोरावरच नाहींसे होतात. तुला अडथळे येतील त्यांना जुमानूं नको. तुझा हितचिंतक बंधू तुला प्रसंगीं सावध करण्यास तुझे पाठीवर आहेच.'

"तुझा भाऊ"

अहाहा! भाऊ तूं कोणीही अस! तुझ्या उपदेशामृताच्या घुटक्यांनीं मात्र माझ्या चंचल मनाला स्थिर आणि आनंदी बनवलें! तुझ्या या पत्रानें तुझी स्मृति माझ्या अंतःकरणांत कायमची स्थापन केली! आतां ज्या ज्या वेळीं मनांत अनावर लहरा उठतील त्या त्या वेळीं तुझें हें अमोलिक पत्र वाचून मी त्यांना आंवरीन! पत्रा तुझा जनक कोणीही असला, तरी तुझ्यांतील प्रत्येक वाक्यांत–प्रत्येक अक्षरांत–त्याचें नीतिधैर्य, त्याची सद्धर्मपरता, त्याचें थोर कुल आणि उदार अंतःकरण स्पष्ट स्पष्ट दिसून येतें! येथून तूं माझा एकांतांतील मित्र, फावल्यावेळचा खेळगडी, आणि स्वर्गाचा सन्मार्ग दाखविणारा सखा आहेस! पत्र कितीदां तरी वाचूं! एकदां वाचून

कांही शांतता नाहीं होत! (पुनः उघडते) अहाहा! प्रत्येक वेळीं नवा नवाच रस उत्पन्न करणारें हें पत्र मला आतां वारंवार वाचावें लागणार! म्हणून त्याला निरंतर जवळच बाळगलें पाहिजे. ये पत्रा तूं माझ्या हृदयाशीं बिलगून रहा! (चोळींत ठेवते) बंधुराजा, तुझे हे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं बरें! रोज सकाळीं उठल्याबरोबर तुला शतशः प्रणाम करीन, तुझें हें अमृतमय पत्र वाचून हृदयाशीं धरीन मग इतर धंद्याकडे वळेन!

१ दासीः–(प्रवेशून) वहिनीसाहेब, बाहेर भद्रेश्वर दीक्षित आले आहेत.

शारदाः–(कपाळास आंठ्या घालून) जा, त्यांना सांग घरांत नसायचें म्हणून.

१ दासीः–ते आपल्याकडेच काम आहे म्हणतात.

शारदाः–माझ्याकडे कां? (थांबून) तिकडच्या समक्षच माझ्याशीं काय काम असेल तें मी ऐकेन म्हणावें!

१ दासीः–एकांतांत कांहीं बोलायचें आहे म्हणाले.

शारदाः–चोमडी कोठली! (रागानें) जा, नवऱ्याच्या बायकांशीं परपुरुषाचा एकांत कशाचा आला आहे? दूध म्हणून विष पिण्याइतकी कांहीं मी मूर्ख नाहीं म्हणावें! जा, जा, काळें कर तोंड! (दासी जाते) हा काळ काय हात धुऊन माझ्या पाठीशीं लागला! माझ्या जन्माची माती करून सुद्धां त्याचें मन नाहीं कां थंड झालें? देवा, आतां तूंच माझा पाठीराखा! हा शनि आतां माझ्या पाठीशीं कशी साडेसाती लावील नी माझ्यावर कशी आग पाखडील याचा नियम नाहीं! मला अबलेला याचीं कारस्थानें कोठून कळणार? तूंच रक्षण करावेंस! (थांबून) भाऊराया, ही कल्पना मनांत येऊनच तूं मला पत्र पाठवून आधार दिला असशील कां? संशय

कशाला ? तसें नसतें तर दोन्हीची वेळ एकच कशी पडली असती ! आतां मला काळजी करायचें कांहीं कारण नाहीं. (पत्र काढून) ' माझा हितचिंतक बंधू मला प्रसंगीं सावध करण्यास माझे पाठीवर आहेच ! '

पडद्यांतून–कुठें आहे ग ती ! (दुसरा आवाज) पोथी वाचत बसल्या आहेत.

शारदाः—स्वारी आली वाटतें इकडेच. आपणच आंत जावें ह्मणजे तितकाच त्रास कमी होईल. (जाते)

प्रवेश ५ वा.

स्थळ–(दीक्षिताच्या घराची एक खोली.)

भद्रेश्वरः–खडा हुकला ! खडा हुकला ! या दीक्षिताचा अचूक बाण आज अपेश पावला आँ ! पोरी (चवताळून) या दीक्षिताच्या अंगाचा दाह करून सोडलास आँ ! तूं दूध ह्मणून विष पिण्याइतकी मूर्ख नाहींस काय ? बरें आहे ! तूं नाहीं तुझा बाप ! तो तर पैशाकरितां गाढवाचा ×× सुद्धां पिईल ! इकडून नाहीं साधलें तर तिकडून ! तूं कांहीं या दीक्षिताच्या तावडींतून सुटली नाहींस ! दीक्षिताला अद्याप आपल्या खजिन्याची एक बाजू भरायची आहे. तिला जबाबदार तूंच ! पोरी–लोभी कांचनभटाला मधाचें बोट दाख–

हिराः–(प्रवेशून रामराम करून) दीक्षित, ही जीभ पुढें केली बघा—

भद्रे०ः–ह्मणजे—

हिराः—तुह्मी मधाचें बोट लावणार ना ?

भद्रे०ः–कोण हिरा, तूं काय ? (हांसून) बेट्या बराच भिवबलास मला.

हिरा :-आहा! खासें बोलणें! आजोबाला नातू उपदेश करतो त्यांतलेंच एक ह्मणाना! [हांसतात] बरें तें असो! तुह्मांला सांगीन सांगीन ह्मणतों पण वेळच सांपडेना! आतां ठीक जुळून आलें!

भद्रेश्वर :-अदमास कशाबद्दल सांगणार तूं?

हिरा :-मी कांहीं उखाणा नाहीं घातला, 'कशापैकीं आहे? फळापैकीं का फुलापैकीं तशांतलेंच विचारता तें? मी सांगण्याकरितांच तर एकांतांत गांठायला पाहतों.

भद्रेश्वर :-पण, तुझ्या धन्याबद्दल तर नाहीं?

हिरा :-तुह्मांला सांगतांना कोणाबद्दल काय तें समजल्याशिवाय राहील काय?

भद्रेश्वर :-जें सांगणार तें पण चांगलेंच आहेना?

हिरा :-चांगलें अगदीं तुमच्या हिताचें आहे.

भद्रेश्वर :-मग सांगीनास काय तें लौकर!

हिरा :-(इकडे तिकडे पाहून) इकडे करा कान. [बराच वेळ सांगतो.]

भद्रेश्वर :-काय ह्मणतोस? पांच हजारांचे?

हिरा :-हां! हां! दीक्षित मनांत ठेवायची गोष्ट आहे! चोरून पोळी घातली तर ओरडून तूप मागणार वाटतें तुह्मीं!

भद्रेश्वर :-नाहीं मला खरें नाहीं वाटलें ह्मणून ह्मणालों!

हिरा :-आतां पहा बोवा, तुमच्याकडून काम करून घेऊन, आपणच सगळ्यावर डल्ला द्यायचा आणि तुह्माला बसवायचें हांका मारीत. हा त्याचा कावा मला आवडला नाहीं ह्मणून बातमी दिली! आतां तुमचें तुह्मी काय वाटेल तें करा!

भद्रेश्वर :-तें लागलें माझें माझ्याकडे.

हिरा:-पण कुठें तरी माझें नांव बोलून, नोकरीवर पाणी आणाल!

भद्रेश्वर:-छेः छेः! तसें नाहीं करणार.

हिरा:-मी जातों तर, पण अर्धा सोडूं नका बरें. (जातो)

भद्रेश्वर:-हा हिरा बेटा बराच धूर्त दिसतो. त्या वंचुकरावानें याला कांहीं लागू दिलें नाहीं ह्मणून तर यानें मला बातमी दिली नसेल! असें ह्मणावें, तर पुनः नोकरीची कां आशा धरितो? कांहीं असेना, आहे तें आपल्या पथ्यावरच आहे. दामिनीच्या कामांपैकीं कांहीं पैसे मिळालेच! आतां या कामांत तर तो वांटेकरी नाहीं! समाइकी ह्मणून दागिन्यांत वांटणी मागायची, साधली साधली नाहीं नाहीं! [जातो]

अंक २ रा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

[कांचनभट्ट व भद्रेश्वर दीक्षित बोलत बसले आहेत.]

भद्रेश्वर:-एकूण पोरीच्या जन्माचें मातेरें केलें तुह्मीं.

कांचन०:-दीक्षित मी हो काय केलें? मला भरीला पण घातलें तुह्मींच? या आपल्या 'चोराच्या उलट्या बोंबा' ठीक आहेत कीं!

भद्रेश्वर:-पण मला नव्हतें वाटलें [कीं,] तुह्मी इतके निष्ठुर बाप असाल ह्मणून.

कांचन०:-आणि मलाही नव्हतें वाटलें, तुह्मी इतके अट्टल सोदे असाल ह्मणून.

भद्रेश्वर:-पण आतां कां खवळतां?

कांचन०:–तर माझ्या घरांत येऊन तुह्मी मला पाहिजे तें बोला आणि मी शांत बसूं होय?

भद्रेश्वर:–अहो! तसें नाहीं माझें ह्मणणें! ऐकून तर घ्याल.

कांचन०:–काय ऐकायचें एक शब्द नका बोलूं!

भद्रेश्वर:–बरें बोवा तोंडाला कुलूप घालतों! पण हजार पांचशें तरी निदान मिळते.

कांचन०:–(जीभ चावून स्वगत) अरेरे! याचेवर उगीच संतापलों. (उघड) अहो, दीक्षित घरांत सदासर्वकाळ हीच किरकिर चालली आहे त्यानें कसें मस्तक फिरून गेलें. ह्मणून मी तुह्मांला एकदम टाकून बोललों. काय करूं पोरीची गोष्ट काढली कीं भानच नाहीं रहात! सांगा काय सांगायचें तें!

भद्रेश्वर:–(स्वगत) सुटलें पाणी, मणी पाझरला? (न बोलतां स्वस्थ राहतो.)

कांचन०:–अहो रागांतलें भाषण खरें मानून कां चालायचें! सांगा सांगा काय तें!

भद्रेश्वर:–आपण नाहीं आतां एक अक्षर बोलणार! हा चोराच्या उलट्या बोंबा ऐकून तुह्मी एकादे घालाल नेऊन पोलीस चौकींत.

कांचन०:–दीक्षित! एवढा कां मला हा समजतां तुह्मी?

भद्रेश्वर:– छेः छेः! तुमच्याकडे कांहीं दोष नाहीं. सध्यांचा काळच तसा आहे! 'हित करायला गेलों पण मीच ठार मेलों' ह्मणायची पाळी यायची!

कांचन०:–पुरे पुरे दीक्षित! आतां किती ओढून चंद्रबळ आणाल!

भद्रेश्वर:– ठीक ठीक! हें सुद्धां माझें सोंगच ह्मणतांना?

कांचन०:–दीक्षित तुमच्या पायां पडूं कां मी? अहो रागाच्या आवेशांत मी तसें बोललों पण आतां चुकलों ह्मणतों. मग तर झालें?

भद्रेश्वर:- लाथ मारून मग पाया पडलें, ह्मणजे लाथेचा दोष गेला आणि यथेच्छ मारायला मिळालें. तसेंच कीं नाहीं?

कांचन०:- बरें बोवा! तुह्मांला वाटेल तें बोला! एकदां दृष्टि फिरली ह्मणजे सगळें उलटच दिसतें.

भद्रेश्वर:- अहो असेल तरच दिसेल ना?

कांचन:०- होय बोवा! आह्मी तसेंच आहों!

भद्रेश्वर:- (स्वगत) आतां अधिक सतावूं नये. नाहीं तर माझा प्रयोग माझ्यावरच उलटावयाचा (उघड हांसून) काय चटकन राग तरी येतो?

कांचन:०- राग कशाचा! कांहीं ह्मटलें तरी तुह्मी उलटच अर्थ करूं लागला मग काय करूं. बोलायचाच थांबलों!

भद्रेश्वर:-बरें जाऊंदे तो विषय! मी तुह्मांला विचारतों. तुमच्या मुलीनें चार दिवस जगावें, तिला सुख व्हावें, असेंच तुह्मांला वाटतें ना?

कांचन०:-ह्मणजे हें काय विचारणें? अहो, आपलें पोर मरावें असें कोणाला वाटेल?

भद्रेश्वर:- तसें नव्हे, सध्यांची शारदेची जर स्थिति पाहिली तर कोणी ह्मणणार नाहीं ही आतां एक पांच सहा महिने तरी जगेल ह्मणून! ह्मणून ह्मणतों.

कांचन०:-हें मला सुद्धां दिसतें! पण आतां झाल्या गेल्या गोष्टीला काय करायचें?

भद्रेश्वर:- काय करायचें? मग मुलगी मरावी अशी तुमची इच्छा आहे ह्मणा!

कांचन०:-ह्मणजे तिला जगवणें माझ्या हातचेंच असेल अगदीं!

भद्रेश्वर:- हातचें असलें तर—

कांचन०:-तर मग कां नाहीं जगवणार?

भद्रेश्वरः— अहो, वेल जर वाळूं लागली तर काय करावें लागतें—

कांचन०:—पाणी घालावें लागतें.

भद्रेश्वरः— तसेंच, ज्याकरितां जें मनुष्य झुरतें, तें मिळालें ह्मणजे पुनः त्याला टवटवी येते.

कांचन०:—ह्मणजे—

भद्रेश्वरः— पाणी घालून टवटवी आणणाऱ्या माळ्यालाहीं फुलें मिळतात.

कांचन०:—हें असलें अंतरतिड्याचें बोलणें आपल्याला नाहीं समजत बोवा!

भद्रेश्वरः— (हांसून) अंतरतिढा काय! अहो, शारदा कशासाठीं झुरतें हें तरी तुह्मांला आहे कीं नाहीं ठऊक?

कांचन०:—तें लहान पोर आमचा जया सुद्धां सांगेल!

भद्रेश्वरः— मग तें समजून सुद्धां तुह्मी उपाय नाहीं काय करायचा?

कांचन०:—दीक्षित आतां मात्र कमाल केली! मी काय ब्रह्मदेव! कां माझ्याजवळ ह्माताऱ्याला तरणा बनवण्याची जडी बुटी आहे? आहे तरी काय?

भद्रेश्वरः— आतां रागावत नसाल तर सांगतों—

कांचन०:—सांगा! आपल्या हिताचें सांगणाऱ्यावर कोण रागावेल?

भद्रेश्वरः— जगांत सगळेच वृद्ध आहेत काय?

कांचन०:—(शहारे येऊन) मग पापकर्म करावें?

भद्रेश्वरः— जसा पाया रचला तसाच वाडा उभारायचा! तुह्मी पेरणी केली एरंड्यांची आणि फळ इच्छिलें गव्हांचें तर कसें चालेल? लग्नाचे वेळेलाच हा विचार करायचा! आतां पोरीच्या जीवापेक्षां कशाचा विचार करायचा? अहाहा! काय त्या पोरीची दशा! प्रथम

बचायला आलों तेव्हां नुसती अप्सरा दिसत होती. आणि आतां पाहिलें तर ओळखायला दिखील येत नाहीं.

कांचन०:-(हुंदका आणून) नका नका दीक्षित! गोष्ट काढूं नका?

भद्रे०: – राहूंदे! पण पोरीची इतकी कळकळ असली तर तुह्मी या वेळेला स्वस्थ बसूं नये.

कांचन०:-तर काय करावें?

भद्रे०: – इकडे करा कान (सांगून) आहे कबूल?

कांचन०:-आपली छाती नाहीं होत.

भद्रे०: – अहो छाती कशाची. तिचा जीव बचावून तुह्मांलाही हजार पांचशें.

कांचन०:-पण पोरगी कशी तयार होईल?

भद्रेश्वरः – आंबा पाहून सगळे लाळ घोंटतात. त्याचा नका तुह्मी विचार करूं. तिला एकटीला इथें ठेवण्याची व्यवस्था तेवढी तुह्मी करा! जयाला आणि काकूला कुठें तरी द्या लावून कामाला! मग मी त्याला आणून सोडतो. मग तो जाणे नी ती जाणे! आपण आपले बाहेर बसूं ओटीवर!

कांचन०:—पण पोरगी इकडे येईल तर ना?

भद्रे०:-अहो त्याला हजार निमित्तें! दोन दिवस माहेरला ह्मणून आणा. नाहीं तर शेवटीं चैत्रांत नवऱ्याचें तोंड पाहूं नये असा शास्त्रार्थ द्या सांगून!

कांचन०:-हा हा! ही युक्ति मात्र बरी आहे पण—

भद्रे०:-कां!

कांचन०:-(कानांत सांगतो) एवढें झालें पाहिजे.

भद्रे०:-तें नको सांगायला. या दीक्षितांचें काम सदाच रोख ठोक!

कांचन०:–मग नाहीं हरकत. मग काय आतां पाडण्याचीच वाट पहात बसायचें.

भद्रे०:– असेंच! बरें मी जाऊं तर आतां.

कांचन०:– या! फार तसदी पडली तुह्मांला?

भद्रे०:– अहो! तसदी कशाची? एकमेकाचें हित एकमेकांनीं चिंतिलेंच पाहिजे. शिवाय या लग्नांस मीच होतों पुढारी. ह्मणून मला हें आपलें कर्तव्यच वाटलें.

कांचन०:–बरें बोवा! तुह्मी आपले जुन्या चालीचे ह्मणून असा लोभ करतां झालें. आतां असलीं माणसें लोगचें घालीन ह्मटलें तर नाहीं मिळायची!

भद्रे०:–(हांसून) लोभ करणारीं ना? अहो हे परस्परांवर आहे; बरें येतों आतां. नमस्कार (जातो.)

कांचन०:–(स्वागत) पोरगीच तयार झाल्यावर आपल्यावर काय पापाचा बोजा? कोणी ह्मणतील तुह्मी पैसे घेतले! मग आह्मी पैसे सांठवून ठेवायचे ते तरी कुणाकरितां या पोरांकरितांच कां नाहीं? मग त्यांत तरी काय दोप? ही वाहती गंगाच आहे तोंत्र हात धुवून घ्यावा! लोक काय दुतुंडीं सावजें! इकडून बोलणार आणि तिकडूनही बोलणारच. (पडद्यांत–बाबा जेवायला झालें हो.) आलों, आलों आता या पोराची मुंज करायची. कुठले आणावे पैसे? वाडी सारख्या क्षेत्रांत जाऊनच केली पाहिजे शक्त्यनुसार दहा पांचांत. (पडद्यांत–बाबा या कीं हो.) काय बघा लेंकानें पोट हातांत धरलें. आलोंच. (जातो).

प्रवेश २ रा.

(सुदाम निजला आहे व दामिनी पाय चेंपीत आहे.)

सुदामः– पुरे पुरे! आतां नीज स्वस्थ!

दामिनीः– आपल्याला झोंप लागल्यावर आहेच निजायचें! झोंप काय रोजचीच आहे. सेवा कधीं घडावी?

सुदामः– पण रोज रोज अशीं जागरणें आणि त्रास होऊं लागल्यावर तुझी प्रकृति नाहीं कां बिघडणार?

दामिनीः–इकडची प्रकृति धड असली ह्मणजे झालें. मला काय होणार आहे धाड? दिवसें दिवस इकडे जपायलाच पाहिजे. आतां नांव नाव शक्ति कमी होत जाणार ना?

सुदामः–अहाहा! तुझ्या या कोंवळ्या हातांचा स्पर्श आणि त्या कोंवळ्या अंतःकरणांतून निघालेल्या मधुर शब्दांचा स्वर, लाभूं लागला तर मला दुप्पट अवसान येत जाईल.

दामिनीः–आतां बोलत तें किती वेळ रहाणार? अंमळ स्वस्थ पडावें ह्मणजे लागेल झोंप.

सुदामः–बरें तूं ह्मणतेस तसेंच करितों. (तिच्या चेहऱ्याकडे पहात व आनंदी विचार करण्यांत मग्न होऊन, राहतो.)

दामिनीः–[स्वगत] अझून डोळे कसे ताठ आहेत. केव्हां एकदा झांकतात कोण जाणे! मला असें तिष्ठत बसायचा मोठा कंटाळा येतो; पण काय करायचें? [सुदाम डोळे मिटून घोरूं लागतो] निज मेल्या. [उठते. पाय न वाजवितां दूर होते] मला तरी आतां या परतंत्र स्थितीचा वीट येऊन गेला! थरड्यांना आधींच झोंप कमी. आणि मला तर या मेल्याला झोंप लागल्यावांचून इथून उठायचें नाहीं. कोंडून घातल्या सारखी अवस्था होते! प्रसंग साधून एकदां याला कायमची झोंप लावली ह्मणजेच सुटलें यांतून! [दारावर खुणेच्या चिटक्या वाजतात.] आली मंडळी. [पुनः एकदां सुदामास पाहून] पड, पड असाच घोरत. मी आतां तुला बंदिवान करून जाते.

[दुसरा पडदा उघडतो दामिनी पशुपति वंचुकराव व हिरा.]

दामिनीः–काय ? आज माझ्याकडूनच वेळ झाला ना ?

वंचुकरावः–यांत काय संशय ? सरदार साहेब आज केव्हां पासूनचे तिष्ठत राहिले आहेत.

पशुपतिः–अहो, पुढच्या या मकरंदप्राप्ती करितां. [चुंबन घेऊन] इतकी रुंजी घालावीच लागते.

दामिनीः– [हांसून] काय पण बोलायचें ?

पशुपतिः–यांत मी खोटें तें काय बोललों. रात्रीवर दृष्टि ठेवून दिवस कष्टानें कंठावा लागतो. याचा अनुभव तुह्मांला काय असणार ?

दामिनीः–आपलें बरें पण माझें नको! मला माझ्या इच्छेबाहेर मेलें कसें वागावें लागतें याची कल्पना तरी आहे कां कुणाला ? तुह्मी पुरुष अगदीं स्वतंत्र तुह्मांला कां कुणावर प्रेम आहे असें खोटेंच भासवून सेवा करावी लागते ? कां कोणाचीं खाकरें टाकून टाकून घाण झालेलीं तस्तें धुवावीं लागतात ?

वंचुक० :–हें मात्र बरोबर बरोबर बोलला तुह्मी वहिनी! आमच्या सरदारांना देखील मागें थोडासा पाश आहे; पण तें त्याला जुमानतील तर ? आणि हा तरी नियमच आहे. भाऱ्याला दुसरी दोरी बांधली ह्मणजे पहिली आपोआप सैल पडते. (हांसतात)

दामिनी :–आतां किती वेळ असें उभे रहायचें ?

पशुपति :–आपण कराल तितका वेळ ?

दामिनी :–बसायचें गडे आतां! (पशुपति व दामिनी एका गादीवर तक्क्याशीं बसतात.)

हिरा–[लांब उभा असलेला स्वगत] हरहर! माझा जर पुढें कांहीं हेतु नसतां तर येथल्या येथें यांची खांडोळी करून मी मोकळा झालों असतों.

वंचुक :–हिरा, तें सामान आणलेलें कुठें ठेवलेंस ?

हिरा :–हें इथेंच पाटींत आहे. [फळफळावळें भरलेलीं ताटें काढून ठेवितों.]

दामिनी :–आज ही तयारी कुणाची ?

वंचुक :–तें तिकडे विचारा. रोज नव्या नव्या कल्पना निघायच्या त्या तिथें. (पशुपतीकडे बोट करितो) आणि असें आहेच तें. एकदां एकाद्याला एकाद्या वस्तूचा ध्यास लागला ह्मणजे त्याल त्यांवांचून दुसरा विचारच सुचत नाहीं.

दामिनी :–(वांकड्या नजरेनें पशुपतीकडे पाहते तो हांसतो.)

वंचुक :–पहा हेंच उदाहरण ! ज्यानें विश्वामित्रासारख्या तपोधनाची लटपट उडविली, वसिष्ठाला भ्रष्ट केलें, पाराशराला मोहिनी घातली तो अमोघ कटाक्षबाण आतां तुह्मी यांना मारलात पण तेवढाही सहन करून हे हंसतातच. आवडतीचें सर्वच गोड ! [दोघेही हांसतात.]

हिरा :–(स्वगत) दोघेही अट्टल चोर पण कसे अगदीं घन्याचा आव आणताहेत.

पशुपति :–हा वंचुकराव नसता तर आपल्याला अशी रम्य संधि मिळालीच नसती ! कसें दामिनी ?

दामिनी :–एवढेंच नाहीं पण यांना सोडून आपण येतां तर इतकी करमणूकही झाली नसती.

वंचुक :–हः हः कशाचे ? कशाचे ? गोड मानून घेतां झालें आपण ! (स्वगत) वेळ चांगली आली आहे कांहीं साधल्यास पहावें [उघड] या कामीं माझ्या सारखाच या हिरालालालाही बराच त्रास झाला.

दामिनी :-होय काय. हा मोठा हुशार चाकर दिसतो.

वंचुक :-बरोबर ओळखलें! याच्यासारखा हाच! माझ्या आढळांत तरी असा मीं कोणी दुसरा पाहिला नाहीं.

हिरा :—[स्वगत] हा बेटा मलाही घेऊन पडला. आतां माझ्या नांवानें कांहीं बक्षीस उपटायचा हा कावा दिसतो.

दामिनी :-मग त्याच्या श्रमाचें सार्थक व्हायला पाहिजे.

वंचुक :—माझे चाकर असे फाजील लोभी नाहींत. मी दिल्यांत खुष असतात.

द मिनी :-हिरालाल हें घे तुला बक्षीस [सोन्याचें कांकण टाकते]

हिरा :—मला कशाला पाहिजे एवढें मोठें बक्षीस. आमच्या धन्यांनीं आह्मांला काय कमी केलय? द्यायचेंच असलें तर त्यांनाच द्या आपण हें. [परत देतो.]

दामिनी :—शाबास.

वंचुक :—पाहिलेंत ?

दामिनी :—[कांकण वंचुकास देऊन] आतां हें आपण घेतलेंच पाहिजे.

वंचुक :-छे: छे: ! हें असें काय करितां? मी आपलाच आहें. (घेऊन पाहूं लागतो.)

हिरा :—[स्वगत] यांतही सराफी चाललीच आहे गुलामाची, नको नको ह्मणत !

वंचुक :—रोज रोज अशा मूल्यवान् वस्तु तुह्मी आह्मांला देऊं लागला तर आपण तर उद्यांपासून इकडे फिरकणार सुद्धां नाहीं. [कांकण कागदांत गुंडाळून खिशांत ठेवतो.]

दामिनी :—तुमच्यापुढें या असल्या सोन्यारुप्याच्या जिनसांची काय किंमत ?

वंचुक :–[पशुपतीकडे पाहून हंसून] अधाशी माणसांचें असेंच असतें. आह्मी तिघेजण इकडे इतकें बोलतों आहों, पण सरदारांची दृष्टि निदान कान तरी इकडे असायचा होता! छेः रामा कृष्णा गोविंदा! त्यांना एका गोष्टीशिवाय कांहीं दिसत नाहीं किंवा ऐकूं येत नाहीं. हिरा, चल बाबा, आपणच जा ह्मणण्याचें आधीं गेलेले बरें!

पशुपति :—छेः छेः! वंचुकराव असा रागावूं नको.

वंचुक :—रागावलों नाहीं मी! अहो हें असेंच चालायचें! पंचपक्वान्नांचें जेवण कुणी घातलें तर खाणारा आचाऱ्याचीच तारीफ करायला लागतो आणि दाम खर्चून गेलेला यजमान बाजूलाच राहतो बरें! तुमचें पोट भरलें ह्मणजे मला आनंदच आहे.

पशुपति :—पण माझ्यावर एवढें टोपर ठेवून स्वारी निघाली कुठें?

वंचुक :—तर मग काय इथें ग्रासकंटक होऊन राहूं ह्मणतां?

दामिनी :—(हंसून) बरेच आहा हो तुह्मी! वंचुकराव.

वंचुकः – बरें! सरदारसाहेब आतां परवानगी असावी. हा आपला बंदा प्रातःकाळीं पुनः सेवेला हजर आहेच समजला.

(वंचुक व हिरा जातात.) [पडदा पडतो.

प्रवेश ३ रा.

स्थळ—पशुपतीचे वाड्यांतील देवडी.

(पशुपतीचे दोन चाकर तमाखु ओढीत बसलेले आहेत)

१ चा० : –काय र झयप्या, आपल्या धनीसाबांचा सोभाव अक्षी पालट्नशान् ग्येलाया न्हंई!

२ चा०:–मंजी काय इचारतुयास? मिरच्याच बी कुटूनशान् घातलेल्या तंबाकुवानी कडक जालाया पग! मारला झुरका कीं आलाच ठसका!

१ चा०:—पन् ह्येचं कारन् तरी काय, ची भन?

२ चा०:—अर कारन् कशाच आलया? परवा सोमारी राच्चा तूं अक्शी नाचाय लागलातास अन् शिया बी होव्या तिक्त्या देतास, तेंच र काय कारन्?

१ चा०:—त्येची कारन त्येका दोन! येक चिलीन नी दुसरी बाटली!

२ चा०:–मग ह्योची बी कारन दोन हाईत नी ती बी अक्शी तुझ्यासारीच हाईत पग!

१ चा०:–त्ये कस काय बाबा? धनीसावबी चिलीम झोकत्यात न बाटली उडिवत्यात जनु?

२ चा०:--हट् गाडीच्या! ऐकून तर घेशील? अर चिलमीन येतिया मस्ती नी बाटलीन जातीया सुद्दी नी बुद्दी. तशीच धनी-सावासनी लक्शिमीची आलीया–

१ चा०:—काय मस्ती, अर ये टकल्या तू बी अक्शी माजूनशान रेडाच झालायास आं! घन्याची मस्ती काडायु लागलाईस नी.

२ चा०:—तस न्हव, इचारलस म्हून बोललों. त्येका, लक्शीमी जायाच व्हार आल मंजी असंच थेर थेर करायच आठवाय लागतय! तूं कदी तरी आमच्या धनीसावांनीं असा झक् झक् पोशाक केल्याला नी अस इक्त डागिन अंगावर घातल्याल ह्या दोन हैन्याच्या माग बगितलतस? अन् राच कंदी इक्ता योळ धनीसाव भाईर न्हायल-व्हत काय?

१ चा० :—हे मातुर खर बोललास होप्या, परराच—इक्ता योळ कुट जात्यात बरं हे!

२ चा० :—राच नी असा रंडीबाज पोशाक करून कुट जायाच तुला न्हाई ठाव!

१ चा० :—हां हां! [हांसून] वळाकल! तूं बी लई धोरनी हैस गड्या. पन् ×× फटाकडी असल न्हाई!

२ चा० :—त्येची तुला र पंचात? अर गाडवा ती फटाकडी असल म्हूनच आमच्या बाईसाबास्नी अक्शी जाळतीया आपल्या दारून? कशा तळमळत्यात न्हाई पगितलस?

१ चा० :—व्हय गड्या! इच्या भन तिन अक्शी आमच्या बाई-साबास्नी व्होरपळून टाकलया!

२ चा० :—अर बाबा, श्येन्या मानसानं ह्या नादाला लागूनये! येकदा कां पाय घसारला कीं, मग हातात आलीच नारळाची आई! बग्या! तूं बी ह्ये यसन सोडून टाक! माज ऐक! बैलाला येसण आन मानसाला यसन! अक्शी ज्येरीला आनून सोडतया! तुजी बाटली, नी नवऱ्याला सोडून आमच्या धनीसाबाला गाटली, ती बी बाटलीच! त्या दोगी तुमच्या दोगांचा धुव्वा उडवून देत्याल! तुम-च्या जल्माची राकरांगोळी करून टाकत्याल! त्या बाटलीनं धनी-साबाची बुद्दी कशी बिगडून टाकली बग! अर ह्ये नकातर्ली माती-बी कुनाला द्येनार न्हाईत त्ये आज अक्शी खजीना उपसून भाइर न्हेत्यात नी त्यातली येक पैबी परत घरांत येत न्हाई ह्ये लक्शन कशाच बरं?

१ चा० :—खर म्हनतुयास होप्या! तूं मला सांगतुयास अस धनीसाबास्नी कवा तरी सांगून त्येंच डोळ उगाडशील तर बाई-साबास्नी नवा जलम दिल्यासार व्हईल!

२ चा० :—चांगल सांगतुयास अर धनीसाब झाल्यात यसनांत गरक, त्येस्नी आता कसलाबी न्हात न्हाई तरक; परवा बाईसाबास्नी मारली लात तर भरली करक. तवा त्येंच्या म्होर ग्येलो मंजी लात मारून दात पाडत्याल! नी आपली ती पायरी बी न्हव!

(पडद्यांत—महिपतराव, अहो महिपतराव.)

१ चा० :—तुला कोन हळ्या मारतय र!

२ चा० :—अर त्यो योक लई चकोट बामन हाय. आमच्य धनीसाबास्नी सुद्दीवर आनून आमच्या बाइसाबास्नी सुकांत घालाव म्हून लइ खटपट करतुया! द्येवानं त्येला याश द्याव.

(पडद्यांत—महिपतराव अशी हाक येते.)

२ चा० :—(मोठ्यानें) आलों, आलों, आलों. (जातो व हिरण्यगर्भासह परत येतो.)

हिरण्य० :— महिपतराव, आज बाईसाहेबांची प्रकृति कशी काय आहे?

२ चा० :—धनीसाबांच यन ताळ्यावर आल्याबगार त्यांची परकर्त सुदारायच काय चिण्ण न्हाई!

हिरण्य० :— (सुस्कारा टाकून) तुमचे धनी घरांत आहेत काय?

२ चा० :— छेः ते ह्या येळला कुटल घरांत असायला?

हिरण्य० :— बरें तर मी बाईसाहेबांना भेटून येतो. (जातो.)

२ चा० :— ल्येका बग्या, असावा तर असा मानूस असावा! बोलनं किती ग्वाड, अन् मन् काय पाक तुला सांगू झार बी तळमळत असला तर जाऊन धरनार बग त्येच डोक्सं.

१ चा० :— बर! मी बागतन येतो वाईच हिंडून! [जातो.]

२ चा० :– भांगटाला समद जग भांगटच दिसतया, नी काळयामाळया घातल्या मंजी समद घर फिरतया. तस आमच्या धनीसाबांच झालया. त्येंच्या मणांत आपल्यावानी बाईसाबबी बिगाडल्यात असा संशेव अलाया जनु. कशा कारनान कुनाला ठाव. पन् त्ये अक्शी मला खोदखोदुन इचारित, हत मी भाईर ग्येलावर कोन कोन येतया म्हून. तवा आता त्येंचा न्योम न्हाई. काय करत्याल नी काय न्हाई. सवारी आतां जर कां आली नी ह्या बामनाला पायल तर बाईसायबांचा अक्शी कुट्टा काडत्याल तर आपन दारावर सावद न्हायल पायजे मंजी येळला उपेग हुयाचा. (जातो.)

[हिरण्यगर्भ मृगाजिनावर बसला आहे त्याच्या समोर कांहीं अंतरावर पार्वतीबाई उभी आहे असा पडदा उघडतो.]

हिरण्य० :–काकू, संसार हा दुःखांचाच बाजार आहे; पण नीति न सोडतां तीं संतोषानें सोसणारा मनुष्य परलोकीं स्वर्गसुखाचा अनुभव घेतो, ह्मणून मी तरी या दुःखांना सुखाचीं मूळेंच ह्मणतों. तुह्मी चिंताग्रस्त होऊं नका, धीर सोडूं नका, ही देवाच्या घरची कसोटी आहे; मानवी डोळे पातकी, त्यांनीं तुमच्यावर वाटेल त्या स्थितीचा आरोप केला तरी, तुह्मी या कसोटीला उतरल्यावर देवाचे दरबारांत निर्मळच ठराल.

पार्व० :–आह्मांला इकडच्या खेरीज दुसरा देव कोण? महाराज, त्यांच्या दृष्टीनें मी जर पापी (कचरत) मलीन ठरलें, तर मला स्वर्गसौख्य कुठलें मिळणार?

हिरण्य० :–(स्वगत) अहाहा! साध्वि तुह्मां पतिपत्नींना, बरोबर विरुद्ध स्वभावांचे पाहून मला ब्रह्मदेवाच्या कृतीचें मोठें नवल वाटतें! (उघड) तुह्मी आपल्याकडून त्या देवाची सेवा, कांहीं कमी कां करतां! तुमची भक्ति त्याचेवरून एक तिळमात्र तरी

ढळली आहे कां? तुमच्यांत कांहींच अंतर नाहीं. तुह्मी अगदीं निर्विकार आहांत! आतां त्यांच्या दृष्टीवर थोडासा सारा आला आहे ह्मणून, त्यांना विपरीत भास होत असेल तर तो त्यांचा मूळचा गुण नव्हे. देव दया करील तर हा सारा एका क्षणांत नाहींसा होईल आणि त्यांच्या डोळ्यापुढें चकन् सत्याचा प्रकाश पडेल.

पार्व० :–(सुस्कारा टा०) ती वेळ सोन्याची खरी! महाराज, मी असें काय पातक केलें असेल ह्मणून माझ्या सुखाची अशी एकदम माती व्हावी! ह्या दोन महिन्यापूर्वीं मला कांहीं तरी कमी होतें कांहो? मी कशी सुखांत लोळत होतें! त्या माझ्या सुखाच्या बिछान्यावर कुणीं बरें कांटे पसरले? दुसरें कोण पसरणार? ज्याचीं कर्में त्याज्ञा भोंवतात! माझ्या हातून पूर्व जन्मीं काय काय पातकें घडलीं असतील त्यांची ही फेड. नी दुसरें काय? [डोळे पुशित राहते

हिरण्य:–काकू, शांत व्हा; देव भक्तांकडून, ह्मणा किंवा सदाचारी माणसाकडून ह्मणा पातकांचीं फळें आधीं भोगवतो; मग तो भाग संपल्यावर–केव्हांही पुण्याचीं फळें गोडच असणार ह्मणून अशा माणसांचा शेवट गोड होतो.

पार्व० :–इतकें माझें भाग्य कोठून असायचा (अधोवदन होते.)

हिरण्य० :– मनुष्य दुःखाच्या भरांत असलें ह्मणजे त्याला अशीच भ्रांति पडते! फार तर काय त्याला देव सुद्धां अन्यायी आणि निर्दय वाटूं लागतो. पण, देवाचा न्याय धारवाडी कांट्यासारखा आणि दया समुद्रासारखी असते! आमची तुमची कथा काय? काकू, सुभद्रा, सुभद्रेहून प्रिय पांचाळी, प्रत्यक्ष सहावा प्राणच असा अर्जुन यांनीं सुद्धां दुःखाच्या भरांत देवाला निर्दय ह्मटलें. पण तें किती एक क्षणभरच! फिरून त्यांची ती वृत्ति धांव्यांत लीन झाली कीं देव धांवत येऊन त्यांच्या समोर उभाच! आतां या युगांत जरी मूर्तिमंत

देव येत नसला तरी तो कोणच्याना कोणच्या तरी रूपानें तुह्माला साह्य करील बरें!

पार्वती० :– असाच आपल्या सारखा उपदेश, एका साधुबुवानें आह्मांला शारदेच्या लग्नाच्या आधीं एका देवळांत केला होता! तो मला आतां आठवला! अहाहा! काय सांगू त्या मूर्तीचें तेज! प्रत्यक्ष भगवंतच! बोलणें तरी किती गंभीर!

हिरण्य० :– हो हो! तो तर माझा मित्र कोदंड! त्याला जर तुह्मी शारदेच्या लग्नाच्या आधींपासून ओळखतां तर मीं ही तुह्मांला पाहिलें असावें! तुमचें नांव सांगाल कां त्या वेळचें?

पार्वती० :–त्यावेळीं सगळयाजणी मला माझ्या माहेरच्याच वल्लरी या नांवानें हाक मारीत होत्या!

हिरण्य० :– वाहवा! तर मग मी तुह्मांला पुरतें ओळखतों. अहो तुह्मी तर लग्नाच्यावेळीं ह्मातारा नवरा ह्मणून शारदेची थट्टा करून तिला भंडावून सोडलें!

पार्वती० :–तर मग, त्याच गाईचा शाप–तळतळाट–लागला हो मला! देवा, तिची थट्टा करायची बुद्धि मला त्यावेळीं कुठून बरें सुचली?

हिरण्य० :– अहाहा! त्या शारदेसारखी निर्मळ मनाची पतिव्रता त्रैलोक्यांत मिळणार नाहीं!

पार्वती० :– ह्मणूनच बरें तिचा राग मला भोंवतोय! नाहीं तर, एकाएकीं इकडलें मन असें कसें पालटावें बरें? माझ्याशिवाय इकडे एक पळभरसुद्धां करमत नव्हतें पण आतां दिवसांतून घटकाभर गांठ पडण्याची मारामार! गांठ पडलीच तर पहिल्यासारखें हांसत विनोदांत बोलण्याचें नांव नाहींच, उलट कपाळाला आंठ्या, तोंडानें शिव्याचा वर्षाव नी एकाद्या वेळीं हाताचीही मेजवानी मिळते. देवा, त्या साध्वीच्या शापानेंच इकडलें मन असें निष्ठुर झालें बरें!

हिरण्य० :– काकू, शारदाही तुमच्यासारखींच आपल्या कर्माला दोष देणारी आहे! तिचा तळतळाट कोणालाही लागणार नाहीं.

पार्वती० :– म्हातारा नवरा मिळाल्यावर, तूं त्याला मुठींत ठेव-शील; तो तुझा हुकूम पाळील, अशी तिची थट्टा करून आह्मी पोरी हांसलों. तिच्या नवऱ्याची चालण्याची, बोलण्याची, रूपाची नक्कल करून त्याच्यावर गाणें ह्मणून मी तिला किती तरी वेळ खिजविलें. तेव्हां तिच्या मनाला काय थोडें वाईट वाटलें असेल! मग तिनें समजून उमजून जरी नाहीं शाप दिला तरी तिच्या मनाचा तळ-तळाट आह्मांला लागणार! त्यांत तिची थट्टा करण्यांत पुढें मीच! ह्मणून निदान मला तरी खास लागणार! लागणार कसला लाग-लाच आहे? म्हाताऱ्याबरोबर लग्न होऊन तिच्या जन्माचें मातेरें झालें नी सर्व योग्य होऊनही माझ्या जन्माचें असें मातेरें झालें! (रडूं लागते.)

हिरण्य० :–हां हां! शोक आवरा! शहाण्या माणसांना हें शोभत नाहीं! जसा शारदेच्या दुःखाला तसाच तुमच्याही दुःखाला हा जरठकुमारीविवाहच कारण आहे. तुमच्याही कानावर ही गुणगुण आलीच असेल!

पार्वती :–दामिनीबद्दलच ना?

हिरण्य० :–बरोबर! आतां माझें ह्मणणें ह्मणून इतकेंच कीं याचे हे परिणाम लोकांना असें भोंवतात हें समजून लोक लौकरच सावध होतील! त्यांतच तुमच्या यजमानांच्या डोळ्यांत चांगलें अंजन पडेल मग पुनः तुमच्या सुखांत केव्हांही अंतर पडणार नाहीं! आणि ती वेळ आतां जवळच आली आहे!

महिपती :–(धांवत येऊन) पळा पळा! म्हाराज! × खाल्ला त्या बग्यानं. अर ल्येका! पन् आतां योळ न्हाई. धनीसाब अक्शी

जवळ यून टेकल्याती. पळापळा ह्या दारानं! त्यो बग्याच त्येस्नी घ्यून आलाया! थूः त्येच्या तोंडावर!

हिरण्य० :—अरेरे! आतां या तुझ्या बाईसाबावर मोठा प्रसंग गुदरणार तर? आणि याला कारण मी! (थांबून) महिपतराव! मी इथेंच बसून एकदां तुमच्या धन्याला उपदेश करून पाहूं कांहो?

महिपती :—नग नग!

पार्वती :—चलाच आपण महाराज, माझेंच काय होईल ते होऊं दे! माझ्या पापिणीच्या पायांत तुमचा ब्राह्मणांचा छळ नको व्हायला.

हिरण्य० :— पण माझ्याकरतां तुह्मांला मार सुद्धां सोसावा लागेल एकादा?

महिप० :— त्येची नगा आपुन काळजी करूं! ह्यो ह्यइप्या बाईसाहेबांच्या अन्नाचा मिंदा हाय. नी धनीसाबांच्या बाचं बी अन्न ह्येनं खाल्लया तवा त्येंचं चांगल व्हावं नी बाईसाहेबाह्मी सुक मिळाव म्हून मी परान बीं दीन आन् काय सांगा!

हिरण्य० :— तर मग मी निर्धास्त झालों. येऊं तर काकू! (पार्वती नमस्कार क०) देव तुमचें कल्याण करो! (महिपती व हिरण्य० जातात.)

पार्वती० :— देवा, सावित्रीच्या धांवण्याला धांवून तिचा मृत-पति उठविला; द्रौपदीला, सभेंत गांजलेली असतांना तिनें धांवा केलेला ऐकून, स्वतःचा पीतांबर नेसविला, हिडिंबानें अभिमन्यु वधिला तेव्हां सुभद्रेच्या हांकेसरसी जगदंबेच्या रूपानें धांवून त्याला उठविला, सखुबाईकरितां तिच्या सासूसासऱ्यांच्या हातचा मार खाल्ला, जनाबाईच्या संतोषाकरितां नामदेवाचें उष्टें खाल्लें, अशी आपली ग्रंथांत गाइलेली कीर्ति ऐकून मीहि अनन्य भावानें तुह्माला शरण आले, तरी माझ्याकरितां धावून माझ्या या बिघडलेल्या......
(गहिंवरून हात जोडून राहते.)

पशुपतिः– (पडद्यांत) कोण गेला आतां बाहेर ? बोल... बोलतोस कां नाहीं ? पाहिलेस कां हे ? (कोरडा वाजवितो.)

पार्वती० :– माझ्यासाठीं कुणाकुणाला काय काय सोसावें लागणार देव जाणे ? देवा, माझा आतां अंत नका पाहूं. (हात जोडते.)

पशुपतिः– (महिपतीसह प्रवेशून) ए ! चोराच्या साळ्या ! बोल आतां तूं कुणाला या दारानें बाहेर घालवलेंस ?

महिप० :– ह्या दारानं कुनाला घालिवलं ? काय ह्मनतासा तरी काय धनीसाब ?

पशुपतिः– थांब तुला सांगतों ? (दांत खात स्वगत) माजलेला बोकड, गुलामा तूं आमच्या घरचें अन्न खाऊन मस्तीला आलास ? खाल्ल्या अन्नाचे उपकार असे फेडतोस काय ? [उघड] ठीक. दाखवतों तुला चवदावें रत्न !

महिप० :– ते कशापाई ?

पशुपतिः– तर मग सांग आतां इथें कोण आला होता ?

महिप० :– कवासा ? आताच अक्शी ?

पशुपतिः– होय होय, आतांच !

महिप० :– आपुनच आलायसा न्हव आतां ! नी दुसरा कोन येनार ?

पशुपतिः– अरे चोरा, बेरडा, मांगा, थट्टेवर घालवूं पाहतोस काय ?

महिप० :– धनीसाब वाइच इचार करूनशान बोला ! ह्या हीप्यानं आपल्याला न्हानपनापून खांद्यावर मांडीवर खेळिवलया; थोरल धनीसाब दिकून असल्या वंगाळ खांडोळ्या शिव्या दीत नव्हत !

पशुपतिः– अरे होय ! मोठा आलास सभ्य ठाऊक आहे. धन्याच्या पश्चात् त्याच्या घरावर दरोडा घालून, पुनः धन्याच्या पुढें साव तो साव—

महिप० :– हां हां आतां मातुर आपनास्नी येड लागलं जनु ! आजपातुर इमानानं चाकरी करुन् ह्या पांड्या शिपुर झालेल्या क्येसाकड बगुन तरी बोलायच व्हतसा !

पशुपतिः– उर्मटा, मलाच आणि वेडा ठरवतोस आं ? (दांत खात धांवून) हें घे तुझ्या इमानाच्या चाकरीचें बक्षीस ! (कोरडा मारतो.)

पार्वती० :– [धांवत येऊन मध्यें उभी राहून] हें काय ! हें काय ? असें वेड्यासारखें एकदम त्याला मारायला काय ? लागायचें ?

पशुपतिः– [मान हालवून] या उठल्या कैवार घेऊन मारायला काय लागायचें ? काय ? [दांत खातो.]

पार्वती० :– तो आपला इमानी चाकर म्हणून गप्प राहिला आणखी एखादा असता तर– [थांबते]

पशुपतिः– पडूंदेत मुक्ताफळें बाहेर. तर तर काय करिता ? कां बोलत नाहीं ? तर काय मला उलट ठोक देतां होयना ? सगळा चोरांचा बाजार ! इथून तिथून सगळे चोरच ! हा इमानी चाकर काय ? बाईसाहेबांचें नाजूक काम बिनबोभाट करतो म्हणून इमानीच ! हा तुमचा इमानी चाकर ! तुम्ही आणि हा एक ! आणि मी–मी कोण ? मी तुमचा सगळ्यांचा वैरी ! असेंच कां नाहीं ?

पार्वती० :– असलें काय बोलणें ! हा चाकर आपलाच ! आणि मीही आपलीच दासी ! आपण आमचे धनी, देव.

पशुपतिः– चूप चूप ! तुझा धनी मी नव्हे ! कांगावा करून केलेलें पाप आतां पचायचें नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेव ! ह्या हैप्याच्या मदतीनें तूं इथें कुणाला आणलें होतेस ? बोल ! मला ह्या सर्व

गोष्टींचा थांग लागला आहे. लपवालपवी करून कांहीं भागावयाचें नाहीं !

पार्वती :—देवा काय हा आरोप! मी असें करीन असें इकडल्या मनाला कसें बरें वाटलें?

पशुपति :—मनाला कशाला वाटायला पाहिजे, पुरावाच मिळाल्यावर? मी बाहेर गेल्यावर, तूं दररोज कोणाला तरी इथें आणतेस, त्याच्याशीं एकांत करतेस, (हातपाय आपटून) गळ्यांत गळा घालून तुह्मीं दोघे गुल्गुल् गोष्टी करितां असा मला पक्का पत्ता लागला आहे!

पार्वती :—(कानावर हात ठेवून मटकन बसलेली रडत) आई जगदंबे, तूंच साक्षी!

पशु० :— आपल्या कर्मांचीं फळें आपणच भोगायचीं सोडून, जगदंबेचें नांव घेऊन तिला कशाला पातकांत लोटतेस? बोल इथं रोज कोण येतो? हा सोकावलेला बोका कोण आहे? बोल लवकर?

पार्वती:—मी आपल्या पायांची शपथ देऊन सांगतें, कुणी तरी दुष्टानें हें आपल्या मनांत भलतेंच भरवून दिलें!

पशु० :— हां! दुष्ट! तुमच्या असल्या घाणेरड्या, कुळाला कलंक लावणाऱ्या कामाला त्यानें मदत केली नाहीं ह्मणून तो दुष्ट! ठीक आहे! बाईसाहेब करा पाठ तयार आणि घ्या देवाचें नांव! (कोरडा उगारतो. पार्वती मोठ्यानें ओरडते व पडते. तो तिला मारण्यास धांवतो.)

महिपति :—(मध्यें येऊन) हात आकडा धनीसाब. ह्या हैप्याचा परान् जाईस्तवर बाईसाबांच्या क्येसालाबी धका लागूं द्याचा न्हाई पगा!

पशुप० :- घे तर तूच हें (कोरडा मारतो महिपती उसळून कोरडा काढून घेतो.)

महिप० – आतां बऱ्या बोलानं माजं ऐका! ह्या सीतेवानी पवित्र बाईला तुमी न्हाई न्हाई तसं बोलला पर ह्ये तुमच्या अंगाला लागायच न्हाई! तुमी समद्या जगाला आपनावानीच बगतासा! पर ही धुंदी ग्येलावर आपनाला पच्चाताप व्हईल. ह्या ह्याताऱ्यानं आपल्या थोरल्या धनीसाबाकड नी ह्या बाईसाबाकड बगून ह्ये कोरड सोसल पर—

पशुप० :- चोर तो चोर आणि शिरजोर! म्हैप्या आण तो कोरडा इकडे! आणि चालता हो माझ्या घरांतून! माझ्या घरांत मी काय पाहिजे ते करणार! माझ्या बायकोला मी मारणार-ठार मारणार–

महिप० :- ह्या ध्यायींत परान् हाय तवर-ह्ये इसरा आतां गुमान रागाच्या येळला येक घडीभर शांत बसा—

पशुप० :- मला उपदेश करतोस? अरे सोद्या–चल हो बाजूला (त्याला ओढतो.)

महिप० :- (त्याचे दोन्ही हात धरून) धनी साब त्या परसंगाला पडू नकासा, मला तुमाला असच बांदून टाकून सरकारांत वर्दी द्येवी लागल. मग जड जाईल बगा!

पशुप० :- हरामखोर, पाजी, बेवकूब, बग्या अरे बग्या–

बग्या :- जी.

पशुप० :- पहातोस काय ह्या महिप्याची गठडी वळून टाक–

महिप० :- हां ह्मोर येशील तर मुडदा पडलाच समज! अर सापाच्या पोरा, खाल्ल्या अन्नाला इसरून वागनाऱ्या, भागुबाई, थूः तुझ्या पुरुसपनावर–तुझ्या नशीबाला जलमभर खेटर नी अखेर नरकच! [बग्या थबकतो.]

पशुप० :- अरे हातांत काय कांकणें भरलीस? ह्या ह्यातान्याच्या बडबडीलाच काय भितोस? तूं जवान आहेस, तरुण आहेस घाल एक लाथ आणि टाक कमरडें मोडून थेरड्याचें!

महिप० :- काळतोंड्या, मांगाचे काम करनाऱ्या, पळ माग होर येशील तर येका बग्याच दोन बग्या करीन! मासला होबा असला तर ये-

पशुप० :— बग्या बग्या—

(बग्या भीत भीत जवळ येतो व महिपतीस धरूं पहातो. महिपती एक जोरानें लाथ मारतो तो ' आईग मेलों ' ह्मणत जमिनीवर उताणा पडतो.)

महिप० :— ऊं! भोग! भोग! धनीसाब आतां मी तुमाली सोडतो पन ह्यो मासला बगितलाच तुमी. आतां माज्या नी बाईसाबांच्या वाटला जाऊं नगासा. न्हाईतर दावाल जगाला तमाशा म्हून ह्मनतो. (सोडतो) आतां भाईरन हिडूंनशान या थंड हून!

पशुप० :—(चरफडत) अरे चोरा, टाळकींच सडकतों दम धरा! [पाय आपटीत पुटपुटत जातो]

महिपती :-ह्ये यसनानं धुंद झाल्याल ल्योक बडबडायचच. हातून काय व्हनार हाय? [पाहून] अर मी येड्यावानी वडबडत काय व्हायलो. बाईसाबास्नी सुदी वर तर आनाय पायजे! (बग्या उठायला प्रयत्न करितो) हां गड्या असं नग करूं. आनखी बी येक खाशील. गप पडून ऱ्हा. मला तुज्यापुन लई समजून घ्याच हाय! [तो पुनः चळवळतो.] अर हरामजाद्या! हाल हाल आतां. [त्याला त्याचेच पटक्यानें बांधतो.] बाईसाब अजी बाईसाब (जवळ जाऊन) आं ह्या बोलनातबी नी हालनातबी. आतां काय

कराव! पळत जाऊन पाणी आगून डोकीवर शिंपतो पार्वती चळवळूं लागते.) आतां माज्या जिवांत जीव आला.

पार्वती :–(उठून दुःखानें) गेले काय रे ते महिपती. जातांना काय ह्मणाले. मला टाकून गेले काय रे.

महिपती :–बाईसाब आतां आपुन वाईच इश्वाप घ्या मग मी आपनास्नी समद सांगतों.

पार्वती :–[बग्याकडे लक्ष्य जाऊन] हा रे कोण? याला कां बांधला?

महिपती :–त्योच त्योच! समद्याच मूळ त्योच! त्येला का बांदला? जीवच घेनार. पन हाय अजून त्येच काम. बाईसाब त्ये समद मगच सांगतो. चला आपुन निजा चला [पार्वती जाऊं लागते पडदा पडतो.]

प्रवेश ४ था.

स्थळः–कांचनभटाच्या घराची ओटी.

(कांचनभट व भद्रेश्वर बोलत बसले आहेत.)

भद्रेश्वरः–(जेठा मारून) कां, झालें कीं नाहीं काम मनासारखें.

कांचन०:–हें काय विचारावें? तुमचा बार कधीं तरी गेलाय फुकट? (हांसतो.)

भद्रेश्वर :–(हांसत डबी काढून) घ्या तर तपकीर आनंदाची.

कांचन०:–तपकीर तरी गोठी मसालेदार दिसती बोवा? (हांसून) वाः! फारच नामी!

भद्रेश्वरः–त्यांत पुष्कळ जणांचा मसाला घातलाय ह्मटलं!

कांचन०:–ह्मणजे?

भद्रेश्वरः-ह्मणजे काय? बोलून जालून आह्मीं भट गडी. बारा घरच्या अन्नावर वाढलेले! बारा घरच्या आन् बारा कारस्थानांतल्या मसालेदार पैशांचीच ही तपकीर! आतां तरी कळलें!

कांचन० :—हां हां! बरोबर बरोबर!

भद्रेश्वरः-(खाकरून नाकांत तपकीर भरून) कूळ आहे कीं नाहीं खंबीर! अहो साधलें मात्र पाहिजे, ह्मणजे उखळ पांढरें झालेंच समजा! रोज, रोज, हिऱ्यामाणकांचा पाऊस पडेल! रुपयांची रास पडेल.

कांचन० :—कूळ तर लाख आहे पण—(थांबून पडद्याकडे पाहून) हे पहा शृगालराव इकडे आलेच! त्यांचा चेहेरा अगदीं उतरून गेला आहे. कार्टीनें दवडली वाटतें शिकार.

भद्रेश्वरः—(पुढें होऊन) काय काय शृगालराव—

शृगाल०:-(प्रवेशून) येतों. नमस्कार.

भद्रे०:-पण काय झालें सांगून तर जाल.

शृगाल०:— चूप! लुच्चा दिक्षिता, माझ्याकडून पैसे उपटून माझी बेअब्रू करण्याचा घाट घातला होतास, मला समजलें. बच्चाजी घेईन पाहून!

कांचन०:—दीक्षित, काय ह्मणतात हे?

भद्रे०:- जाऊं दे असल्या छचोर पोरांच्या बोलण्याला काय भीक घालायची आहे?

शृगाल० :—तुला भिक्षा मागायची दीक्षा देतों, सरकारांत कळवून शिक्षा करवितों आणि तुझा पुरता नक्षा उतरवितों, काय समजलास? तरच नांवचा शृगालराव!

भद्रे० :— अरे जा, अशी कोल्हेकुई ऐकून सिंह कधीं भ्याला आहे कां?

शृगाल० :— आं! ठीक ठीक. जिरेल बरें ही रग?

भद्रे० :—कांचन भटजी [कमर बांधीत] बोलावा पोलीस, गुलाम फार उद्दाम झालाय. दांत पाडून घशांत घातले पाहिजेत. कांरे भामट्या लोकाच्या घरांत शिरून दुसऱ्याच्या पोरीवर बळजबरी करायचा प्रयत्न करतोस काय? आतां कुठें जातोस? हड्डी नरम करून सोडतों. पहातां काय भटजी? मी याला सोडीत नाहीं. तुह्मी आणा पोलीस. शारदाच पुरावा देईल. आन् टाकूं इथल्या इथें अडकावून.

कांचन० :– [हळूच] अहो तो भ्यालासें दिसतें जाऊद्या हें. नसती व्याद कशाला?

भद्रेश्वर० :–(हळूच) गप्प बसा थोडा वेळ. [उघड] अरे ए निर्लज्ज पोरा! उतर हे दागिने. टाक इथें. आणि हो चालता.

शृगाल० :–[भिऊन दागिने देऊन] तुमच्या पायां पडतों पण पोलीसला नका कळवूं दीक्षित ?

भद्रेश्वर० :– जा जा, नामर्दा, भागुबाई जा जा; [जातो. कांचनभटजी तुह्मी अगदींच भित्रे. अहो 'लकडी दाखवेली कीं मकडी वळलीच.'

कांचन० :–होय; पण आतां हे दागिने कसे पचणार?

भद्रेश्वर० :–कसे पचणार? छाती नसली तर घेऊं नका तुह्मी! अहो काय माय व्याली आहे त्याची या दागिन्यांचें माझे ह्मणून पुनः नांव काढावयाची?

कांचन० :–समजा काढलें तर?

भद्रेश्वर० :– श्रीमंताकडून जबरीच्या प्रयत्नाबद्दल दावा लावायचा? बरें मला आतां वेळ नाहीं. हे दोन दागिने घ्या तुह्मी?

कांचन० :–एवढेच!

भद्रेश्वर० :- अरे बाबा एवढे तरी तुला पचूंदेत मग पाहूं.

कांचन ० :- (चडफडत) बरें.

भद्रेश्वर० :- येतो नमस्कार ? [स्वगत] कर वाटेल तेवढा दोहो हातांनीं. (जातो.)

कांचन० :- आतां पोरीला हें माझें काम ह्मणून कळलें तर ? ऊं: ! ती काय करणार कळेना ! येऊन जाऊन हिला सांगेल. ही जास्त कमी बोलली की काशी आणि संन्यास आहेच ? चला चैन आहे [जातो.]

(पडदा उघडतो शारदा विचारांत उभी आहे तोंवर इंदिरा व जयंत येतो.)

जयंत० :- (धांवत जाऊन शारदेचें लुगडें धरून) अक्का केव्हां ग आलीस ? [तोंडाकडे पाहून] आह्मी बाहेर गेलों होतों ह्मणून रुसलीस होय, बोलेनास कां ग ? आई बग कीं ग अक्का बोलत नाहीं. [शारदा रडूं लागते.]

इंदिरा० :- शारदे, शारदे, कांग कांग कांग ?

शारदा० :— आई, आई, चहूंकडून सगळ्यांनींच माझा असाछळवाद मांडला तर मी कुठवर सोसावें ग ! मी जगावें तरी कसें !

इंदिरा० :— शारदे, झालें तरी काय तुला ? अशी एकाएकी रडायला ग काय लागलीस ?

शारदा० :— आई, रडूं नको तर करूं तरी काय ? आई तुह्मीचना मला लग्न करून दुसऱ्याची केली ? मला तुह्मीच ना देव जोडून दिले ? मग--मग--असें करून मला... नरकाचा मार्ग तुह्मीच क ग दाखवितां ? आई, माझा तुह्माला कंटाळा आला असला, तर विषाचा पेला देऊन जगांतून नाहींशी करा; एकाद्या विहीरींत ढकलून द्या; जिवंतपणीं जाळून खाक करा ! डोक्यांत दगड घालून माझा

चेंदामेंदा करून टाका ! माझें आपल्या हातानें काय पाहिजे तें करा ! पण— (जोरानें रडूं लागते.)

इंदिरा:– (रडत) बाळे, तुला कांग आह्मी कंटाळूं ? तुझ्यासाठीं माझा जीव कसा तिळतिळ तुटतो तुला ठाऊक नाहीं काय ? मग असें बोलून माझ्या काळजाचें पाणी कां करतेस ? बाळे तुला विषाचा पेला द्यायची वेळ आली तर मीच पहिला घोंट घेईन ! विहिरींत पडून जीव देईन ! जिवंत जाळून घेईन पण तुझें बरें वाईट झालेलें बघायला जगायची नाहीं.

शारदा:— कळलीं कळलीं बरें सगळ्यांची करणी ? बोलणीं मानभावाचीं नी करणी कसाबाची !

इंदिरा:— [अत्यंत शोकानें] शारदे, शारदे, नकोग असें बोलूं ! ही बघ माझ्या अंगाला आग लागली; देवा, देवा, तुला डोळे आहेत ! बये, माझें हृदय काढून बघ ! त्यांत काळें, तुझ्याबद्दल पाप निघायचें नाहीं. घे घे तें खुरपें ! [दोघी गळ्यांत गळा घालून रडतात. जयंत आई, अक्का अक्का हांका मारीत रडत राहतो.]

इंदिरा:–(कांहीं वेळानें) काय झालें आतां तरी सांगशील कां शारदे !

शारदा:–माझ्या तोंडानें मी तो उच्चार तरी कसा करूं ?

इंदिरा:–श्रीमंतांनीं मारलें काय ?

शारदा:–देवांनीं मारलें तर तो प्रसादच, तो असा रडत येऊन कां मी तुला सांगेन ?

इंदिरा:–तर मग काय ?

शारदा:–तुला कल्पनासुद्धां होणार नाहीं. (सुस्कारा टाकून) बरें मी मात्र आतां माहेराला मुकलें ! आई, येतें मला कुंकू लाव !

इंदिरा:–आणि असें संदिग्ध बोलून ठेवून, मला तुझ्या आईला रडत ठेवूनच जाणार? हें तुला शोभतें ना?

शारदा:–[स्वगत] आपलेंच दांत नी आपलेंच ओंठ. मी दु:खाच्या भरांत ह्या कोंवळ्या मनाच्या आईला मात्र दुखवलें. आतां हिला सर्व प्रकार सांगितल्यावांचून हिचें मन शांत नाहीं होणार! (उघड) आई इकडे कर कान. ऐक. पण–मग मात्र वाईट वाटूं देऊं नको हो.

इंदिरा:–आकाशच फाटल्यावर ठिगळ कोण लावणार? संकटावर संकटें येऊन हें मन आतां चांगलें वज्रासारखें तयार झालें. सांग, काय घाव घालायचे ते घाल. मी सोसायला तयारच आहे!

शारदा:–ऐक तर मग. (हळूच सांगितल्यासारखें करून) चांगलें दिसतें नाहीं ग हें तुह्माला?

इंदिरा:–(लाल होऊन) काय, हें मी काय ऐकतें! आतां होउं दे येणें कपाळच फोडून घेतें पायाशीं! शारदे तुझा बाप कसाब ग कसाब! जा पळ पळ तो तुला चिरून, नाहीं राई राई एवढे तुकडे करूनसुद्धां विकील! जा जा, अझून इथेंच! आणि तो मेला बोका भद्रेश्वर होतांना बरोबर! काय करूं?

शारदा:–हां हां असा अविचार नको करूं. कोपाच्या आधीन नको होऊं! ह्मणूनच तुला मी सांगत नव्हतें! आई आतां मी फार वेळ बसत तर नाहींच, पण तुझ्याकडे ते कोदंड महाराज येतात ना वरचेवर, त्यांच्या कानीं ही हकीकत घालून मग ते सांगतील तसें कर? आपल्याच विचारानें जाऊं नको. लाव कुंकू! (कुंकू लावते.) येतें आतां [पडद्याकडे पाहून] हे पहा कोदंड महाराज आले. जातें मी. (स्वगत) देवच भेटला. आतां इच्या हातून अविचार होणार नाहीं. [जाते.]

इंदिराः–या डोळ्यांनीं आणखी काय काय बघायचें आहे? कुणाला ठाऊक?

कोदंडः–(प्रवेशतो. इंदिरा नमस्कार करिते.) अष्टपुत्र सौभाग्यवती भव!

इंदिराः–अष्ट पुत्र? नको रे देवा, आहे या पोरांची चाललेली स्थिति पाहूनच मी चूर होऊन गेलें!

कोदंडः–(स्वगत) बापडी शारदेच्या स्थितीकडे पाहून अगदीं त्रासून गेली. (उघड) आज कांचनभटजी कुठें दिसत नाहींत.

इंदिराः–गेले असतील कुठें तरी पोरीचीं हाडें विकायला? कोदंड महाराज, आतां तुह्मी तरी मनावर घेऊन मला एवढें दान द्या, एक जालीम विष मला आणून द्या, मला आतां हें बघवेना; माझे डोळे विटले, माझें मन विटलें; आतां जगण्यांत कांहीं हांशील नाहीं; तुमच्या पायां पडतें; ऐकाच माझी एवढी गोष्ट!

कोदंडः–काकू, तुह्माला इतकें त्रासायला झालें तरी काय?

इंदिराः–आतां आणखी व्हायचें काय राहिलें? पैशाच्या लोभानें पोरीचें मढ्याबरोबर लगीन केलें; तिला कायमची वांझ–विधवा केली; तिच्या रूपाची–गुणाची–राखरांगोळी केली; हें सगळें तिनें गिळलें! पण ... (रडत) तिचे धिंडवडे करून आतां आणि पैशाकरितां असें करावें कां हो यांनीं?

कोदंडः–(स्वगत) भद्रेश्वराचा उपदेश मानून कांचनभट असें कांहीं करणार असें ऐकलें होतें तेंच खरें झालें वाटतें. (उघड) काकू, आतां दुःख नका करूं? हे जरठकुमारीविवाहाचे परिणाम शेवटीं अशाच थराला जायाचे!

इंदिराः–महारज, पोरी स्वतः बिघडल्या तरी ती चूक आईबापांच्या डोक्यावर लोक मारणार. मग स्वतः आईबापांनींच जर

पोरींना हात धरून वाईट मार्गाला लावलें तर त्यांना तुह्मी काय ह्मणाल? लोक काय ह्मणतील?

कोदंड:–शेवटीं गोष्ट या थरावर आली ह्मणा! तरी माझ्या कानावर थोडी गुणगुण आलीच होती. काकू, आतां तुह्मी स्वस्थ असा, ईशकृपेनें लौकरच या सर्व गोष्टींचा शेवट गोड होईल.

इंदिरा:–शेवटापर्यंत जगण्याची निदान माझी तरी इच्छा नाहीं. भलभलतें बघून त्रास झाल्यापेक्षां आजच माझा शेवट झाला तर तोच मला गोड!

कोदंड:–छेः छेः! अशा त्रासूं नका! हे जरठकुमारीविवाहाचे परिणाम आतां सर्वांच्या डोळ्यांत अंजन घालतील, त्यांत सगळ्या अंधळ्याबरोबर कांचनभटजींचेही डोळे उघडतील, मग त्यांना केल्या कर्माचा पश्चात्ताप होईल.

इंदिरा:–रोगी मेल्यावर वैद्य येऊन करायचा काय? लोकांना बघून हांसायला, हळहळायला, पश्चात्ताप करायला, मौज मारायला सुद्धां सोपें जातें. त्यांचें हांसणें नी रडणें सारखेंच! पण भोगणें ज्याच्या नशीबीं येतें त्याचेंच कठीण! दुसऱ्या कुणाच्या पोरीचें असें झालें असतें तर मी सुद्धां नाक मुरडून हांसलें असतें! पण माझेंच तसें झाल्यावर काय करतें?

कोदंड:–या सगळ्या गोष्टी देवाच्या स्वाधीनच्या. इथें मनुष्याचें काय चालणार? आतां तुह्मी असें करा! रोज शंकराच्या पार्थिवाची पूजा करून त्याचें तीर्थ घेतल्यावांचून जेवावयाचें नाहीं असा नेम धरा! परमेश्वराला तुमची दया आली, ह्मणजे माणसांचें कांहीं चालणार नाहीं!

इंदिरा:–पण देवाला तरी माझी दया येईल काय?

कोदंड :–काकू ! हा संशय नका मनांत आणूं ? तो दयेचा सागर आहे; दुःखी भक्तांच्या हांकेला तो कमर बांधून चाकरासारखा तयार आहे ! त्याची दया कोण वर्णील ? प्रल्हादासाठीं खांबांत गुरगुरला, ध्रुवाकारितां रानांत प्रकटला, अंबरीषाकारितां जन्ममरणांच्या फेऱ्यांत पडला, पुंडरीकाकारितां विटेवर उभा राहिला; तो प्रभु तुमच्या दीन प्रार्थनेला खास द्रवेल !

इंदिरा :–तो तर श्रीकृष्ण !

कोदंडः — शंकर ह्मणजे तरी कोण ? त्यांत कांहींच भेद नाहीं ! बाणासुराकरितां समरांत येणारा, रावणाला आत्मलिंग देणारा, वेश्येला मुक्ति देणारा, खेचराच्या पायाखालीं राहणारा, तो भक्तीला वश असलेला भोळा देव आणि विष्णु कांहीं दोन नाहींत. कोणत्याहि भावनेनें एकनिष्ठपणानें तुह्मी त्याची आराधना करा ! तुमची निष्ठाच तुह्मांला फळ देईल ! येतों मी आतां (इंदिरा न० क० आशीर्वाद देतो.)

[दोघे जातात]

प्रवेश ५ वा.

(श्रीमंत आपल्याशीं कांहीं पत्रें काढून बसले आहेत.)

श्रीमंतः – काय ह्मणतो हा ! 'तुमच्या डोळ्यांत माती टाकून तिनें तुह्मांला ठकविलें !' काय मूर्खपणा हा ? माझी दृष्टि, बुद्धि सर्वच कांहीं नाहींसें होण्याइतकें काय माझें वय अझूनं झालें नाहीं ! आणि ती मला न् मी तिला सोडून एक पळभरसुद्धां राहत नाहीं. मग ही गोष्ट खरी कशी ह्मणावी ? तिनें मझ्या डोळ्यांत माती टाकण्याचें आधीं ह्यानें मात्र टाकण्याचा प्रयत्न केला खास ! हंः हंः हं ! [दुसरें पत्र फोडून] हे कोण राजश्री ? (सही पाहून) 'तुमचे हितचिंतक' काय हा हितचिंतकांचा सुळसुळाट ? उठतो तो माझें हित करायला

बघतो. पण बकसाधूंनो तुमचा हा ओला प्रेमा मी पक्का ओळखून आहे! तुमच्या या युक्त्या ऊर्फ वाऱ्यावर बांधलेल्या इमारती मी एका फुंकरासरश्या ढांसळून टाकीन! (मनांत वाचून) आँ! [संशयग्रस्त वि०] अरे लोभ्या कांचनभटा! माझ्या भांडारावर दिवसा ढवळ्या पाहिजे त्यानें हात मारावा ही स्थिति मी मरेपर्यंत अगदींच अशक्य! [पुढें आणखी पत्रें फोडून वाचूं लागतो तसतशी चेहऱ्यावर रागाचीं चिन्हें दिसूं लागतात.] (दांत ओंठ खात) काय करूं! माझ्या अंगाची कशी आग झाली आहे.

शारदा :-(प्रवेशून) आजपासून माहेरचें बोलावणें आलें तरी मला पाठवायची नाहीं. हे पाय सोडून मी एक घटकाभरसुद्धां हालणार नाहीं.

श्रीमंत :-[स्वगत] हीं पत्रें आणि हें भाषण यांचा आतां मेळ तरी कसा घालायचा?

शारदा :-[स्वगत] हें काय? आज तब्येत अशी गरम कां बरें दिसते?

श्रीमंत :-कां माहेराहून लौकरच परतलीस? भेटले होते कां ते?

शारदा :-बाबा ना? भेटले होते! माझ्या बोलण्याचें उत्तर नाहीं देणें झालें पण?

श्रीमंत :-(स्वगत) विषय परतवला! गोम आहे कांहीं तरी! [उघड] बाबा नव्हत? ते आपले हे-(दांत खातो.)

शारदा :-[स्वगत] आज चिन्ह कांहीं निराळें दिसतें! आई जगदंबे आतां तूंच साक्षी.

श्रीमंत :-(खवळून) कां बोलेनास? तोंड कां उतरलें?

शारदा :-(भिऊन) असें काय हें बोलायचें?

श्रीमंत :–आमचें बोलणें वाईट नी तुमचें करणें मात्र चांगलें नाहीं? बोल कुणाला भेटायला गेली होतीस?

शारदा :—बाबा नव्हते कां आले बोलवायला? आणि इकडून परवानगी झाली ह्मणूनच तर मी गेलें होतें!

श्रीमंत :–[ओंठ चावीत] बाबा कसचा? तो तर मध्यस्थ? दलाल.

शारदा :–आज हें काय इकडच्या मनांत आलेंय?

श्रीमंत :–तुह्मी केलेंय तेंच मनांत आलेंय!

शारदा :–मी इकडच्या परवानगीवांचून कांहींसुद्धां करित नाहीं, इकडच्या पायापासून दूर जात नाहीं, हें कां माहीत नसायचें?

श्रीमंत :—बरोबर! माहेरला जायाला परवानगी दिली कीं तीच माझ्या नांवाला काळोखी आणण्याच्या उपयोगी पडते. (शारदा काळवंडते) होय ना? बघ! तूं तोंडानें नाहीं सांगितलेंस तरी तुझा चेहेरा मला सर्व सांगतो! (रागानें लाल होऊन) जारिणी, पातिव्रत्याचा डौल आणून पतीला फसविणारे मायावी राक्षसिणी; [शारदा रडूं लागते] कांगावखोर–ढोंगी–रडून साजरें करूं पाहतेस? थांब तुला मरेपर्यंत तळघरांतल्या अंधार कोठडीचीच हवा देतों! मेल्यावर नरकवास तर तूं तुझ्या कर्मानींच ठरवून टाकलास. (उठून पाय आपटीत जाऊं लागतो. शारदा त्याच्या पायावर मूर्च्छा येऊन पडते) अहाहा! कोणी ह्मणेल खरीच पतिव्रता. बेशुद्ध होऊन पडली! पण ही तोंडाशीं अमृत पण आंत विष भरलेली मातीची घागर! ऊठ जारिणी आणि कृत कर्माचीं फळें भोगण्यास तयार हो! [लाथ मारून जाऊं लागतो.)

१ गडी:–(प्रवेशून) रामराम दादा शिरीमंत ह्मनल्यात् त्ये अपुनच न्हव?

श्रीमंत:–होय!

१ गडी:–[पत्र देऊन] ही चिटी येका बामनानं आपनास्नी द्याय दिली नी आपुन वाचल्यावर परताय सांगितलया मला! वाचा मायबाप!

श्रीमंत:–(फोडून वाचून) जा वाचिली ह्मणावें! (गडी जातां जातां)

१ गडी:–नी त्या कोन पडल्याता जी?

श्रीमंत:–जा! (गडी जातो) हा काय चमत्कार मला प्रथम वाटलें हें पत्र त्याच मासल्याचें असेल; पण हें तर त्याच्या अगदीं उलट! आणि कळकळीनें लिहिलेलें! त्या पत्राप्रमाणेंच माझा याच्यावर ही विश्वास बसला! [वाचतो] 'तुमची पत्नी निरपराध आहे! तिच्या लोभी बापानें पैसे मिळविण्याकरितां तिला बिघडवण्याचा खूप प्रयत्न केला पण तो तिच्या पातिव्रत्याच्या तेजापुढें ढिला पडला! ती पतिव्रता खरी पतिव्रता आहे! आपण तिच्या प्रत्येक कृतीवर बारीक नजर ठेवावी ह्मणजे आपलीच याबद्दल खातरी होईल!' बस्स! आतां याच्या ह्मणण्याप्रमाणेंच तिच्यावर गुप्त नजर ठेवायची. (शारदा हालते तिजकडे पाहून) ही सावध होते आहे! तर आतांच लपून राहून ही काय ह्मणते तें ऐकावें [गडबडीने जातो]

शारदा:–(बेशुद्ध स्थितींतच) हे पाय मी आतां नाहीं सोडायची! अगबाई—काय—हा आरोप करायचा? देवा, [सावध होऊन एकदम उठून] अं! जाणें झालेंचना शेवटीं? (बसते) हे निष्ठुर प्राण अझून कसे राहिले? आतां जगून काय करायचें? ज्याकरितां जगायचें तो माझा आधार डळमळला! सगळ्या जगानें मला वाटेल तें ह्मटलें असतें तर मी तें सहन केलें असतें! पण जिथला एक गोड शब्द ह्मणजे माझें स्वर्गसुख, आणि जगण्याचा हेतु तिथूनच. असा आरोप झाल्यावर—देवा—तुला—डोळे नाहींत काय?

अथवा माझे कर्मभोग संपेपर्यंत तूं तरी काय करणार ? शारदे, हतभागिनी, तुझें हें काळें तोंड या जगांतून आतां लपव ! (कपाळावर हात मारून घेते) माझ्या मनांत तें कितीदां तरी आलें, बाबांचें तें करणें सांगून टाकावें ह्मणजे मनांतला संशय जाईल ह्मणून ? पण तो शब्द, ऐकल्याबरोबर सर्व जिथल्या तिथेंच जिरलें ! आई मला जन्म कशाला दिलास ? जन्मल्याबरोबर गळ्याला नख देऊन माझा प्राण कां नाहीं घेतलास ? देवा अपकीर्तीपेक्षां मरण बरें असें तुझेंच ना गीतेंत सांगणें आहे ! मग माझ्या आत्महत्येला आतां कसला दोष ! पण—मी मेलें तर—इकडची मी शुद्ध असल्याबद्दल कशी खातरी होणार ? या तोंडचा असा आरोप घेऊनच कां मी मरायचें ? मग मला मी स्वर्गांत गेलें तरी सुख कुठून मिळणार ? पति हाच स्त्रियांचा देव ! त्याचा गोड शब्द हेंच सुख आणि त्याचा असला आरोप हाच नरक ! मग त्यांचें मन शुद्ध झाल्याशिवाय मी मेलें तर मला जन्मोजन्मीं नरकच ! आतां मी काय करूं ! माझ्या सुखाच्या भांडाराला आज आग लागली ! कोण विझविणार ! कोण विझविणार ! (वेड्याप्रमाणें) हें पहा बाबा दिवटी घेऊन नाचताहेत—ते—तेच— आग लावणारे—(ओरडून) आई, आई, देवा, धांवा हो धांवा—(बेशुद्ध होऊन पडते.) [पडदा पडतो.]

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ—श्रीमंतांच्या वाड्यांतील एक महाल.

(शारदा पोथी वाचीत आहे तोंच दामिनी प्रवेश करिते.)

दामिनीः—[प्रवेशून] काय चाललेंय शारदा वहिनी ?

शारदाः-[पाहून] यावें वन्सें! कुणीकडे वाट चुकलें हें उंब-राचें फूल?

दामिनीः-उंबराचें फूल कशाचें? तुह्मीच घरकोंड्या ह्मणून गांठ नाहीं पडत!

शारदाः- पण बसून तरी बोला (दामिनी बसते) वन्सें इकडे मी बाहेर गेलेलं अगदीं खपत नाहीं! मग त्यांच्या मर्जीविरुद्ध आपण तरी कां वागा?

दामि०:-हो. त्यांच्या मर्जी खालीं मग आपली भाजी कां होईना! वहिनी, तुह्मी व मी समदुःखी ह्मणून सांगतें, सर्व गोष्टी करून सव-रून ह्मातारपणीं यांची हौस आतां तृप्त झाली, पण आमची तरुणपणीं -अगदीं अल्लडपणींच कशी व्हावी? याचा नको कां त्यांनीं विचार करायला!

शारदाः— वन्सें मला मोठें नवल वाटतें! तुह्मी हें आपल्या बायकांच्या अधिकाराच्या बाहेर बोललांत!

दामिनीः - तें कसें काय? तरुणपणीं, योग्य असे भोग विलास राहोत मेले, पण निदान डागदागिने घालून उंची पैठण्या नेसून मिर-वित देवाला जाण्याची हौस पुरी करून घेण्याचाहि नाहीं कां अधि-कार आपला?

शारदाः— तें कांहीं बाई मला समजत नाहीं! फक्त आपण ज्यांच्या पदरीं पडलों त्यांची आज्ञा तोच आपला धर्म! एवढें मला समजतें!

दामिनीः - आमचें बायकांचें असेंच आहे बाई! आह्मी यांचे शब्द झेलावे यांची नाहीं नाहीं तशी सेवा करावी नी यांनीं मात्र आह्मांला एक काडीमात्र सुख देऊं नये! खरेंच सांगा वहिनी यांना

जर आमच्या सुखाची काळजी नाहीं तर आपण तरी यांच्या सुखा करितां कां झटावें ?

शारदाः – तर मग तुमचें ह्मणणें संसारांत सदा धुसफूस आणि कडकड असावी असेंच दिसतें.

दामि०ः – ज्यानें त्यानें आपलें सुख पाहिल्यावर कसली आली धुसफूस ?

शारदाः – सगळ्यांच्याच आवडी एक प्रकारच्या कोठून असणार? एकाला ज्यांत सुख होतें त्यांतच दुसऱ्याला दुःख होतें ! मग प्रत्येकानें आपलें सुख पाहिल्यावर एक विचार मुळींच रहाणार नाहीं. आणि एकविचारांतलें सुख दुसऱ्या कशांत नाहीं ! वन्सं ! मी तुह्मांला सांगतें प्रथम कांहीं काळपर्यंत आपली आवड बाजूला ठेवून जरी आपल्याला कष्ट सोसावे लागले तरी ते सोसावे ! कारण तेवढा काळ गेल्यावर, पहिला मनु पालटून घरांत आपल्या आवडीला थोडें थोडें महत्व मिळूं लागतें !

दामिनी :–पण आह्मीच आपली आवड कां ह्मणून बाजूला ठेवावी ?

शारदा :–तुह्मी वेड्यातर नाहीं वन्सं ? तुह्माला गुलामाप्रमाणें कां वागवतात ? मुखत्यारी मिळण्याच्या आधीं एकादा राजपुत्र जसा सुखांत असतो तशाच तुह्मी असतां. तुह्मांला कांहीं तरी पडतें कमी ?

दामिनी :–कांहीं नाहीं पडत ? (मान ओंवाळून) भरपूर असतें सुख बरें ! फक्त कारणाशिवाय बोलायचें नाहीं, सांगितल्याशिवाय करायचें नाहीं, आणि होईल तें बघायचें, हीच आमची स्वतंत्रता ? गुलामगिरी ह्मणजे काय आणखी ? शिंगेंबिंगें असतात वाटतें तिला ?

शारदा :–पण अडाणीपणांत जर स्वतंत्रता मिळाली तर तिचा उपयोगसुद्धां नाहीं बरें करायला येत? उलट त्यापासून तोटाच होतो!

दामिनी :–[स्वगत] माझ्या कोणत्याच बोलण्याला ही हार जाईना! आतां कांहीं निराळी तऱ्हा काढावी! [उघड] बरें वहिनी राहूं दे तो कंटाळवाणा विषय! पण तुह्मी अमळ बाहेर येता कां देवाला, गाडी आहे माझी बाहेर उभी जाऊन लौकरच परत येऊं!

शारदा :—माझा देव, धर्म, सगळा घरांत! बाहेरच्या देवाला जाऊन घरच्या देवाचें मन बिघडवण्यांत कुणाला फायदा होत असला तर होवो. मला तर तें जन्मभर दुःखाचें कारणच होणार!

दामिनी :—तर मग वहिनी, तुह्मी अगदींच उदास झाला ह्मणायच्या! पण असें होऊन जगांतल्या मौजा; तुह्मांला कशा बघायला मिळणार? प्रत्येक विषयांतली गोडी तो चाखल्यावांचून कां समजणार आहे! उठा, अशा उदास होऊन हें तुमचें मुसमुसलेलें तारुण्य फुकट नका घालवूं! निरनिराळ्या विषयांच्या भोगानेंच याला गोडी येते! [तिचा हात धरून उठवूं लागते.]

शारदा :–वन्सें मला असा भलताच आग्रह नका करूं! मिठानें पदार्थाला गोडी येते ह्मणून, सर्वच पदार्थांत मीठ घातलें, किंवा मिठाचेच पदार्थ तयार केले, नाहींतर दुधांत साखरेच्या बदली मीठ घातलें तर चालेल कां! सगळें सगळें जिथल्या तिथेंच असलेलें ठीक!

दामिनी :–पण खमंग पदार्थांत तर पाहिजे ना मीठ? अहो जिथलें तिथेंच नाहीं करायचें तर करायचें केव्हां? तरुणपणांतल्या गोष्टी ह्मातारपणांत होतील कां आणि झाल्या तरी शोभतील तरी कां? वेड्या नाहींतर! वहिनी या जगांत कोणी कुणाचें नाहीं बरें! आपलें हित आपल्यालाच बघितलें पाहिजे! तुमच्या या स्वरूपाकडे, या

तारुण्याकडे आणि या असल्या स्थितीकडे बघून मला तर बाई तुमची कींव येते! हें तुमचें तारुण्यानें अगदीं गजबरून गेलेलें शरीर तुह्मी असेंच सुकवणार काय?

शारदा:—वन्सें! तुह्मांला खरोखरच माझी कींव येत असली तर तुह्मी असलीं बोलणीं बोलूं नका!

दामिनी:- मला सुद्धां पहिल्यानें तुझ्यासारखेंच वाटत होतें! ती गोडी समजल्याबरोबर मी हें पार विसरलें? तूं ह्मणशील यांत पाप आहे? पण मी ह्मणतें, दैवानें किंवा आईबापांच्या लोभानें आपल्या माथीं मारलेल्याची सेवा उत्तम रीतीनें करून जर आपण आपलें सुख पाहिलें तर मग काय त्याची भीति?

शारदा:-अरेरे! काय ही तुमची खुळी समजूत! दुसऱ्याला-आपल्या जिव्हाळ्याच्या माणसाला—कोणालासुद्धां न कळतां विष प्यालें ह्मणून कां त्याचा परिणाम अमृतासारखा होणार? विष तें विषच!

दामिनी:—वहिनी! आज माझ्या प्रकृतीकडे, स्वभावाकडे, आणि सुखाकडे पहा! मी तुमच्यापेक्षां शतपट बळकट झालें, तुह्मी रोड होऊं लागला, माझा स्वभाव आनंदी रंगेल बनत चालला, तुह्मी दिवसेदिवस उदासच होता. माझ्या इतकी सुखी जगांत कोणी मिळणार नाहीं. आणि तुमच्या इतक्या दुःखी सुद्धां तुह्मीच एक! मग आतां सांगा पाहूं तुमच्या या पापानें विषानें अमृतासारखा परिणाम केला कां नाहीं तो?

शारदा०:—तें तुमचें अमृत तुह्मालाच लखलाभ! मला त्याचा उच्चार सुद्धां ऐकणें नको! आह्मी हिंदु पतिव्रता, कायिक किंवा ऐहिक सौख्याकरितां झटतों अशी कां तुमची समजूत आहे? असली तर ती साफ खोटी, चुकीची आहे! एक क्षणभर टिकणारीं, आरंभीं

गोड वाटणारीं, पण शेंवटीं हालाहालापेक्षां कडू असल्या कायिक सुखांवर आह्मी लाथ मारतों ! समजलां ! परलोकच्या स्थायिक आणि शाश्वत सुखाकरतां आह्मी, वाटेल ते कष्ट सोसावे लागले तरी सोसूं ! असल्या खऱ्या सुखाचा सोपा रस्ता सोडून नरकाच्या रस्त्याला ज्याला जायचें असेल त्याला कोण अडवणार ?

दामिनीः–वहिनी, तुह्मांला मी आजपर्यंत फार शहाण्या समजत होतें ! अहो, तुमच्या मनांत हें स्वर्ग, नी परलोक असलें खूळ कुणीं भरवून दिलें; जें कांहीं सुखदुःख भोगायचें तें सारें इथेंच ! हा काळ असा कष्टांत घालवून पुढें सुख आहे ह्मणून त्यावर आशा ठेवायची हा शुद्ध वेडेपणा आहे ?

शारदाः– तुमच्याप्रमाणें शहाणें होण्यापेक्षां मी आपली अशी वेडी आहे तीच बरी.

दामिनीः–बरें ! [सुस्कारा टाकून] माझें कर्तव्य मी बजावलें ! शारदे अझून विचार कर ! 'वाहत्या गंगेंत हात धुऊन घे.' हें वय गेल्यावर—

शारदाः–पुरे पुरे ! कळला, तुमचा सगळा उपदेश मला कळला ! आतां एक अक्षर सुद्धां ऐकण्याची माझी इच्छा नाहीं बरें वन्सें !

दामिनीः–'ज्याचें करायला जावें बरें, तो ह्मणे माझेंच खरें !' बरें तूं अशीच रहा हं. मीच बघीन किती दिवस चालतात हीं सोंगें तीं?

श्रीमंतः–(प्रवेशून आवेशानें) अगे ए निर्लज्ज कुंटिणी ! तुला तुझा स्वतःचा देह रस्त्यावर मांडलास तेवढ्यानें संतोष झाला नाहीं वाटतें ?

दामिनीः– आपल्यासारख्या थेरड्यांच्या लग्नाच्या हौशीचाच हा परिणाम ! ह्मटलें !

श्रीमंत–उर्मट, पाजी, मला उलट बोलतेस ? बोल तूं माझ्या घरांत कां आलीस ?

दामिनीः–माझ्या मैत्रिणीला भेटायला!

श्रीमंतः–तुझी मैत्रीण कोण?

दामिनीः–शारदा, सारख्याला वारखें मिळालें ह्मणजे त्यांची मैत्री जमतेच!

श्रीमंतः–छचोर पोरी, तुमचें दोघींचें सर्व भाषण मीं ऐकलें? माझ्या कानांच्या दोषामुळें तें जरी अगदीं जसेंच्या तसेंच मला सांगतां येणार नाहीं. तरी जें कांहीं मला पूर्ण कळलें त्यावरून तुझा हलकट प्रयत्न मला समजून आला! थांब तुझी खोड कायमची जिरवून टाकतों. (दांत ओंठ खात मारायला आंगावर धावतो.)

दामिनीः–(हांसत) सांभाळा श्रीमंत. मी आपली गरीब आणि दुबळी शारदा नव्हे? [मागें सरकते]

श्रीमंतः– आँ! कैदासिणी काय ह्मटलेंस? [पुढें होऊन दोन बुक्या मारतों.]

शारदाः—(मध्यें येऊन) हां हां! असें भलतेंच काय करायचें! बोलून चालून ती परकी नी बायको माणूस! दामिनी वन्सें जा बरें आपण आतां! मी आपल्याला पदर पसरतें, क्षमा मागतें ह्याख्या गोष्टीबद्दल राग धरूं नका?

श्रीमंतः–त्या हलकटेची क्षमा कशाला मागतेस? [दामिनी जाते] तूं आलीस ह्मणूनच मीं तिला सोडलें! तिनेंच तुझे उपकार मानायला पाहिजेत! (स्वगत) ईर्ष्येनें मी सुद्धां गाढवावरच स्वार व्हायचा पण दैवयोगानें मला त्या ऐवजीं घोडेंच सांपडलें! (दोघे जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळः— ओरी [कोदंड व हिरण्यगर्भ बोलत आहेत.]

कोदंडः– तर मग या कामीं तो इमानी चाकर फार उपयोगी पडला ह्मणायचा!

हिरण्य०:– हो हो! यांत काय संशय? त्यानें आणखी त्या वल्लरीच्या सहाय्यानें तिच्या पतीला खजीन्यांतील एक पैही नेतां येऊं नये अशी व्यवस्था केली आहे.

कोदंड:– ती कशी काय बोवा?

हिरण्य०:–त्यानें वल्लरीच्या माहेराहून तिच्या भावाला तार करून आणविला आहे. आणि त्याच्यां कडून सर्व हकीकत येथील न्यायाधीशांचे कानीं घालून त्यांजकडून एक पोलीस घेतला आहे. तो पशुपतीला घरांतून बाहेर कांहीं जिन्नस नेऊं देत नाहीं! या पासून ही शुद्धीवर न येतां, त्यानें आतां घरीं येण्याचेंच वर्ज केलेसें दिसतें.

को०:– मग आतां वंचुकराव वगैरे मंडळी याला कशाला चिकटून राहते?

हि०:— छे:! त्या दामिनीकडील झरा आहे ना अद्याप सुरू! बाकी तोही बंद होण्याचा काळ जवळ येत चालला आहे! त्या दामिनीला आतां या एकाच प्रकाराचा कंटाळा आला आहे!

को०:– 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतशः'!

हिरण्य०:–ती अझून याच्याशीं उघड उघड तुटून वागत नाहीं; पण तिनें आंतून दुसऱ्या एकाशीं संधान बांधलें आहे. तें कांहीं कां असेना? पण कोदंडा, मला वाटतें आतां ही गोष्ट हळू हळू पक्क दशेला येत चालली, इचा शेंवट आतां जवळच कोठें तरी आहे!

कोदंड:–मला ही तसेंच वाटतें! इकडे श्रीमंतही दोन दिवसांपासून आजारी आहेत. आणि त्यांच्या आजारीपणांत कांहीं थोडें पश्चात्तापाचें बीज दिसतें. मला आजच इंदिराकाकू भेटल्या होत्या, त्या सांगत होत्या कीं श्रीमंत शारदेकडे पाहून रडतात, तिला प्रेमानें कुरवाळतात, आणि हें फूल मीं सुकवलें असें ह्मणून अश्रु गाळतात.

हिरण्य०:—तिच्या पातिव्रत्यतेजाचाच हा परिणाम! असो. एकूण आपलीं तीनहीं कथानकें आतां अगदीं उपसंहाराला येऊन ठेपलीं आहेत.

कोदंड:--पण आपल्याला अनुकूल असा उपसंहार करून घेण्याकरितां प्रयत्नाला लागलें पाहिजे! भद्रेश्वर दीक्षिताला आणि त्या वंचुकरावाला आतां कोणत्या मार्गानें जर्जर करावेत याचाही विचार करणें अवश्य आहे.

हिरण्य०:—माझ्या मतानें आपल्याला विचारच करावा लागणार नाहीं. कारण परमेश्वरानें, आतांपर्यंत जे जे योग आणले आहेत. त्यावरून वाटतें कीं, त्याच्याच मनांत हें कार्य करावयाचें आहे! वंचुकरावाला हतबल करण्याकरितां पशुपतीचा मेहुणा, बायको आणि चाकर, अशीं तीन माणसें डोळ्यांत तेल घालून राहिलीं आहेत. जेथें बाजू कमी पडेल तेथें उचलून धरण्यास आपला हिरालाल आहेच!

कोदंड:—पण भद्रेश्वराचा संबंध कसा जुळणार?

हिरण्य०:—देव करील त्याचीही योग्य ती व्यवस्था!

हिरालाल:-(प्रवेशून) तात्या, दादा, आजपासून आपल्याला फार सावधगिरीनें वागलें पाहिजे.

कोदंड:—कां बरें?

हिरा०:—पशुपतीच्या दागिन्यांतील वांटा वंचुकरावानें भद्रेश्वराला दिला नाहीं ह्मणून तो कृष्ण सर्प चिडून गेला आहे. काल गांवाबाहेरच्या पडक्या मारुतीच्या देवळांत त्यानें कांहीं दरोडेखोरांची गांठ घेतली. त्यांच्या मदतीनें तो अभिसारमंदिर लुटणार खास! मला तरी हा सुगावा लागायचा कठीणच पण वंचुकरावही असल्याच एका प्रयत्नांत असल्यामुळें मला तिकडे जावें लागलें होतें! ह्मणून बरें!

हिरण्य०:-कां कोदंडा, आतां आहे कीं नाहीं बहार!

कोदंड:-त्याचे मनांत आल्यावर काय एक होणार नाहीं?

हिरा:-आज तर बातम्यांचाच दिवस आहे! ऐकाल तेवढ्या थोड्या!

हिरण्य०:—सांग सांग तर एक एक.

हिरा०:-पशुपतीकडून आतां कांहीं 'चांदरात झडण्याचा' संभव नाहींच तेव्हां वंचुकरावानें दामिनीचे मनांतून तो उतरावा म्हणून प्रयत्न चालविला त्याला थोडें यश आलेंसें दिसतें. कारण आतांशा दोन तीन दिवस दामिनी त्याची गांठ घेण्याची टाळते. दुसरा एक उल्लू तरुण आतां वंचुकराच्याच मदतीनें तिला वश करूं पाहतो आहे. पण या सर्व प्रयत्नांत एक मोठा अडथळा उत्पन्न झाला आहे. इतके दिवस दामिनी म्हणजे पतिव्रतांची अग्रसर देवता असें जें सुदामाचें मत होतें, तें बिघडलें. त्याला तिच्या कृत्याचा सुगावा लागला किंवा निदान संशय तरी आला. आणि याला कारण म्हणजे, त्याची व श्रीमंतांची गांठ पडली होती म्हणे; त्यांत श्रीमंतांनीं त्याला कांहीं सांगितलें अशी गुण गुण माझ्या कानीं आली. कांहीं असो. सुदाम दामिनीचा थोड्याच काळांत एक मोठा खटका उडणार मग दामिनी जर वंचुकरावाचेंच ऐकेल तर हा कांटा उपटून काढण्याला तो तिच्याकडून खुनासारखें भयंकर कृत्य सुद्धां करवील. असें त्याच्या दोन चार दिवसांतल्या हालचालीवरून वाटतें.

कोदंड:-आपल्याला आतां बऱ्याच गोष्टींकडे लक्ष्य पोहोंचाविलें पाहिजे!

हिरण्य:-(पडद्याकडे पाहून हळूच) अरे हा भद्रेश्वरच पहा इकडे येत आहे. हा कुठें बरें निघाला असेल?

हिरा०:–मला ठाऊक आहे त्याचें रोजचें ठिकाण! इकडे लांब उत्तरेस–तो एक पडका पार नाहीं कां नदीच्या काठीं? त्याच्या एका बाजूला फार घाण आहे. तिकडे अगदीं कोणी ह्मणतां कोणी सुद्धां जात नाहीं. तेथेंच जाऊन हा आपल्याशीं विचार करित बसतो.

हिरण्य० :–तर मग याच्या मागोमाग जाऊन लपून राहून आणखी कांहीं सुगावा लागतो कीं काय हें पाहून आह्मांला पुनः येऊन सांग. [हिरालाल जातो.]

कोदंड:–सुदामाच्या खुनाचा प्रयत्न ह्मणून पाडणें, वंचुकरावाला आणि भद्रेश्वराला असल्याच एकाद्या कारस्थानांत पुराव्यासह पकडणें, आणि पशुपतीला ताळ्यावर आणणें, या तीन गोष्टी सध्यां आपल्यासमोर आहेत.

हिरण्य० :–अन्यायीयांना शिक्षा झाली ह्मणजे त्यांच्या संगतीनें बिघडलेले लोक खडबडून मार्गावर येतात. देवानें, वंचुक आणि भद्रेश्वर या जोडीला प्रायःश्चित दिलें कीं, पशुपति काय तेव्हांच निवळेल!

कोदंड:–घोर नरकाला कारण जो वर्णसंकर तो, स्त्रियांची नीति बिघडली कीं, उत्पन्न होतो. ह्मणून स्त्रियांची नीति न बिघडावी ह्मणून काय काय गोष्टी केल्या पाहिजेत, याचा सर्व लोकांना बोध व्हावा ह्मणूनच देवानें हीं चरित्रें घडवून आणण्याचा घाट घातला असावा.

हिरण्य० :–असेंच! गीतेंतलीं वचनें अनुभवानें सत्य करून दाखविण्याचा त्याचा विचार असणारच; कारण तीं नित्य सत्य अशीं त्याचींच वचनें आहेत! बरें कोदंडा, मी आतां वल्लरीकडे जाऊन येतों. तूं मात्र हिरालाल भेटल्याशिवाय येथून हालूं नको.

कोदंड:-ठीक! (हिरण्यगर्भ जातो.) दुष्कृत्यें करणारांना रात्र, ओसाड देवळें, निर्मनुष्य अरण्यें, अंधाऱ्या गुहा हीं फार प्रिय! तमोगुणी मनुष्यांची आवड अशीच असायची. लोकांना भयंकर वाटणाऱ्या गोष्टींत त्यांना गोडी लागायची! ज्यांचीं नांवें ऐकून अंगावर शहारे येतात, असलीं आपलीं अनन्वित कृत्यें—ते आपल्या मतानें अत्यंत गुप्त आणि अंतःकरणाच्या काळेपणासही मागें सारणाऱ्या अंधाऱ्या जागेंत करितात. पण देव तिथेंही त्यांना पहातो. आणि त्यांचीं तीं कृत्यें सूर्याच्या रखरखीत प्रकाशांत ओढून आणितो.

१ चाकर:-(प्रवेशून) तुमाला इंदराबाईनीं—शिरीमंताच्या सासवेनीं कशाला असच यून जावा ह्मटलय.

कोदंड:-बरें! आलोंच ह्मणून सांग! [गडी जातो] आतां हिरालालाला येथें एक पत्र ठेवून जावें ह्मणजे बरें. (पत्र ठेवितो व जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ:-नदीचे कांठचा पडका पार.

भद्रेश्वर:-(एकटाच बसलेला स्वगत) आतां हा कंचुकराव माझ्या तावडींतून कसा सुटतो पाहूं! त्याला दोन दिवसांतच कफल्लक करून सोडतों. सापाच्या शेंपटीवर पाय दिला ह्मणजे काय प्रायश्चित मिळतें तें घेऊंदे पाहून! तो हेमकर्म सोनारही आपल्याला कांहीं दिलें नाहीं ह्मणून त्याच्यावर उलटून मला वश झाला. या शुभ शकुनावरून कार्य तडीस जाणार हें खास ठरलें. फक्त त्या मांगांच्याकडून आपल्याला लुटींतला वांटा मिळायला पाहिजे याला युक्ति काय करावी? एवढा विचार काय तो राहिला. [विचार

करून] हां ! असेंच ! त्यांची लूट घेऊन पळण्याची वाट आपल्याला आहेच माहिती ! तिथें उभा राहून त्यांना दरडावायचें ह्मणजे आपणच वांटा देतात. (हांसून) ही युक्त्यांची जंत्री जवळ असल्यावर काय कमी ? त्रैलोक्याची उलटापालट करून सोडूं ! पण आपल्याला अशी निर्भय जागा कुठेंशी मिळणार (थांबून) हां हां ! त्या सरवट्याच्या बोळाच्या तोंडाशीं लपून राहिल्यावर घस्त्याच्या बापालाहि सांपडणार नाहीं. आणि यदाकदाचित् दिसलोंच तर तिथें ब्रह्म भूत आहे हें त्यांना आहेच माहीत ! त्याचाच आणावा आविर्भाव ह्मणजे झालें ! गुल मांची तिरपीट उडून जाईल ! [जोरानें हांसतो त्याचा प्रतिध्वनि होतो.] आं आणखी हांसण्याचा दुसरा आवाज ! कोणी तरी आहे खास ! (घाबरून चोहोंकडे पाहून कोणी नाहीं अशी खात्री झाल्यावर) हः हः हः ! वाजे पाऊल आपुलें वाटे मागें कोण आलें ॥ निवळ भ्रम झालें ! (गंभीरपणानें) दीक्षित व्हा तयार (पुनः सभोंवर पाहतो तों झाडा मागें लपलेला हिरा दिसतो त्या बरोबर) तरी वाटलेंच ! [स्वगत] अरेरे ! आतां कांहीं तरी मोठा घात होणार ! [सुस्कारा टाकून उघड मोठ्यानें] कोण आहे झाडापाठीमागें ?

हिरा :–[न भितां घोगऱ्या आवाजांत] ब्रह्म भूत !

भद्रेश्वर :—तें ब्राह्मणांच्या वाटेला कधींच जाणार नाहीं.

हिरा :—पवित्र ब्राह्मणांच्या वाटेला जात नाहींच ! पण.

भद्रेश्वर :–[शहारे आलेसें करून] पण काय मी अपवित्र.

हिरा० :–(जोरानें) होय होय ! घोरकर्मी, दुष्ट, अपवित्र.

भद्रेश्वर:–[स्वगत] खरेंच खरेंच तसें ! राम राम राम राम !

हिरा:–माझें नांव तूं कां काढलें होतेंस ?

भद्रेश्वरः–[स्वगत] पण या संध्याकाळच्या वेळींच हें कसें इथें आलें ? कोणी लुच्चा मनुष्य तर नसेल ? (तो विचारांत असतांना हळूच न कळतां दूर जाऊन पुनः पळत पळत येऊन भद्रेश्वरापुढें पडतो.) अरे बाप ! हें कोण आणखी ? [पाहून] हा तर हिरा ! अरेच्या झालें तरी काय याला ? (वारा घालून) हिरा अरे हिरा.

हिराः–दीक्षित भूत ! भूत पाठीं लागलें, आलें बघा हो !

भद्रेश्वरः–ऊंः ! काय खुळा आहेस ! बैस उठून भुताचा बाप आला तरी त्याला मी गाडून टाकीन !

हिराः–(कुचमून उठत स्वगत) म्हणूनच बसली होती पांचावर धारण ! [उघड] दीक्षित केवढें उंच म्हणतां ? त्या त्या नारळीच्या झाडापेक्षां उंच ? मी घराकडे निघालों तर हात पसरून वाट आडवून उभें राहिलें. मग पळालों वाटेल तिकडे तर लागलें पाठीं ! इकडे तुम्हाला बघितलें आणि ठोकली धूम तों इथें येऊन पडलों ! आतां तुम्ही सोबतीला येत असला तर आपण घरीं जाणार बोवा !

भद्रेश्वरः–(हांसून) चल चल वेड्या ! अशीं कुठें संध्याकाळींच येतात कां भुतें ? [दोघे चालूं लागतात.]

हिराः–काय हो दीक्षित, रात्रीं दरोडा घालणाऱ्या लोकांपुढें भूत असें उभें राहिलें तर–(घाबरल्यासारखें दाखवून मागें सरकतो) तें बघा !

भद्रेश्वरः–[त्याच्याजवळ येऊन] अरे वेडा तर नाहींस ? दरोडेखोरांना त्याची भीति. तूं आम्ही काय दरोडेखोर ?

हिराः– नाहीं आपलें विचारलें ! समजा, त्या बंडुकरावाच्या संगतीनें आलाच प्रसंग दरोडा घालायचा तर ?

भद्रेश्वरः–तर काय ? आपण होऊंच नये कबूल तसल्या कामाला ?

हिराः—कां, दरोडा घालणें वाईट तर एकूण ?

भद्रेश्वरः—(स्वगत) हा इतका खोदखोदून कां बरें विचारितो ! माझा बेत तर याला कळला नसेल ?

हिराः—कां दीक्षित ? बोलत कां नाहीं ? तुह्मांलाही तें नाहींना दिसत समोर ?

भद्रेश्वरः—समोर कशाचें काय घेऊन बसलास ? [स्वगत] मनांतच उठलेंय मोठें भूत !

हिराः—चला दीक्षित चलतांना ?

भद्रेश्वरः—चल तर ! (जाऊं लागतात.)

हिराः—खरेंच दीक्षित तो वंचुकराव दरोडेखोर आहे हो !

भद्रेश्वरः—अरे दुसऱ्यावर दरोडा घालतो त्याच्यावर देवाचाच दरोडा पडतो. 'करावें तसें भरावें' असा न्यायच आहे देवाच्या घरचा !

हिराः—मग दरोडा घालणाऱ्याला कशाचें सुख !

भद्रेश्वरः—अरे नाहीं तरी त्याला कशाचें सुख असणार ? त्याचें मन त्याला खातच असतेंना ?

हिराः—ही गोष्ट मात्र अगदीं अनुभवाची बोलला तुह्मी ! दरोडेखोरांचा व्यवहार जितका गुप्त तितकाच भित्रेपणाचा असतो ! नाहीं बरें ?

भद्रेश्वरः—[स्वगत] याला कांहींतरी सुगावा लागला खास !

हिराः—परवां त्या मारुतीच्या देवळांत......

भद्रेश्वरः—[दचकून] आं-

हिराः—कांहीं नाहीं ! आठवण झाली आपली सहज !

भद्रेश्वरः—हिरा......[अडखळतो]

हिराः—दीक्षित.

भद्रेश्वरः-(श्वास सोडून) समजून उमजून सापाला जिवंत कोण सोडणार ?

हिराः-कोणीच सोडणार नाहीं !

भद्रेश्वरः-[हंसून] तें मारुतीच्या देवळाचें काय ह्मणालास ?

हिराः-तिथेंच एक मोठा साप बसलेला मी बघितला ! मग त्याला समजून उमजून कोण सोडणार ? पण आपल्या शत्रूलाच चावत असला तर सापाला कोण बुझवील ! असा विचार करून मीं त्याला सोडला.

भद्रेश्वरः-तर मग तो शत्रूलाच चावणार होता ह्मणेनास ?

हिराः-होता कां ? चावणार आहेच ह्मणतों.

भद्रेश्वरः-मग साप तो तुझा स्नेहीच !

हिरा०ः-हो हो जीवश्च कंठश्च ! पण माझ्यावर उलटला नाहीं तर !

भद्रेश्वरः-(हांसून स्वगत) साप उलटायचाच !

हिराः-आणि जर उलटला तर मुंडकें ठेंचलेंच समजा !

भद्रेश्वरः-बरें या गप्पाशीं आपल्याला काय करायचें ! वेळ फार झाला. जाऊंच आतां ! (दोघे जातात.)

प्रवेश ४ था.

(दामिनी आपल्या महालांत फिरत असते.)

दामिनीः-(रागाच्या आवेशांत) आपल्या दुष्ट कर्माचीं फळें सुकाळ्यानें भोगायचीं सोडून, मेला दुसऱ्यांला दोष द्यायचा ही कुठली अरेरावी ! आणि ती सोसायला असें कोण बसलेंय ताटा खालचें मांजर होऊन? आमच्या सुखादुःखाचा विचार करायचा नाहीं यांनीं नी आह्मीच आमचा विचार करूं लागलों तर ह्मणे या वाईट

चालीच्या! ते कांहीं नाहीं! आतां मला माझी वाट मोकळी केलीच पाहिजे! एकेक दिवस फुकट दवडूं लागलें तर पुनः कांहीं ही वेळ येणार नाहीं! यावेळीं रात्रही मला अनुकूलच आहे! आकाश ढगांनीं भरून जाऊन एक सुद्धां चांदणी चमकलेली दिसत नाहीं. चहूंकडे कसें अगदीं शुक्र झालें आहे! या एवढ्या मोठ्या वाड्यांत मी एकटीच समंधासारखी वावरते! (दचकून) काय ढग निवळूं लागले ? आतां उशीर नाहीं कामाचा ! [पलंगाजवळ-जाऊन] अहाहा ! काय गाढ निद्रा लागली आहे याला ! इचा भंग न होतां हीच घोर झाली ह्मणजे माझें काम झालें ! (जहराची कुपी काढून) हें जहर आपलें काम एका क्षणांत करील. (जवळ जाऊन थबकून) ऊंः ! या वेळीं पापापुण्याचा विचार करून जन्माच्या सुखांत माती पडेल ! थेरड्या ! हो तयार ! (हांसून) तुला कशाला सूचना ? तूं आहेसच तयार ! [दांत ओठ खात नाक दाबून धरते, तो तडफडतो. तोंड उघडल्याबरोबर विष ओतून सोडते.]

सुदामः–आ. आ. हाऽऽय ! अग चांडाळणी हें काय केलेंस ?

दामिनीः–[हांसून] ह्मातारपणीं शांत झोंप लागावी, वरचेवर जागें व्हायचा त्रास पडूं नये अशी युक्ति केली !

सुदामः– राऽऽम ! हा हा ! घशांतून जळत उतरलें ! विष–प्रयोग! तू खास मला विषप्रयोग केलास! अग राक्षसिणी! तर मग तूं खरीच राक्षसीण! मला आजपर्यंत खोटें प्रेम दाखवलेंस आणि शेवटीं असा घात केलास !

दामिनीः–आतां अगदीं शेवटची वेळ आली ! एक क्षणांत आपली या लोकची यात्रा आटोपणार ! तरी दुसऱ्याची निंदा चाललीच

आहे तोंडानें ? एक क्षणभर देवाची स्तुति करा! प्रार्थना करा! कांहीं मागून तरी घ्या!

सुदाम:-होय! घ्यायचें आहे मागून! मला पुनः अशा बायकोची संगति देऊं नको ह्मणून!

दामिनी:-मग तें दोघांच्याही हिताचेंच!

सुदाम:-आई! पसरलें! सगळ्या अगांत पसरलें! अरेय ओय! अग दुष्टे! तुझ्या वाईट कर्माच्या आड येईन ह्मणून-

दामिनी:-होय! ह्मणूनच मी हें काम केलें! लक्ष्मीच्या जोरावर माझ्या सुखाची कळी तोडली तेव्हां विचार कुठें गेला होता? वांकडा रस्ता धरणाराला अशीच गति मिळायची!

सुदाम:-(तडफडूं लागतो) पाणी, पाणी.

दामिनी:-(हांसून) हें घ्यावें. (विषाची बाटली ठेवते.)

सुदाम:-[घेऊन] आः! विष! विष! मरतों! आतां तूं शांत झालीस! तुला अडथळा उरला नाहीं! खुशाल गोंधळ घाल—आ. आ. आलों आलों राSSSम [मरतो.]

दामिनी:-झाली बडबड शांत! मेला त्या जिभेला कसा तो खळ नव्हता! (पहात राहते एकदम दचकून) आं! आतांच मेला होता ना? भूत तर नाहींना झाला? होय (घाबरून) आं आं! डोळे फाडून बघतोय माझ्याकडे! जा जा मेल्या! पुढें नको येऊं! आः! आ! धांवा धांवा! (मूर्च्छित पडते.) [चौघे चोर येऊन तिला बांधतात व दिवा लावून सर्व दागिने रोकड वगैरे लुटण्याची गडबड करूं लागतात.]

दामिनी:—(सावध होऊन) मला बांधलें कुणी? (पाहून) अरे मेल्यांनों चो- [एकचोर तोंडावर हात ठेवतो व सुरी दाखवतो.]

१ चोर:—घात घात! पळा पळा!

२ चोरः –काय झालें तरी काय ?

१ चोरः —अरे ते बघ मशाली घेऊन पोलीस आंत घुसले !

३ चोरः –ठीक. अहो ! राम राम ! [सांपडलेलें कांखेंत मारून खूण करितो. त्याबरोबर तिघे खिडकीवाटें उड्या टाकतात.]

पडद्यांत–बांधा बांधा गुलामांच्या मुसक्या. उड्या टाकून पळून जातात काय ?

चोरः —अरेरे ! मीही यांच्या तावडींत सांपडणारच ! खिडकी-तून उडी टाकण्याचा सराव नसल्यामुळें तसें धाडस होईना ! आणि करून तरी सांपडणारच ! (कांपत कांपत खिडकीजवळ जातो.)

दामिनीः —[ओरडून] धांवा हो धांवा. यांनीं माझ्या नवऱ्याचा खून केला आणि मला बांधून टाकली !

शिपाईः –आलों आलों. (हिरण्यगर्भासह ६ शिपाई प्रवेशतात.)

हिर०ः –(पाहून) सांपडला. पाहिजे तोच सांपडला ! शिपाई दादा बांधा या चोराला. वंचुकराव ! (तो उडी टाकूं पाहतो) हां हां थांबा ! एवढी मेहनत नको. आह्मीच नेतों आपल्याला आतां खालीं ! (वंचुकराव बसतो.) आतां कां वाईट तोंड करतां ? त्या बेरडांनीं नव्हतें तुह्मांला बजावलें ? बरोबर येऊं नका ह्मणून. तें ऐकलें नाहीं ! त्यांचा विश्वास धरला नाहीं त्याचा हा परिणाम ! [त्याला पकडतात] बिचाऱ्या सुदामाची काय व्यवस्था झाली ? (पलंगाजवळ जाऊन) हर हर ! शेवटीं इतकी खटपट करून व्हायचें तें झालेंच ! हरीची इच्छा ! [विचार करून] पण हा खून कांहीं बेरडांनीं केला नाहीं ! [बाटली घेऊन] विषप्रयोग ! नाईक साहेब हा खून कांहीं तरी चमत्कारिक प्रकारानें झाला असावा ! माझा तर्क तर फार लांबवर जातो.

नाईकः–आपुन आतां राचा हत पारा ठयून जाऊं. मग सकाळी त्येचा इचार हुईलच.

हिर०:– असंच आणि मला वाटतें या बाईलाही पहाऱ्यांतच ठेवावी!

नाईकः–हो ठ्येवलीच पायजे.

दामिनीः—मी हो काय केलें? नाईक–

हिर०:–आं! इतका मोठा––

नाईकः–हां. हां. चूप् बसा बाई तुमी. शिपाई--हिला त्या पल्याडल्या खोलींत घालून तित येक जन पहारा करा. या खोलींलाबी कुलूप घालून हॊर करून टाका. तिला कांहीं हकड तकड करून द्यू नगा. बाकीचे घरा भाईर राऊन पारा करा चला. सोडा त्या बाईला. [तिला सोडतात. ती गयावया करूं लागते. ते ढकलत नेतात.]

[पडदा पडतो]

अंक ४ था समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

(हिरण्यगर्भ, कोदंड व हिरालाल बोलत बसले आहेत.)

स्थळ—ओरी.

हिर०:– माझ्या बाजूची हकीकत मीं सांगितली. आतां तुझी सांग पाहूं.

हिरा०:–ठरल्या ठिकाणीं दीक्षित उभा होताच! मी पोलीस घेऊन त्याच्यापासून थोड्या अंतरावर छपून राहिलों. मग जेव्हां ते

बेरड लूट घेऊन पळत आले तेव्हां मोठा आवेश आणून दीक्षित त्यांना ' वांटणी द्या नाहीं तर पोलीसांत कळवतो ' ह्मणाला. त्यांच्या एकमेकांत खुणा झाल्या आणि एकानें एकदम कंबर धरून दीक्षिताला लोळवला! जर आह्मी एकदम पुढें होऊन या वेळीं सगळ्यांना बंदिवान् केलें नसतें तर दीक्षितांची कणीक चांगलीच मऊ झाली असती. बिचारा पशुपति मात्र अभिसारमंदिरांत निजला होता तो यांच्या लाथाबुक्यांना बळी पडला!

कोदंड :—[हांसत] वाः! सर्वच गोष्टी कशा एकदम जुळून आल्या! सर्वांना ज्यांच्या त्यांच्या अपराधाप्रमाणें शिक्षाही योग्य झाल्या! वंचुकराव काळया पाण्यावर गेला; दीक्षितांना सात वर्षे सक्तमजुरी लागली! बेरडांना शिक्षा झाल्या न झाल्या सारख्याच. खरी खुनी दामिनी मात्र यथेच्छ सुवर्णप्रयोग करून निर्दोष ठरली!

हिरण्य० :—हें एक बरेंच झालें. दामिनी मोकळी रहाण्यापासून आमच्या कामाला थोडीशी मदतच होणार आहे. तिनें आपला अनुभव लोकांपुढें मांडण्याचें मात्र कबूल केलें पाहिजे.

कोदंड :–अरे जिनें आपण केलेल्या खुनावर माती ओढली ती आपला अपमान जनाला सांगेल ह्मणतोस?

हिरण्य० :–आज नाहीं सांगणार. पण ' खुनाला वाचा फुटते ' हें आहेना तुझ्या ध्यानांत? तिला त्या घरांत आतां एक क्षणभरही राहवणार नाहीं! राहिलीच तर प्रत्येक वस्तूंत तिचा खूनच तिच्यासमोर उभा राहील! तिला पश्चात्ताप होईल! मग ती आपण होऊनच रडेल! ओरडेल! लोकांना हाक मारील आणि आपली कथा त्यांना सांगेल! तिला असें केल्यावांचून चैन पडणार नाहीं. ती हें प्रकरण जितकें जितकें गुप्त ठेऊं पाहील, तितक्या तितक्या अधिक वेदना तिला होतील!

हिरा:–आणखी, ज्या परमेश्वरानें इतक्या सगळ्या अनुकूल गोष्टी एकाच रात्रींत घडवून आणल्या, त्याचा दामिनीला मोकळें ठेवण्यांत असाच कांहीं तरी महत्वाचा हेतु नसेल कशावरून?

कोदंड:–असलाच पाहिजे! झाल्या गोष्टींत आतां आह्मी संशय घेणें ह्मणजे त्याच्या न्यायी दृष्टीला दोष देण्यासारखें आहे!

हिरण्य:–अपराध्यांच्या भिऱ्या आणि संशयी हृदयाचा अनुभव निरपराध्यांना काय असणार? पण कोदंडा, अशी एक वेळ येते कीं त्यावेळीं अपराध्यांचे अपराध भूतें होऊन त्याच्यापुढें नाचूं लागतात; आणि त्यांना भिऊन तो जें जें बरळत सुटतो त्यांत त्यांत त्यांचें हृदय सगळ्या जगाला व्यक्त दिसतें!

कोदंड:–योग्य बोललास. याचा थोडासा अनुभव श्रीमंतांच्य बाबतींत येऊं लागलाच आहे आपल्याला. त्यांचें हें आजारीपण आतां शेंवटचेंच ह्मणायचें. दिवसेदिवस त्यांची अशक्तता वाढती आहे. शारदेचे शुश्रूषेचे अविश्रांत श्रम पाहून ते निरंतर अश्रु गाळीत असतात! त्यांना त्यांच्या सर्व मागच्या कृत्यांची आठवणच होत असावी!

हिरा:–ते शारदेला ‘ मी अपराधी आहें अन्यायी आहें ’ असें वरचेवर ह्मणतात ह्मणे!

हिरण्य:– अझून वाचा अधिकाधिक स्पष्ट होईल! नुकताच आरंभ आहे.

कोदंड:–आतां तरी पशुपतीचे डोळे उघडतील?

हिरण्य०:–उघडतील! आणि नाहींच उघडले तर आणखी थोडीशी मेजवानी मिळेल!

कोदंड:–एवढ्यावरच भागलेलें बरें. नाहीं तर त्या बिचाऱ्या वल्लरीला फार त्रास होईल.

हिरण्य:–काढा प्रथम कडू लागला तरी अमृतासारखा परिणाम करितो. त्याचप्रमाणें आज जरी तिला त्रास झाला तरी पुढें पुष्कळ सुख होईल.

कोदं०:–त्रास त्रास तरी किती सोसावा? त्याला कांहीं तरी परि-मिति पाहिजेना?

हिरण्य:–परिमिति आहेच! आपल्याला पुढील सुखाचें प्रमाण जितकें अधिक पाहिजे असेल तितका अधिक त्रास आज सोसावा.

कोदंड:–आजच्या त्रासावरच जर भावी सुखाचें प्रमाण आहे ह्मणावें तर बिचाऱ्या शारदेला असें काय सुख मिळणार आहे ह्मणून तिला इतका जबर त्रास आज सोसावा लागावा?

हिरण्य०–कां बरें? तिला लाभणाऱ्या सुखापुढें ऐहिक सुखाची काय मातब्बरी? तिला लाभणारें अक्षय्य स्वर्गसुख कुणीकडे? आणि या लोकचीं हीं क्षणिक सुखें कुणीकडे? मरणोत्तर स्वर्गांत पाय ठेवल्या-बरोबर तिला ओंवाळण्याला स्वर्गांगनांच्या मांदीच्या मांदी धांवतील! तिच्या दर्शनानें देवेंद्रसुद्धां आपल्याला धन्य समजतील!

कोदंड:–तशीच आहे तिची योग्यता. ही कलियुगची सावित्री, अनुसूया, द्रौपदी किंवा तारा कोणीही ह्मणा. मी ह्मणतों त्यांच्या-पेक्षांही हिची योग्यता अधिक! सत्याच्या आणि सत्कर्माच्या युगामध्यें पतिव्रता निपजल्या ह्मणून कांहीं अधिक नाहीं झालें! पण जिकडे तिकडे असत्याचा सुळसुळाट, अधर्माचें साम्राज्य, दुष्क-र्मांचा अंधार माजून राहिला आहे, असल्या विषम कलियुगांत त्यांच्या तोडीची पतिव्रता निपजली तर तिची योग्यता किती समजावी?

हिरण्य० :—मनापासून एकावरच प्रीति करणाऱ्या बायका मिळणें कठीण झालें ! मनुष्यांत आणि पशूंत कांहींच अंतर उरलेलें नाहीं. अशा काळांतली पतिव्रता ह्मणजे एक अवर्णनीय आश्चर्यच !

कोदंड:—देव तिची बुद्धि अशीच अचल ठेवो !

हिरण्य० :—तिच्या आजपर्यंतच्या पुण्याचें फल ह्मणून देवाला तसेंच करणें भाग आहे !

कोदंड:—या सगळ्या प्रकरणांत हिरालालनें फार प्रयास करून, मोठें अघटित योग घडवून आणले !

हिरण्य० :—त्याला त्याच्या योग्य बक्षीस मिळेलच मिळेल !

हिरा:—आपल्या तोंडच्या गोड शब्दापेक्षां अधिक बक्षीस तें आणखी काय असणार ?

कोदंड:—चला. त्या जगन्नियंत्याची अद्भुत लीला आणखी काय काय घडवून आणते, तें क्रमाक्रमानें दृष्टी पडेलच !

हिरण्य० :—आतां इतकें तरी खास कळून चुकलें कीं ती आपल्याला अनुकूल अशाच गोष्टी घडवून आणणार ?

कोदंड:—आणि भगवान् सत्पक्षाला केव्हांही अनुकूलच असायचा ! असो. चला आपल्या सायमुपासनेची वेळ झाली.

हिरण्य० :—आणि या आपल्या उपासनांच्या वेळा टाळणें ह्मणजे त्याचा महान् अपराध करणें आहे. हिरालाल तूंही शुद्धांत:करणानें परमेश्वराचें स्मरण कर.

हिरा:—आपल्या पाठोपाठ आहेंच मी. [दोघे जातात. स्वगत] सत्य आणि धर्म यांचे हे दोघे अवतारच आहेत ! अहाहा ! कोणत्या जन्मीं मी मोठा पुण्याचा सांठा करून ठेवला होता ह्मणून यांची ही संगति मला लाभली ! यांचें बोलणें आणि वागणें अगदीं बरोबर ! ' बोले तैसा चाले ' ही तुकारामाची वाणी यांनीं अगदीं

सार्थ केली ! मग मला ' त्यांचीं वंदावीं पाउलें ' ही सार्थ नको कां करायला ? सत्पुरुषांनो तुह्मांला शतशः प्रणाम असोत ! [नमस्कार घालतो. उठून हात जोडून] सर्वसाक्षी देवा ! तुला जर मला पुनः जन्माला घालायचें असेल तर शेंकडों वेळ घाल. पण अशा संतांच्या संगतींत सर्व आयुष्य जावें अशा ठिकाणींच घाल ! ही तुला हात जोडून प्रार्थना आहे. (पाहून) अरे बरेच लांब गेले, चला पळत जाऊनच आपण त्यांना गाठूं. एक क्षणभरही त्यांच्यापासून दूर रहाणें आहिताचें आहे. [पळत जातो.]

प्रवेश २ रा.

स्थळ—पशुपतीचे वाड्यांतील दिवाणखाना.

(पशुपति एकटाच इकडे तिकडे फिरत आहे.)

पशुपतिः—मीं ईश्वराचा एवढा मोठा अपराध केला कीं त्याच्या मानानें झाली ही शिक्षा कांहींच नव्हे ! मीं त्या ठिकाणीं असें काय पाहिलें ? मला इतकी भूल कशानें पडली ? तिचें तारुण्य, सौंदर्य, स्वभाव यांपैकीं कोणत्या गोष्टीचा अलौकिकपणा पाहून मी उल्लू झालों ? (विचारानें) नाहीं. यापैकीं एकही कारण नाहीं. झालें. मग मी बळेंच पाच टाकून कांच जोडण्याचा प्रयत्न कां केला ? एकच उत्तर आणि तें ' बुद्धिभ्रंश झाला ' एवढेंच होय. बुद्धिभ्रंश नव्हे तर काय ? तारुण्यानें, सौंदर्यानें, स्वभावानें, नम्रपणानें, प्रत्येक गुणानें तिच्याहून चढ अशी आणि निष्कलंक प्रेम करणारी पत्नी सोडून, त्या वृद्ध ह्मणून पतीला फसवून व्यभिचार करूं पाहणाऱ्या कुलटेची पायधरणी करायची हें कशाचें लक्षण ? असल्या सुलक्षणी पत्नीवर शिव्यांची वृष्टि करावी आणि त्या दुर्लक्षणी परकांतेवर प्रेम-

दृष्टि ठेवावी हें बुद्धिभ्रंशावांचून कसें घडणार? महिपतीसारख्या पिढीजाद ह्यातान्या चाकराचें उपदेशवाक्य कडू मानावें, साध्वीनें डोळ्यांत घातलेलें अंजन प्राणहारक जहर समजावें आणि त्यांना शत्रू-प्रमाणें लेखून घरच वर्ज्य करावें हा बुद्धिभ्रंशाचाच परिणाम दुसरें काय! दुराचारी मनुष्य संशयी बनतो आणि सगळ्या जगाला दु।-चरणी समजतो तसेंच मीं माझ्या सुशील पत्नीवर दुराचरण वा आरोप करून तिला छळलें! तिनें मीं दुर्मार्गापासून परतावें ह्मणून जे जे प्रयत्न केले ते ते मला 'तिचें दुराचरण लपविण्याचेच' भासले! म अपराधी तर खराच. पण केवढा मोठा! घोर–घोर—घोर अपराधी आतां मला क्षमा कोण करणार? माझा कलंक कसा धुऊन निघणार! मी पुनः शुद्ध कसा होणार? नाहीं. मला क्षमा नाहीं. शुद्धीकरितां प्राय श्चित्त नाहीं. कांहींच नाहीं. मी असेंच तळमळत, तळमळत, शोक करित दोषाचें खापर घेऊनच मरावें! हाय हाय! देवा, (डोळ्यांत अश्रू येऊन) तूं दयाळू आहेस पण मजसारख्या दुष्टावर कशी दया करशील? पश्चात्तापानें मनुष्य शुद्ध होतें ह्मणतात पण–हाय..... (खालीं डोकें टेकून बसतो.)

पार्वती:—(प्रवेशून) पश्चात्तापानें निर्मळ झाल्यामुळें इकडचें मन कसें ईश्वराच्या भजनांत तल्लीन झालें आहे! अहाहा!

पशुपति०:—(उठून बसून) साध्वी मी तुझे अत्यंत अपराध केले, पण मला त्यांबद्दल आतां वाईट वाटतें, तूं मला क्षमा करशील काय?

पार्वती:–हें काय बाई उलटें बोलणें! मी कां इकडे क्षमा करायची?

पशुपति:–तें मला होतेंच ठाऊक! तूं नाहींच क्षमा करणार? असल्या अपराधांची क्षमा कोण करील?

पार्वती :–असे माझे आपण अपराध तरी काय केले? मनुष्य चुकतेंच! मी नाहीं कां कधीं चुकणार? मग त्यांत क्षमा कसली आली?

पशुपति :–तूं कधीं कधीं सुद्धां चुकणार नाहींस, ज्यांनीं एक मार्ग बळकट धरला ते कसे चुकतात? मी मात्र कानांत वारें शिरलेल्या नव्या पाड्याप्रमाणें सैरावैरा भटकूं लागलों ह्मणून चुकलों! [श्वास सोडतो.]

पार्वती :–पण त्याबद्दल आतां एवढा त्रास कां करून घ्यायचा? देवाच्या दयेनें ते तसले दिवस जाऊन हा भाग्याचा दिवस उजेडला! आतां आणखी दुःखी होऊन बसणें बरें कां?

पशुपति :–तूं क्षमा करित नाहींस मग माझें मन तरी कसें उल्हासी होईल? ह्मण ह्मण एकदां मनापासून क्षमा केली ह्मण ह्मणजे मी धन्य झालों.

पार्वती :–केली; सर्व गोष्टींची क्षमा केली. झालें आतां तरी! आतां मी सुद्धां देवाजवळ आपल्याला क्षमा करण्याबद्दल दररोज गाऱ्हाणें घालीन.

पशुपति :–आणि तो तुझें खास ऐकेल! कारण त्याला तुझ्यासारखे निष्कलंक भक्त आमच्यासारख्यापेक्षां अधिक आवडतात.

पार्वती :–[लाजून] कांहीं तरी बोलायचें.

पशुपति :–खरोखरच! तूं जितकी पवित्र तितका मी अपवित्र! तूं जितकी सरळ तितका मी कपटी, तूं जितकी साधी तेवढा मी आंतल्या गांठीचा, तुझ्याजवळ देवाला आवडणारे जेवढे गुण आहेत तेवढेच त्याला न आवडणारे मजजवळ आहेत, आतां सांग पाहूं तुझ्यामाझ्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे कां नाहीं तें?

पार्वती :–नाहीं. मुळींच अंतर नाहीं. देवानें तर आपली जन्माची निरंतर गांठ घालून दिली. (लाजून मान खालीं घालते.)

पशुपति :–अहाहा ! हें पवित्रतेचें गोड स्मित ! अमृतापेक्षां मधुर !

पार्वती :–(रागाच्या आविर्भावानें) थट्टा थट्टा ती मेली किती करायची ? असेंच बोलायचें असलें तर मी आपली जातें कशी. [पाठ फिरविते.]

पशुपतिः–हे स्वर्गदेवते विन्मुख होऊं नको, सन्मुख हो. आजपर्यंत तुला विन्मुख ठेवली ह्मणूनच मला त्रास सोसावा लागला. (तिला फिरवूं पाहतो.)

महिपतीः–[हांसत प्रवेशून] ह्ये काय धनीसाब ? कोरडा घ्यून मार द्याचा सोडून ह्ये काय करतासा ? ह्या बाईसाब हायती त्या... ह्या... न्हवत ! ह्यः ह्यः ह्यः ! (हांसतो)

पशुपतिः–घे बोलून. आतां तुझी वेळ आली खरी !

महिपतीः–छेः छेः ! असें नगा ह्मनू मायबाप ? मी आपल्या अन्नाचा चाकुर हाय ? मी आपली बेअबदी कसा करनू ! वाईच चेष्टेन बोललो. माप करा धनीसाब !

पशुपतिः–मीच तुझ्याजवळ माफी मागायला पाहिजे तूं हिताची गोष्ट सांगत असतांना ऐकलें नाहीं ह्मणून. खरेंच तूं मला वडिलांच्या ठिकाणीं आहेस. मग माफी करशील ना?

महिपतिः–ह्ये काय वंगाळवाणी बोलतासा ! म्याच तवा आपला हात धरून बेआबदी केलीया. मलाच माफी करा. पाया पडतों धनीसाब. [पाया पडतो]

पशुपतिः–ऊठ ऊठ ! महिपत ! तूं माझा चाकर नव्हेस इमानी दोस्त आहेस ! मी त्या दुष्ट बग्याच्या सांगीवरून भलताच संशय

घेऊन तुला नी हिला छळलें हा देवाच्या घरीं मोठाच अन्याय केला !

महिपती:—म्हाराज त्यो अन्येव त्येचाच त्या मरतुगड्या बग्याचाच देवानँच त्येची रग जिरीवली !

पशुपति:—काय झालें ?

महिपती:—परवा येका चोरीमंदी सापडून खाल्ल पोलीसच्या हातूच दनूक नी काय ?

पशुपति:—देवाच्या घरचा न्याय असाच कडक आहे बाबा. [श्वास टाकतो.]

महिपती:—आमचं धनीसाब मंजी अक्शी भोळ सांब ! त्येंच्या हातून वंगाळ गोष्टी कंदीबी हुयाच्या न्हाईत. पर संगत वाईट लागल्यावर त्ये तरी काय करनार ? असु. झाल्या गोष्टी बेस झाल्या. देवानँच ह्यो दिस दावला म्हनायचा ! बाईसाबांची पूजा मातुर फळाला आली.

पशुपति:—तीरे कसली ?

पार्वती:—(डोळे वटारून पहात) कांहीं तरीच बोलतो हा ?

महिपती:—त्ये काव बाईसाब तुमी म्हाई केली सोमार करून संगमनाताची पूजा !

पशुपति:—तोच तोच हा पुण्यप्रभाव ! (पार्वतीस) आतां सगळें मनासारखें होऊन तूं कां बरें अशी दुर्मुखलेली ?

पार्वती:—[हांसून] मला काय झालें दुर्मुखायला ? पण माझा एक नवस पाहिजे बरें फेडायला !

पशुपति:—एक कां हजारों नवस सांग ! फेडायला एका पायावर तयार आहे.

पार्वतीः–हजारों कांहीं नाहींत, माझा आपला एकच आहे. संगमनाथाला अभिषेक करवायचा.

पशुपतिः–ऊंः ! एवढेंचना ? चल आपण एक लघुरुद्रच करवूं उद्यांच्या उद्यां. मग तर झालें ना ? आणखी काय ? असलें तर सांग !

पार्वतीः–(लाजून) कांहीं नाहीं आणखी.

पशुपतिः–चल मला भूक लागली. आधीं कांहीं फराळ करूं. महिपत चल आमच्या बरोबर तूंही केला पाहिजेस आज फराळ !

महिपतीः–मला कशाला होवा येवडा मान. हुकुम झाला र झाला कीं पायावर डोकें ठ्येवलच ! आज ह्यो आनंद बगाय त्यो बामन बी पायजे व्हता.

पशुपतिः–कोणरे तो ?

महिपतीः–आपुन इकडन कुनाला घालीवल म्हून रागाला आलातासा त्ये दिशीच आल्याला बामन. लई चकोट हाय पगा. काय त्येच नांव लई मोट हाय पगा. तोंडाला अक्शी येतच न्हाई. काय व्ह ते बाईसाब ?

पार्वतीः–[हांसत] हिरण्यगर्भ.

महिपतीः–हां हां ! हराणगाब ! हराणगाब ! त्येच काय अवगाड तरी ? (हांसतो)

पशुपतिः–हिरण्यगर्भाचें काय म्हणतो हा ?

पार्वतीः–तो त्या कोदंड महाराजांचा मित्र ! त्यानेंच आपल्याबद्दल वारंवार बातमी सांगून आम्हाला सावध केलें. आणि घरांतल्या कांहीं जिनसांचें रक्षण झालें असलें तर तें त्यांच्याच उपदेशानें !

पशुपति :–तर मग मला त्यांचें दर्शन घेतलेंच पाहिजे. जा महिपती त्यांना आताच्या आतां घेऊन ये.

पार्वती :–असेंच. तंवर मी फराळाची तयारी करून ठेवत्यें. [जातात.]

प्रवेश ३ रा.

स्थळ :—श्रीमंतांचा महाल

(श्रीमंत आजारी निजले आहेत शारदा पायाशीं बसली आहे.)

श्रीमंत :–आः! आः! आई. माझीं कर्में मी भोगतों. तूं कां कष्ट करतेस ? दिवसेंदिवस तूं क्षीण होत चाललीस. आः! आई. अशी आपल्या प्रकृतीची अवहेलना करूं नको.

शारदा :–आतां अमळ शांत पडायचें. बोलून त्रास नाहीं कां होत जिवाला ?

श्रीमंत :–तुझे कष्ट बघून...ओय–त्यापेक्षां अधिक होतो. ओय! ओय! मला पथ्याला केलेलें कांजीसारखे हलके जिन्नस खाऊनच तं रहातेस! आहा! ओ ओ! माझी जुनीं धोतरेंच मात्र वापरतेस; अशी शरीराची अनास्था कां करतेस ?

शारदा:–इकडच्यापेक्षां माझ्या शरीराचें महत्त्व कां अधिक ? सौभाग्याशिवाय अलंकारांची काय शोभा. आपल्या मागें वांचून मला काय करायचें ?

श्रीमंतः–आ–आ–ऽऽऽः! शारदे तुझें मन पवित्र! अंः! मी तुझ्या प्रेमाला, तुझ्या मानाला, तुझ्या योग्यतेला लायख नाहीं. मी तुला फसवलें!

शारदा:–प्रारब्धाधीन गोष्टींबद्दल शोक कां करायचा!

श्रीमंतः–प्रारब्ध! अंह:! कशाचें प्रारब्ध? आपलें गोत्र लपवून गोत्रजेशीं लग्न करायला—आईग–प्रारब्ध शिकवतें काय? आपण वयानें जिचे आजोबा शोभूं तिच्याशीं समजून उमजून विवाह करणें हेंही प्रारब्धाचेंच काम काय?

शारदा:–होणार तें चुकत नाहीं! झालें तें होऊन गेलें. आतां त्याबद्दल विचारच करूं नये हें बरें!

श्रीमंतः–आतां तो विचार कसा बाजूला राहणार? माझ्या डोळ्यासमोर तीं माझीं कृत्यें नाचताहेत! अगआई! पैशाच्या निव्वळ पैशाच्या जोरावर मीं तुझ्या सुखाची राखरांगोळी केली! देवा! तुझ्या जन्माची माती केली! तुला कायमची दुःखी बनवली! पण हा हा! देवा! तूं तें सर्व गिळून माझ्यावर अकृत्रिम प्रेम केलेंस! माझ्याशीं खऱ्या पतिव्रतेप्रमाणें वागलीस! काय तुझें धैर्य! देवा आईग!

शारदा:–हें पाहिलें कां? पुनः घाम आला! छाती उडूं लागली! असा त्रास करून घेतला तर लवकर आराम कसा पडावा?

श्रीमंतः–आतां कसला आराम? हें दुखणें अखेरचेंच! वाईट नको वाटून घेऊं. खरोखरच मी या दुखण्यांत मरणार!

शारदा:–असें अभद्र बोलूं नये! (डोळे पुसते.)

श्रीमंतः–नाहीं बोललें म्हणून तें चुकणार थोडेंच! आणि आतां मीं जगण्याची आशा तरी काय म्हणून धरावी? माझ्या मरणानें आतां आणखी कोणाचें नुकसान होणार? येऊन जाऊन तुझेंच! तुझें जिवंतपणीं मी जें नुकसान केलें त्याच्या शतांशही मी मेल्यानें होणार नाहीं. (शारदा रडते) नको रडूं! आईग! तुझा जन्म-होय सगळा जन्म असाच हालांत गेला; पण तूं धैर्याची. डगमगली नाहींस; शीलाला सोडलें नाहींस; सत्त्वाला जागलीस! तुला आम्ही भेटलों तेवढे दावेदारच! आईग.

शारदा:-मी पदर पसरतें आतां अगदीं बोलूं नये. माझ्या काळजाचें कसें पाणी पाणी होत चाललें ?

श्रीमंत:-पण मला दुष्कृत्यांच्या भारानं भारवलेलें हृदय मोकळें होऊन हलकें वाटूं लागलें. मी आणखी थोडेसें बोललों, आमचीं दुष्कृत्यें ओकलों तर मला लौकरच आराम पडेल. हा पहा मी आतांच उठून बसतों. (बसतो) पहा मला कशी शक्ति आली.

शारदा:-पण वैद्यबोवांनीं उठूं नये ह्मणून ना सांगितलंय ?

श्रीमंत:-आतां वैद्यांचें कांहीं कारण नाहीं. त्यांच्या त्रिभुवनकीर्ति मात्रांनाहीं माझा रोग असाध्य आहे. माझा रोग शारीरिक नाहीं. शरीर वयमानानेंच क्षीण झालेंय. मानसिक रोगावर त्याची मात्रा काय लागू पडणार हा हा! आई! देवा! राम!

शारदा :-ह्या उठण्याच्या श्रमानें धापा सुरूं झाल्या!

श्रीमंत :-होऊं देत! वठलेल्या वृक्षाला जपून काय ? केव्हां तरी जळणच! (थांबून) तुझा बाप! बाप कसला काळा साप! त्यानें पैशाकरितां तुझ्या सुखावर गरळ टाकली. आपल्याच पिलाला खाणारे बोके माणसांत सुद्धां आहेत.

शारदा :-त्यांना कां नांवें ठेवावीं! त्यांनीं काय वाईट केलं माझें ? चांगलें सुखाचें घर बघून मला दिली.

श्रीमंत :-वरून डौलदार दिसणारें किडक्या खांबांचें घर पाहिलें खरें त्यानें ? पण त्याचा तरी एकट्याचाच काय दोष ? तो, भद्रेश्वर, मी सर्व सारखेच कसाब! या पातकांस तिघे सारखेच वांटेकरी आहों!

शारदा :-पुरे नाहीं कां झालें आतां बोलणें ? माझें कुणी वाईट नाहीं केलें. मी कांहीं दोष देणार नाहीं कुणाला ?

श्रीमंत :-हा तुझा उदारपणा! आई आई ग! [ग्लानि येऊन पडतो.]

शारदा:—(पाणी शिंपून वारा घालून) काय हा पश्चात्तापाचा झटका! नको ह्मटलें तरी न ऐकतां उठून बसायचें! त्या श्रमानें आणि बोलण्यानें काय आयास थोडे होतात? त्यानें ही अशी ग्लानि येते! देवा, माझ्या सेवेला यश देऊन माझे सौभाग्य कायम राख! मी तुझ्याजवळ दुसरें काय मागणार?

श्रीमंत:—हु:श! रामा! (सावध होतो)

शारदा:—आतां थोडीशी खीर आणूं कां? खाण्यानें जरा हुशारी वाटेल!

श्रीमंत:—आण, तुझ्या निष्पाप हातांतले जितके पदार्थ माझ्या पोटांत जातील, तितके चांगलेच! (शारदा जाते) ऊं:! सौख्य ह्मणून जगांत कांहीं आहे असें वाटायला बाळपणच हिला आठवावें लागणार! उपवर झाल्यापासून बिचारीला एक तरी सुखाचा दिवस दिसायचा होता! [सुस्कारा टाकतो शारदा पाणी व खीर घेऊन येते.]

शारदा:—टाकायची चूळ भरून! (पाणी देऊन तस्त पुढें करिते.)

श्रीमंत:—(चूळ भरून तस्त ठेवून शारदेचा हात धरून) शारदे—लाजूं नको—घाबरूं नको. इकडे पहा. मी तुला विचारितों—मी मेलों तर तूं काय करिशील?

शारदा:—(डोळयांत पाणी आणून) असा धीर तो कां सोडावा?

श्रीमंत:—(बळेंच हांसून) धीर! आतां धीर कशाचा धरायचा? वयोमानानें आमचा काळ येऊन ठेकलाच आहे जवळ! मरायची इच्छा कोण करतो ह्मणा! पण समज मी मेलोंच तर—

शारदा:—तर मी आपल्या बरोबर सती जाईन!

श्रीमंत:—(प्रेमानें) मग या अवाढव्य संपत्तीला मालक कोण?

शारदा:–या नाशवंत संपत्तीकरतां मी कायमचें सौभाग्य कां गमावीन? आपला पुतण्या भैरवनाथ तो तिचा खरा मालकच आहे.

श्रीमंत:–[दचकून] ओय? त्याला कवडीसुद्धां देऊं नये ह्मणून मी हा लग्नाचा खटाटोप केला, आई! आणि आतां त्यालाच ही संपत्ति द्यायची?

शारदा:–आपला आणि भावाचा यांत अंतर तें कशाचें?

श्रीमंत:–[कपाळावर हात मारून] देवा! हेच शब्द माझ्या मनांत आधींच कोणी तरी बिंबवले असते, तर मी हा अविचार करून या सुकुमारीच्या जन्माचा विध्वंस करण्याचें पातक कशाला जोडलें असतें! आईग! त्या ज्योतिष्याच्या ह्मणण्यावरून, भार्यायोग आणि पुत्रयोग साधण्याच्या भरीस कशाला पडलों असतों? कशाचा भार्यायोग नी कशाचा पुत्रयोग! हा माझाच कर्मभोग ओढवला झालें! ज्योतिषी–ढोंगी–चोर मला आवडतील अशा गोड थापा मारून पैसे उपटायला आलेला चोरच! (सुस्कारा सोडतो.)

शारदा:–खीर निऊन जाते.

श्रीमंत:–मला कांहीं नको आतां! (थांबून) पण तूंही मग नाहीं खायची? आण आण थोडी! [खात] आणि हें बघ तूं आपला देह विनाकारण जाळूं नको. या माझ्या संपत्तीवर चार दिवस सौख्य भोग!

शारदा:–(वाईट वाटून) पण राहीनाच कां तो विषय! आणखी देऊं कां थोडीशी खीर?

श्रीमंत:–छेः! पुरे! माझें पोट भरलें. आतां तूं थोडी खा. बैस इथेंच आणि माझ्या समक्ष खा.

शारदा:–मी खातें आंत बसून अंमळ डोळा लागल्यावर; निजायचें!

श्रीमंतः-(निजून) अहाहा ! सहस्रावधि अपराध पोटांत घालून पुनः प्रेमानें सवा करतेस ! देव तुझें कल्याण करो ! जा तूं खा जा. मला आतां लागेलच झोंप जा. (तिला थांबत असतांना बळेंच जाववतो. ती गेल्यावर स्वगत) केवढें निर्मळ अंतःकरण ! खरी पतिव्रता ! तिचे गुण गाण्याचीसुद्धां पात्रता माझ्या अंगीं नाहीं ! [थांबून] लग्नाच्या आधीं कोणी सज्जनानें माझ्या डोळ्यांत अंजन घालण्याचा प्रयत्न केला. पण आह्मी कसले छट ! त्याच्या त्या फटक्याचे तुकडे तुकडे करून टाकले ! आणि खरोखरच पिशाप्रमाणें ही कोंवळी कळी तोडून सुकवून टाकली ! हरहर ! [श्वास सोडून] त्या वेळेंच आमचे मंत्रिमंडळ तरी काय खासें ! अनुयायी ! सुवर्णशास्त्री, भद्रेश्वर दीक्षित ! शंकराची उपमा घेऊन मी वृद्धपणांतही बलवंत ह्मणवून घ्यावें तों यांनीं माझी री ओढलीच ! देवानें त्या वेळींही कोदंडाला पाठवून मला पुष्कळ उपदेश करवला पण व्यर्थ ! त्या महापुरुषाचा म्यां अपमान केला ! केवढीं घोर पातकें हीं ? देवा ! देवा ! आः ! [मूर्च्छित होतो.]

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

स्थळ-सुदामाचा वाडा.

[पहांटे दामिनी एकटीच वावरत आहे.]

दामिनी:-पैशाच्या साह्यानें आल्या संकटांतून कशी तरी सुटलें ! पण आतां जगांत तोंड दाखवायची लाज ! जे ते माझ्याकडे बोटें दाखवून हांसणारच ! घरांतच बसून रहावें ह्मटलें तर—[शहारे घेऊन] जिकडे तिकडे समंध ! अग आई ! आलेच आलेच हे ! नका हो नका हो माझा असा छळ करूं ! होय होय ! मी आपली

ग्यातकें कबूल करितें! (थांबून) इथें तर कोणीच नाहीं. नकोग बाई आतां या घरांत रहाणें! मेला घटकोघटकीं असा भास होऊन जीव घाबरा होऊन जातो! आतां कोणी सोबतीला येतील म्हटलें तर पहिल्यापैकीं कोणीसुद्धां तोंड दाखवीत नाहीं! आतां हें गांव सोडून दूर दूर कुठें तरी पळून जावें! पण जायचें कुठें? मला एकटीला कोणी अडवणार तर नाहीं? बरोबर काय घ्यावें? वाड्याची काय व्यवस्था करावी? एक कां दोन हजार अडचणी! आतां मी या पेंचांतून सुटते तरी कशी? एक गोष्ट—तेवढी एकच गोष्ट केली नसती तर मला आज हा पेंच कशाला पडला असता? काय निर्दय कृत्या मीं...त्याच्यापासून मला काय त्रास होता? मला अशी कोणती अडकाठी होती? कपटानें वागायचें वागून त्यांचा—खु...न (कांपत) आ...आपल्या पाSSSयां पडतें. मी–मी इथें राहाSSSत नाहीं. माSSझीSपाठ न–का पुरवूSSS! राSSम राSS-म! (कोंदट आवाजांत) माSSSझें नरडेंSSSसोSSडा! घां–वा–हो! अँः! (उचकी देत पडते.)

हिरा:–[प्रवेशून] अरेरे! काय ही बिचारीची दीन स्थिति? या स्मशानाप्रमाणें अगदीं शून्य झालेल्या वाड्यांत समंधाप्रमाणें वात्रतां वावरतां थकून भागून निश्चेष्ट होऊन पडली! दामिनीबाई! अहो दामिनीबाई! आँ! मेली तर नाहींना! [जवळ जाऊन] अरे बाप! हा काय चमत्कारिक प्रकार! ही अगदीं प्रेतच होऊन पडली! [पळत जाऊन पाणी आणून तोंडावर मारतो.]

दामिनी:-(बरळत) सोडाSसोडाSहो नरडें! अगबाई [पहात हिरा०स) तुह्मी कोण? इथें कां आला? माझ्या या वाड्यांत आहांत तरी किती जण? मेल्यांनो एकदां मला तरी चला घेऊन!

हिरा:–बाई, मी हिरालाल! मला नाहीं कां ओळखलें तुह्मीं?

दामिनी :–आं आं ओळखलें! मला ठार मारायला ना आलास?

हिरा० :–बाई मला तुह्मी समजतां तरी कोण? मी काय भूत, पिशाच्च कां?

दामिनी:–समंध, होय ना?

हिरा० :–नव्हे नव्हे! मी खास खास मनुष्य आहें. हें पाहिलें कां माझ्या अंगांत हाड, मांस, रक्त सर्व कांहीं आहे? झालांत कां! [पुनः पाणी मारून] सावध झालांत कां पुरत्या?

दामिनी:–[सावध होऊन] गेली, मेली एकदाशी ही भयंकर रात्र!

हिरा० :–काय हो झालें? तुह्मी असें वेड्यासारखें कां धरळत होता?

दामिनी:–हिरा; तूं आलास काय? कशाला आलास? बाबा, या पापिणीच्या दर्शनानें आतां तुझें हित तरी काय होणार?

हिरा० :–बाई, मी तुह्माला एक महत्वाची बातमी सांगायला आलों! आज एक तास झाला असेल नसेल शारदेचा सौभाग्यरवि मावळला?

दामिनी:–काय ह्मणतां?

हिरा० :–चांगलें झालें नाहीं बरें?

दामिनी:–असें कोण ह्मणेल? फार फारच वाईट झालें! शारदे-सारख्या खऱ्या खऱ्या धर्मानें वागणाऱ्या बायकोवर असा प्रसंग यावा असें कुण्णा कुण्णालाही नाहीं वाटायचें!

हिरा० :–तर मग तुह्मीही झाली गोष्ट वाईटच समजतां! ठीक! सांगायची गोष्ट ह्मणजे, शारदा सती निघाली आहे आणि लोकांचें थवेच्या थवे स्मशानावर जमले आहेत, आणखी सारखीं माणसें चाललींतच. रस्त्याला खळ ह्मणून नाहीं!

दामिनीः—ती सती जाणारच ! पण हा प्रसंग मला पापिणीला कसा पहायला मिळणार ? मी मंडळींत येऊं तरी कशी ?

हिरा० :—कां बरें ! तुह्मांला अडचण कसली ? मी तर ह्मणतों—तुह्मीं अवश्य तिथपर्यंत यावें आणि सतीच्या दर्शनानें आपल्या पापाचा भार हलका करावा ? (स्वगत) आणि लोकांपुढें दोन प्रकारचीं दोन चित्रें उभीं करावीं ?

दामिनीः—पुण्यमार्गात लोकांची लाज कशाला धरायची ? (आवेशानें) चला येतेंच मी तुमच्या बरोबर ! लोक मला नांवें ठेवतील; ठेवोत ! मला तुच्छ मानतील मानोत ! मी त्यांना सांगेन आईबापांच्या चुकीबद्दल मला कां दोष देतां ? चला—चला—नाहींतर गर्दी झाल्यावर मला त्या साध्वीचें दर्शन सुद्धां नाहीं व्हायचें !

हिरा० :—छेः ! त्याची नको काळजी तुह्माला ! मी तुह्माला अगदीं तिच्याजवळ नेऊन उभी करितों.

दामिनीः—मग तुमचे मोठेच उपकार ह्मणायचे. चला. [जातात.]

प्रवेश ५ वा.

स्थळ—स्मशान [सतीचा देखावा.]

(सतीचे वेशांत शारदा, कोदंड, हिरण्यगर्भ, हिरा, कांचनभट, पशुपति, भैरवनाथ, इंदिरा, वल्लरी, दामिनी व प्रेक्षक स्त्रीपुरुष)

शारदाः—[कोदंडाचे पायावर डोकें ठेवून उठून हात जोडून] देवाच्या दयेनें नी आपल्या उपदेशामृताच्या साह्यानें मी तर अखेर साधली. आतां मला बहिणीला निरोप द्या. माझ्याकरितां आपण फार कष्ट सोसले. माहेरीं, सासरीं, संकटांत फार तर काय स्मशा-

नांत सुद्धां आपण माझी पाठ राखिली. हा जन्मतर आतां संपलाच; आतां मी आपली उतराई कशी होऊं?

कोदंडः—[गहिंवरून] मीं उपकार कांहींच केले नाहींत, माझें मी कर्तव्यच बजावलें. आणि जर कांहीं कष्ट मला झाले असले तर त्याबद्दल मी भरपूर मोबदला मिळवला. तुझें निर्मळ चरित्र आणि पवित्र शेंवट पाहून मला तर तुझ्या पोटीं जन्म घ्यावा अशी इच्छा झाली आहे. मी देवाजवळ याबद्दल प्रार्थना करीनच, पण शारदे, तूं हीं माझ्याकरितां देवाजवळ माझें मातृत्व माग!

शारदाः—महाराज, आपली योग्यता कुणीकडे नी माझी कुणीकडे? मी आपली दासी.

कोदंडः—[थांबवून] हां—असें नको बोलूं! अवघा जन्म सद्वर्तनाच्या तपानें तपवून शेंवटीं पतीबरोबर सहगमन करणाऱ्या तुझी बरोबरी माझ्यासारख्या पामराला कधींच करवणार नाहीं. तूं माझी उपास्य देवता......माताच हो!

इंदिरा—(स्फुंदत) आज माझा सौख्याचा समुद्र आटला, माझी सद्गुणाची तारा कायमची मावळली; बये आह्मी तुझें नांवाचे आईबाप! आमच्याकडून तुला कोणत्याहि प्रकारचें सुख मिळालें नाहीं. भाजून भाजून काढली बेंरे! आतां स्वर्गांत तुला देवादिकांकडून मान मिळेल! तूं सर्व सुख भोग भोगशील, आनंदांत रहाशील पण माझी आईची एवढी शेंवटची गोष्ट ऐक. तूं कितीही सुखांत असलीस, कोणत्याही पाहिरीला चढलीस तरी या गरीब आईला विसरूं नको! (ओक्साबोक्शी रडते.)

शारदाः—आई तुला मी कधीं तरी विसरेन काय? तूं मला नऊ महिने पोटांत वागवलेस. पुढें माझें लालन पालन केलेंस, माझ्या-

करितां फार फार कष्ट सोसलेस! तुझेच उपकार मला फिटणार नाहींत. 'स्वर्गापेक्षांही माता श्रेष्ठ' असेंच ह्मणून शहाणे लोक ह्मणतात!

कोदंड :–इंदिराकाकू, आतां मागच्या गोष्टींचें स्मरण करून व्यर्थ शोक करूं नका. आपल्या बेचाळीस पितरांना मुक्त करणारी कुलदीपिका आपल्या पोटीं आली ह्मणून धन्यता माना! आवरा आवरा आपला शोक.

शारदा :–आणि हांसतमुखानें माझी पाठवणी करा! [अधोमुख राहिलेल्या भैरवनाथास] बाळ भैरवनाथ, आमच्या कुळांत काय तो तूंच एकटा उरलास. सर्व संपत्ति तुझ्या ताब्यांत दिलीच आहे. तिच्या मदानें धुंद होऊं नको, व्यसनी लोकांची संगत धरूं नको. आपल्या कुळाचा लौकिक वाढव, मी तुला सांगावेंच असें नाहीं. पण विचारानें वागून संपत्तीचा सद्व्यय कर ह्मणजे स्वर्गांत आमच्या आत्म्यांना संतोष होईल. (सुवासिनींना) या बायांनो ह्यीं वायनें द्या, आतां उशीर नाहीं का होत? एकसारखी माझी वाट पहाणें चाललें असेल. [प्रेक्षकांतून दुःखोद्गार उठतात] तुह्मी शोक कां बरें करितां? चंद्राबरोबर चंद्रिका किंवा सूर्याबरोबर त्याची प्रभा तशी पतीबरोबर कांता ही मावळणारच. विधवापणांत जिवंत रहाणें मेल्यांतच जमा ना? [सुवासिनी वायनें लुटतात व शारदेस मळवट भरून तिचें कपाळाचें कुंकू आपले कपाळास लावून घेतात.]

इंदिरा :–[शारदेची ओटी भरून रडत] ये बरें बये आतां.

शारदा :—[सर्वांस नमस्कार करून] बायांनो, आई, बाबा, बंधूहो, माझ्या हातून तुमचे अपराध झाले असतील, अज्ञानानें मी कोणाचा अपमान केला असेल, कोणाला वाईट वाटण्यास रखें बोललें असेन तर त्याची मला क्षमा करा. येतें बरें मी आतां! मी माझ्या

देहाचें सार्थक करायला निघालें. तुह्मी रडूं नका. या मंगलकालीं अमंगल अश्रू गाळूं नका. (वल्लरीस) वल्लरी, ये मला तुला एकदां कडकडून भेटूं दे. (मिठी मारते.) बये, जगांत सद्‌गुण फार थोडे असतात! ह्मणून सज्जनांना कष्ट सोसावे लागतात! पण निग्रहानें वागलें ह्मणजे या कष्टांतूनही त्यांचा मार्ग सुरळीत निघतो. अरो. आतां द्या निरोप. येतें बरें मी...ते पहा महाराज वाट पाहून कंटाळले...आई, बाबा येतें...कोदंड महाराज येतें...दामिनी वन्सें येतें हो. लोभ ठेवा. बाळ भैरवनाथ (त्याला कुरवाळून) येतें हं.

[कांहीं धन्योद्गार व कांहीं दुःखोद्गार निघत असतांना हळू हळू जाऊन पेटलेल्या चितेंत उडी टाकते. इंदिरा, वल्लरी व भैरव हंबरडा फोडतात.]

इंदिराः—गेली, गेली, माझी बया माझ्या डोळ्यादेखत स्वर्गाला गेली! तिचे हे दिवस कां हो मरण्याचे? नाहीं, नाहीं, ती आपण-हून नाहीं बरें मेली, आह्मीं...आह्मीं आईबापांनींच पैशाकडे बघून तिला मारली हो. तिचा खून केला! बायांनो, तुह्मी तरी असें कराल? ह्मातार्‍या नवर्‍यांना दिलेल्या पोरीचें नशीब हें असेंच! हें ठाऊक असून, धडधडीत पहात असून तुह्मीं आपल्या पोरी ह्मातार्‍यांना विकाल? मग सांगा बघूं आह्मी मांग कसे नव्हे तें? आतां तुह्मी तरी सावध व्हा, माझ्या बयेचें ढळढळीत उदाहरण तुमच्या पुढें आहे! माझ्या बयेनें लग्न झाल्यास सुखाचें नांव सुद्धां ऐकलें नाहीं. तिच्या डोळ्याचें पाणी कधीं कधीं खळलें नाहीं. असेंच असेंच तुमच्या पोरीचें होईल याचा विचार करा. आह्मी मूर्ख झालों. पोरविके झालों. खुनी झालें, तुह्मी होऊं नका! हाय! हाय! शारदे, तुझे गुण किती आठवूं! आह्मीं तुझ्या जन्माचें मातेरें केलें तरी तूं आमच्यावर रागावली नाहींस! (रडत) मांग, मांग आह्मी मांग खरे!

कांचनः–(रडत) हां ! आह्मी नको ह्मणू ! मीच मांग ! तुझ्या-कडे कांहीं दोष नाहीं ! तुमचें सर्वांचें न ऐकतां मीच ही भयंकर गोष्ट-हत्या–केली–देवा... [स्फुंदस्फुंदून रडतो.]

दामिनीः–(धांवत वेड्याप्रमाणें पुढें येऊन) बायांनों, ह्मातार्‍याला दिलेल्या पोरीचा एक मासला तुह्मीं पाहिलाच. शारदा मोठी पति-व्रता ! सद्गुणी, सुशील पण तिला जन्म किती दुःखांत कंठावा लागला ? आणि मी अगदीं तिच्या विरुद्ध ! विषय–सौख्याकरितां शीलावर पाणी सोडणारी, प्रत्यक्ष पतीचा खून आपल्या हातांनीं कर-णारी, आपल्या बेचाळिशीला नरकांत घालणारी ही दामिनी, हा दुसरा मासला ! (घाबरून) अग बाई, हे परत कां आले ? नका हो ! नका असे डोळे फाडून बघूं ! मला आतां पश्चात्ताप झाला. अवघ्या जन्मांत मी तुह्मांला काडीएवढें सुद्धां सुख दिलें नाहीं. आतां स्वर्गांत येतें सेवा करायाला. [ऐकल्यासारखें करून] काय ह्मटलें, लोकांना ह्मातार्‍याला पोरी देऊं नका ह्मणून सांगून येऊं ? सांगतें. [लोकांस] तुह्मी सगळे माझे मायबाप आहां ! मी तुमच्या-पुढें पदर पसरतें. तुह्मी आमचीं हीं दोन उदाहरणें डोळ्यापुढें ठेवून, आपल्या पोरींच्या सुखावर उठू नका बरं. यतें आतां ! शारदेनें सतीचीं वाणें दिलीं माझी कुठें योग्यता आहे तेवढी ? शारदे, शारदे, थांब, मी तुझ्याबरोबरच येतें, मग तूं तिकडची समजूत घालून आमचें पुनः सख्य करून देशील ? ही आलें बघ. [पळत जाते]

कोदंडः–हिरा, तिच्या पाठोपाठ जा, पळ. ती बहुधा आत्म-हत्या करणार [हिरा जातो.]

कांचन॰ः—(हंबरडा फोडून) शारदे, गाडी सुरती तोळ्या बरोबर तुझ्या मासाचे लचके तोलून विकणारा हा खाटीक ! लोभाच्या

मदांत तुझ्या शीलावर अग्नि ठेवणारा हा आंगलाव्या! तुझीं हाडें चुलींत घालून, त्यावर चपात्या भाजून खाणारा हा बेरड! (उन्माद-युक्त) जा, आणि यमाला सांग, तुझा लोखंडीशूळ प्रलयाग्नींत तापीव! भयंकर नरकाचीं कपाटें खुली कर! तुझ्या दूतांचे दांत चांगलें पाजळलेले असूंदेत! सर्व तयारी जय्यत ठेव असा पापी तुझ्या ह्यातींत हा पहिलाच आहे. तरी तुझ्या शिक्षांच्या कडक-पणाच्या कमालीची कसोटी इथेंच लावली पाहिजे. (मोठ्यानें हांसून) भितोस, मला स्पर्श करायाला सुद्धां भितोस आं! बरें तर! मीच येतों तुझी परीक्षा घ्यायला! यमदूत हो, या असे पुढें! अगदीं ओळीनें उभे रहा. यमदूत, यमदूत ए यमदूत. [पळत जातो]

इंदिराः—धांवा हो धांवा! कुणी तरी त्यांना धरा. (पाठीमागून जाते)

भैरवः—कोदंड महाराज, काकांच्या अवाढव्य संपत्तीकरितां, मीं त्यांचें लग्न होऊं नये ह्मणून खटपट केली. ती संपत्ति आज माझ्या हातीं आली; पण आतां तिच्यावर संसार करून मी कोणाला दाख-वणार? आईबाप, लहानपणींच वारले. काका गेले शारदा काकु आपली कीर्ति दिगंत गाजवून इंद्राच्या नंदनवनांत काकाबरोबर क्रीडा करायला गेली. आतां मी या संपत्तीला घेऊन काय करूं? (निराश होऊन राहतो)

कोदंडः—भैरवनाथ असे निराश कां होता?

भैरवः—शारदा सतीसारखी पवित्र, वैराग्यशील माता मिळाल्या-वर मला प्रपंच वासनांची बाधा स्वप्नांत तरी होईल काय? मग मी निराशच होणार. (थांबून) बस्स, आतां या विषयवेशाला रजा! (कपडे काढून टाकतो) आतां आपल्यासारखी कफनी घालणार, आणि महासती शारदा मातेच्या सेवेंत शेष आयुष्य घालवणार. तिचे मंगल अस्थि गोळा करून त्यावर एक टोलेजंग देऊळ बांधतों,

आणि त्याच्या भिंतींच्या प्रत्येक दगडावर, ' **जरठें न विवाह करावा, कधिंहि न जनकें जरठ वरातें तनुजा देह विकावा** ' हीं वाक्यें कोरून ठेवतों. प्रत्येक झाडांच्या फांद्यांना याच वाक्याच्या मोठमोठ्या अक्षरांनीं लिहिलेल्या पाट्या टांगून देतों. आणि शारदा मातेचा इतिहास तिच्या समाधीवर कोरवून घेतों.

पशुपतिः–(पुढें होऊन) शाबास, भैरवनाथ शाबास! या तुमच्या सत्कृतीला माझें पूर्ण साह्य आहे असें समजा. माझ्या संपत्तीचा अर्धा भाग मी तुमच्या या सत्कृत्यास मदत ह्मणून देतों.

वल्लरीः–त्या ' शारदा मंदिरांत ' अन्नछत्र ठेवावें, धर्मशाळा बांधावी आणखी अशीच कांहीं लोकोपयोगी कामें ठेवावीं.

हिरण्य०:–ही सूचना अगदीं लाखाची केलीत.

कोदंडः–हीहा अमलांत आणली जाईलच.

भैरवः–अवश्य अवश्य आणली जाईल. कोदंड महाराज आतां मीं आणखी काय करावें अशी आपली इच्छा आहे ?

कोदंडः–आतां फक्त देवानें, आपण बांधणार तें शारदा मंदिर चिरकाल रक्षावें आणि त्याच्या योगानें या जरठ–कुमारीविवाहाला आळा बसावा एवढीच इच्छा !

सर्वः–असेंच होवो !

हिरण्य०:-पळा पळा. ते पहा कांचनभट नदींत उडी टाकीत आहेत. (सर्व पळत जातात.)

स मा प्त.

श्रीयुत वाचक महाशय यांस वि. वि.—

ज्या समाजाच्या मनावर परिणाम व्हावा ह्मणून, हें पुस्तक लिहिलें आहे. त्याचें व्यक्तिशः मत मला फार महत्त्वाचें आहे. तरी मजवर कृपा करून खालीं आपलें प्रामाणिक (चांगलें किंवा वाईट कसेंही असो.) मत लिहून हा कागद मजकडे पाठवावा.

रामदास.

विजोडदंपती अथवा शारदापूर्ति वरील आमचें मत.

तारीख ______________ ______________________

सही.

(सरस्वतीमंदिराचे मालांस वर्गणीदार होणारांनीं खालीं सही व पत्ता लिहावा.)

रा. रा. व्यवस्थापक **सरस्वतीमंदिर** यांस.

आपले ग्रंथमालेंतलि १ लें पुस्तक **विजोडदंपती** वाचलें. त्यावरील मत वर लिहिलें आहे. आतां आपल्या मालेच्या वर्गणीदाराच्या नोंदवुकांत आमचें नांव नोंदवावें. व मालेचें पुस्तक तयार होतांच व्ही. पी. नें पाठवावें. आपल्या लघु-मालेचें पहिलें पुस्तक विठ्ठलदर्शन याच्या प्रति व्ही. पी. नें पाठवाव्या. (८५८६ मध्यें ४ प्रति येतात.)

पत्ता[१]:—

---

१ पत्ता साग्र व सुवाच्य बालबोध लिपींत लिहावा.

मंदिर स्थापन झाल्यापासून " वसईचा वेढा " व " विजोडदंपती " या प्रसिद्ध पुस्तकांशिवाय तयार होऊन अप्रसिद्ध राहिलेल्या ग्रंथांची यादी खालीं दिली आहे.

सं० श्रियाळ... ... ... ले० रामदास.

सं० सौनीत (ध्रुव)... ... ,,

सं० अंशुमति... ... ... ले० महादेव.

गद्य दर्पहरण (बली)... ... ... ,,

अभिमान (ऐतिहासिक कादंबरी) लेखक-मकरंद.

काकोदर (सामाजिक कादंबरी) लेखक अनसूया,

गद्य प्रणयमंगल...लेखक-शिवराम

याशिवाय '**वैराग्यमार्ग**' (पौराणिक नाटक) '**शिक्षारहस्य**' (मुलांना व मुलींना शिक्षण कसें द्यावें याचा विचार केलेली कादंबरी) व '**नित्याचे खून**' (अनीतीचा घातुकपणा दाखवणारी कादंबरी), ही पुस्तकें तयार होत आहेत.

मंदिराच्या पुस्तकांची **माला** काढणेचा आमचा विचार आहे. हें पहिलें पुस्तक वाचून, आमच्या मालेला जर ३०० वर वर्गणीदार मिळाले तर, हिला व्यवस्थित स्वरूप येऊन वर्षातून ३।४ पुस्तकें वर्गणीदारांस सवलतीनें मिळूं शकतील. नाहीं तर वर्षाला एक पुस्तक आह्मी प्रसिद्ध करूंच !

हिलाच जोडून एक ' लघुमाला ' काढली आहे तिचें पहिलें पुस्तक ' **विठ्ठलदर्शन** ' (ले० विनायक विष्णु पारखे सरस्वतीमंदिरवासी) हें लवकरच प्रसिद्ध होईल. यांत नवीन मताच्या लोकांनासुद्धां, पंढरीचें महत्व सहज पटेल अशी कथा लिहिली आहे. किंमत अगदींच कमी ह्मणजे ८१ ठेवणेचा विचार आहे. पुस्तक ३२ पानें क्रा. फो. होईल.

संस्थेला **राजाराम** विजयी करील अशी सर्व मंदिरवासीयांची दृढ भावना आहे.

१-८-१३ }
मिरज } संस्थापक-**सरस्वतीमंदिर.**